CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १३ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १२५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आज होलिकादहन



सोलापूर तरुण भारत प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

**उद्या अंक नाही**

गुरुवार, दि. १३ मार्च रोजी होळी सणानिमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास एक दिवस सुटी आहे. त्यामुळे **उद्या शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५** रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

# मॉरिशस भारताचा महत्त्वाचा भागीदार

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन** | **आर्थिक, सामाजिक स्वरूपाच्या मार्गावर एकमेकांचे साथीदार**



पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत करताना मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम

### आठ करारांवर स्वाक्षरी

**◆ पोर्ट लुईस, १२ मार्च**

भारत आणि मॉरिशसमधील संबंध केवळ हिंद महासागराशी नव्हे, तर दोन्ही देशांची सामायिक संस्कृती, परंपरा आणि मूल्यांशीही जोडलेले आहेत. आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाच्या मार्गावर आपण एकमेकांचे साथीदार आहोत. नैसर्गिक आपत्ती असो किंवा कोरोना महामारी आम्ही नेहमीच एकमेकांना पाठिंबा दिला, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी म्हणाले.

भारत आणि मलेशियाने द्विपक्षीय संबंध 'वर्धित धोरणात्मक भागीदारी'पर्यंत वाढवले आहे. मलेशियासोबत झालेल्या आठ द्विपक्षीय करारांवर स्वाक्षरी झाल्यानंतर मोदी म्हणाले, दोन्ही देशांसाठी व्यापार आणि विकास हा सागरी सुरक्षेवर अवबंबून आहे. मी दहा वर्षांपूर्वी मॉरिशसचा दौरा केला, त्यावेळी सागरी सुरक्षासंदर्भात महत्त्वाची आश्वासने दिली होती. 'ग्लोबल साऊथ' साठी आमचा दृष्टिकोन 'महासागर' आहे. सर्व प्रदेशांतील सुरक्षा आणि विकासासाठी परस्पर आणि समग्र प्रगती हेच भारताचे लक्ष्य आहे. आमचा दृष्टिकोन विकासासाठी व्यापार, प्रगतीसाठी कौशल्य विकास आणि सामायिक भविष्यासाठी परस्पर सुरक्षिततेवर केंद्रित आहे. ◀(वृत्तसंस्था)

### नवीन संसद भवनाच्या बांधकामात सहकार्य

नरेंद्र मोदी म्हणाले, मॉरिशसमध्ये मेट्रो, गृहप्रकल्पांचे बांधकाम, अत्याधुनिक रुग्णालये, व्यवसाय आणि पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी यूपीआय आणि रूपे कार्ड, परवडणाऱ्या आणि चांगल्या दर्जाच्या औषधांसाठी जन औषधी केंद्रे असे अनेक लोककेंद्रित उपक्रम सुरू करण्यासाठी झालेले करार भविष्यात दोन्ही देशांच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. मॉरिशसमधील नवीन संसद भवनाच्या बांधकामात भारत सहकार्य करेल, असा निर्णय आम्ही घेतला आहे. लोकशाहीच्या जननीकडून मॉरिशसला ही एक भेट असेल. ■

### राष्ट्रीय दिनी सहभागी होणे माझे भाग्य

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी बुधवारी प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, १४० कोटी भारतीयांच्या वतीने मी मॉरिशसच्या सर्व नागरिकांना राष्ट्रीय दिनाच्या शुभेच्छा देतो. मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनी मला पुन्हा एकदा भेट देण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. याबद्दल मी नवीनचंद्र रामगुलाम आणि मॉरिशस सरकारचे आभार मानतो. ■

# जन्म-मृत्यूच्या बोगस प्रमाणपत्रांना चाप

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधिमंडळात निवेदन**

### जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा
### शासन निर्णय जारी

**◆ मुंबई, १२ मार्च**

सरकारी व्यवस्थेतील उणिवांचा लाभ घेत जन्म-मृत्यू नोंदणीची प्रमाणपत्रे मिळविणाऱ्या परदेशी नागरिकांच्या हैदोसावर आता अंकुश बसणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधिमंडळात निवेदन करून, विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या कार्यपद्धतीनिश्चित केल्याचे सांगत, सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार बुधवारपासूनच महाराष्ट्रात नवीन बदल लागू होतील, अशी घोषणा केली.

ही प्रमाणपत्रे देण्यासाठी तीन स्तरीय पडताळणी टप्पे निश्चित केले आहेत. १७ मुद्यांची पूर्तता केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. तथापि, अर्जदाराने जोडलेली कागदपत्रे (पुरावे) बनावट आढळल्यास तत्काळ फौजदारी कारवाई करण्यात येईल.

जन्म आणि मृत्यू नोंदीबाबत पारदर्शकता, सुटसुटीतपणा आणि बनावट प्रमाणपत्रे वितरणास आळा बसावा यासाठी जन्म -मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार आता जलद गतीने जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र मिळणार असून, चुकीचे प्रमाणपत्र दिल्यास थेट फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

शाळा प्रवेश, पासपोर्ट, सातबारा नोंदी, इतर शैक्षणिक बाबी आदींसाठी जन्म व मृत्यू दाखल्यांची आवश्यकता असते. नागरिकांना योग्य वेळेत जन्म व मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी महसूल विभागाच्या २१ जानेवारी, २०२५ च्या आदेशान्वये उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत असलेली स्थगिती उठविण्यात आली आहे.

उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुटसुटीतपणा व बनावट प्रमाणपत्रे वितरित करण्यास प्रतिबंध करण्यासाठी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम,१९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या कार्यपद्धतीसंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक कार्यपद्धती निश्चित केलेली आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### बनावट प्रमाणपत्रांबाबत तक्रारी

परदेशी नागरिकांना बनावट जन्म प्रमाणपत्रे वितरित केल्याबाबत काही तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारींनुसार गृह विभागामार्फत नाशिक विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास समिती गठीत केलेली आहे. २१ जानेवारीच्या आदेशान्वये उपरोक्त सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्यास स्थगिती देण्यात आली होती. ■



" जन्म -मृत्यू प्रमाणपत्र ही अत्यंत आवश्यक गरज असून, त्याचा चुकीचा उपयोगही केला जात होता. याला प्रतिबंध व्हावा यासाठी या अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. आता कोणालाही या दुरुपयोग करता येणार नाही. केल्यास फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल.

**चंद्रशेखर बावनकुळे,** महसूल मंत्री

## महत्त्वाचे

### दिल्लीत १३ बांगलादेशी घुसखोरांना अटक

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत पोलिसांनी राबविलेल्या मोहिमेत १३ घुसखोर बांगलादेशींनी अटक करण्यात आली. त्यांनी भारतात राहण्यासाठी बोगस दस्ताऐवज तयार केल्याची माहिती तपासात समोर आली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, दक्षिण-पूर्व आणि दक्षिण दिल्लीत मंगळवारी शोधमोहीम राबविण्यात आली. यावेळी विविध परिसरांमधून १३ बांगलादेशींना पकडण्यात आले. दोन वर्षांपासून बांगलादेशी घुसखोर भारतात राहत होते. त्यांनी बोगस दस्ताऐवजाच्या आधारे आधार कार्ड, रेशन कार्ड बनविले होते. पश्चिम बंगालला लागून असलेल्या सीमेवरून त्यांनी दलालाच्या माध्यमाने भारतात प्रवेश केला होता.

### रेडी रेकनरच्या दरवाढीची चर्चा निराधार


**मुंबई :** रेडी रेकनर दरासंदर्भात सध्या संपूर्ण राज्यात सर्वेक्षण सुरू आहे. मागील काही वर्षांमध्ये काही भागांमध्ये रेडी रेकनर दर वाढले, तर काही ठिकाणी दर स्थिर ठेवण्यात आले. २०२३-२४ आणि २०२४- २५ मध्ये कोणतीही दरवाढ झालेली नाही. काही माध्यमांमध्ये १०-१५ टक्के दरवाढ होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत, मात्र त्या निराधार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. सुनील शिंदे यांनी मालमत्तांच्या खरेदी-विक्री वेळी जमा होणाऱ्या मुद्रांक शुल्क संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. तसेच गरज असल्यास काही दर कमी करण्याचाही विचार केला जाईल, असेही सांगितले.

# आईसह दोन चिमुकल्यांचा विहीरीत बुडून मृत्यू

**● उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी येथील दुर्देवी घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी येथे अज्ञात कारणातून आईने दोन मुलांसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. मृतांमध्ये आईसह पाच आणि दोन वर्षांच्या सख्ख्या भावंडांचा समावेश आहे. ही दुर्देवी घटना बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली.



चित्रा बाबासाहेब हाक्के (वय २८), पृथ्वीराज बाबासाहेब हाक्के (वय ५) आणि स्वराज बाबासाहेब हाक्के (वय २, सर्व. रा. वांगी, ता. उत्तर सोलापूर) अशी मृतांची नावे आहेत. चित्रा हाक्के या गावापासून जवळच असलेल्या त्यांच्या शेतातील वस्तीवर राहण्यास आहेत. बुधवारी दुपारी १२च्या सुमारास त्या दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या. बराचवेळ त्या मुलांना घेऊन घराकडे परतल्या नसल्याने नातेवाईक त्यांचा शोध घेत होते. परंतु त्या दिवसभर त्या कोठे गेल्या हे समजू शकले नाही. दरम्यान सायंकाळी ५.३० वाजता शेतातील वस्तीच्या जवळच असलेल्या विहीरीत एका व्यक्तीला महिला पाण्यावर तरंगताना दिसली. त्या व्यक्तीने तातडीने ही बाब वस्तीवरील व गावातील लोकांना सांगितली. बघता बघता काही वेळातच लोकांची मोठी गर्दी जमली त्यातील लोकांना तसेच नातेवाईकांना तो मृतदेह चित्रा हाक्के यांचा असल्याचे लक्षात आले. विहीर अरुंद आणि



खोल असल्याने विहिरीत उतरणे लोकांना अडचणीचे ठरत होते. यामुळे सोलापूरातुन अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशामक दलाच्या जवानांनी विहिरीतील पाण्यातून चित्रा व दोन वर्षाचा बालक स्वराज या दोघांना बाहेर काढले. रात्री उशिरापर्यंत पृथ्वीराज याला बाहेर काढण्याचे काम सुरू होते. या बाबत तालुका पोलीस ठाण्यात रात्री उशीरा नोंद करण्याचे काम सुरू होते.

# पुढील वर्षी भारताचा जीडीपी ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त राहणार

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आर्थिक तरतूद, उच्च सरकारी भांडवली खर्च, आयकरातील कपात आणि व्याजदर कमी झाल्याने ग्राहकांच्या मागणीतील वाढीमुळे पुढील आर्थिक वर्षात भारताचा विकास दर अर्थात्? जीडीपी ६.५ टक्क्यापेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज पतमानांकन संस्थान मूडीजने बुधवारी वर्तवला. भारताच्या विकासदरासंदर्भात मूडीजने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६.३ टक्के, तर पुढील आर्थिक वर्षांत जीडीपी ६.५ टक्के राहणार आहे.




# अग्निवीर भरतीसाठी धावण्याच्या नियमांत बदल



**नवी दिल्ली, १२ मार्च**

भारतीय लष्कराच्या अग्निवीर भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिलदरम्यान या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करू शकतात. मात्र, भरतीसाठी धावण्याच्या नियमांत बदल करण्यात आला आहे.

अग्निवीर जनरल ड्युटी, टेक्निकल, क्लर्क, स्टोअर कीपर टेक्निकल, ट्रेडसमॅन, सैनिक फार्मा, सैनिक टेक्निकल नर्सिंग असिस्टंट आणि महिला लष्करी पोलिसांच्या पदांसाठी ही भरती होणार आहे. हवालदार एज्युकेशन, हवालदार सर्वेयर ऑटोमेटेड कार्टोग्राफर, जेसीओ कॅटरिंग आणि जेसीओ रिलिजियस टीचर पदांसाठीही भरती जाहीर करण्यात आली आहे. यंदाच्या भरती प्रक्रियेत एक मोठा बदल करण्यात आला आहे. आता अर्जदारांना एकाच अर्जामध्ये दोन पदांसाठी अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. यामुळे अर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ होईल आणि तरुणांना अधिक संधी मिळेल. अग्निवीर भरतीसाठी अर्ज शुल्क फक्त २५० रुपये असून, ते ऑनलाईन जमा करावे लागेल.

अर्ज भरताना दहावीच्या गुणपत्रिकेच्या आधारे पालकांचे नाव भरावे लागेल. मूळ रहिवासी प्रमाणपत्र (डोमिसाइल) आवश्यक असेल. धावण्याच्या नियमांत शिथीलता यंदा धावण्याच्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. पूर्वी दोन गटांमध्ये विभागणी होती. मात्र, यंदा चार गट करण्यात आले आहेत. यामुळे अधिक उमेदवारांना संधी मिळणार आहे.

**नवीन निकष आणि गुणांकन**

- ५ मिनिटे ३० सेकंदात धावणे पूर्ण केल्यास ६० गुण
- ५ मिनिटे ३१ सेकंद ते ५ मिनिटे ४५ सेकंदात धावणे पूर्ण केल्यास ४८ गुण
- ५ मिनिटे ४६ सेकंद ते ६ मिनिटांत धावणे पूर्ण केल्यास ३६ गुण
- ६ मिनिटे १ सेकंद ते ६ मिनिटे १५ सेकंदात धावणे पूर्ण केल्यास २४ गुण



## संक्षिप्त वृत्त

### अक्कलकोट रस्त्यावर कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

अक्कलकोट रोड ब्रीजवरील अपघाताला ३६ तास उलटत नाही त्याच ठिकाणी बुधवारी रात्री पुन्हा एकदा मोठा अपघात होऊन एका मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला आहे. काल मंगळवारी सकाळी अक्कलकोट रोडवरील ब्रीजवर बल्करच्या धडकेत एका ५७ वर्षीय खुर्शीद फक्रोद्दीन शेख या महिलेचा मृत्यू झाला होता. बुधवारी रात्री कुंभारीहून विडी घरकुल येथील प्रियदर्शनी नगरात राहणाऱ्या श्रीनिवास बासबत्तीन (वय ६०) या मोटारसायकलस्वाराचा कारच्या धडकेत मृत्यूमुखी पडले आहेत. कुंभारीहून सोलापूरकडे येणाऱ्या एम एच १३ बीवाय ०६४८ या टू व्हीलर गाडीला एम एच १४ डी एन ६२४८ या चारचाकी गाडीने जोराची धडक दिल्याने टू व्हीलरवरील श्रीनिवास बासबत्तीन हे गंभीर जखमी झाले.या गंभीर जखमीला सोलापूरच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यापूर्वीच त्याचं दुदैवी अंत झाला. अपघात घडल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीवर नियंत्रण ठेवलं आहे. कालच या भागात अपघात होऊन एका महिलेचा मृत्यू झाला होता. यावेळी येथील नागरिकांनी या मार्गावरील वाहतूकीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. आता या भागातील नागरिकांनी पुन्हा एकदा संताप व्यक्त करत या भागातील नागरिकांच्या जीवाला धोका असल्याचे सांगितले.

**दोन दिवसातील दुसरी घटना**



### सोजर स्कूलमध्ये महिला दिन

**बार्शी, दि. १२ मार्च-**

सोजर इंग्लिश स्कूलमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी महिला पालकांसाठी मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका सोनाली नष्टे, दिपाली देशमुख, आस्मा मुलाणी, चैताली पुराणिक, अमृता मुनोत, मंजुषा उबाळे यांनी केले. किरण जगताप यांनी तंत्र सहाय्यकाचे काम पार पाडले. कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरणाचे वेळी संस्थेच्या सचिवा कल्पना बारबोले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवराच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कल्पना बारबोले, मुख्याध्यापिका रिटा नेटके यांचे हस्ते विविध खेळात विजयी झालेल्या कानडे, वाघमोडे, मुलाणी यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी केले.



### अक्षर बुरकुले यांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. १२ मार्च-**

सोलापूर जिल्हा बँकेचे भिमानगर शाखेचे शाखानिरीक्षक सर्जेराव बुरकुले यांचे चिरंजीव अक्षर बुरकुले यांनी एकाच वेळी महाराष्ट्र राज्य वीज वितरण व महाराष्ट्र राज्यवीज महापारेषणच्या सहाय्यक अभियंताची परीक्षा पास झाल्याबद्दल माढा तालुक्याचे सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अमोल धोत्रे, शंकर व्यवहारे, जिल्हा बँकेचे टेंभुर्णी ब्रांच व्यवस्थापक विष्णुपंत भोसले, नितीन आबा खटके, गणेश फरड, हनुमंत पवार, अशोक लांडगे, सुमित खडके, दत्तात्रय साळुंखे, प्रकाश पवार, बापू बंडगर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन गणेश फरड मित्रमंडळ यांनी केले.



### रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**पिलीव, दि. १२ मार्च -**

माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त पिलीव येथील पिलीव जिल्हा परिषद केंद्र शाळा,काळामळा येथील जिल्हा परिषद शाळा,साठेनगर येथील जिल्हा परिषद शाळा,जाधवस्ती जिल्हा परिषद शाळा, जरगवस्ती जिल्हा परिषद शाळा, जावळे-मुजावरवस्ती शाळा, करांडे वस्ती येथील जिल्हा परिषद शाळा ,कुसमोड येथील जिल्हा परिषद लक्ष्मीनगर शाळा तसेच याठिकाणी असणाऱ्या सर्व अंगणवाडी शाळेतील विदयार्थीना बिस्कीटचे पुडे व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमोद भैस, अतुल नष्टे, डॉ.निलेश कांबळे, संजय पाटील, अंकुश भैस, प्रवीण वाघमारे, फिरोज शेख, बाजीराव जाधव उपस्थित होते.

### ठाकरे गटाची गळती रोखण्याचे आव्हान; गळती थांबता थांबेना

**अक्कलकोट, दि. १२ मार्च-**

अक्कलकोटचे प्रसिद्ध व्यापारी समर्थ बिराजदार, विनायक किवडे, नागेश कोतले, हजर बागवान यांनी नुकताच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचां सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, कामगार सेना जिल्हाप्रमुख साहेबांना तेगेंळी कामगार सेना जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे अक्कलकोट शिवसेना शहर महिला आघाडी प्रमुख वैशाली हावनूर, भागेश बबलाद उपस्थित होते . ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी पदाचा राजीनामा देऊ केला होता. मात्र पक्षाने तो मंजुर केला नसल्याची चर्चा होती. अक्कलकोट शिवसेनेत असलेली धुसपुस नष्ट करण्यात ठाकरे गटाला यश आले नाही. या सर्व धक्कयातून ठाकरे गट उभारी घेण्याचे मोठे आव्हान पक्षासमोर असून नव्याने संघटनेची बांधणी करावी लागणार आहे.

# नव्या परीक्षा वेळापत्रकामुळे शिक्षकासह सर्वांचीच होतेय कोंडी



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि १२ मार्च -**

महाराष्ट्रात दरवर्षी पहीली ते नववीच्या परीक्षा मार्च महीन्यात होतात. पण यंदा याच परीक्षा ८ ते २५ एप्रिल या दरम्यान घेणार असल्याचे शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. या निर्णयामुळे शिक्षक, शाळांची मोठी कोंडी झाल्याचे दिसत आहे.

शिक्षकांनी शाळा स्तरावर वर्षभर केलेल्या नियोजनाला यामुळे पुर्णपणे खो बसला आहे. शिक्षण विभागाने परीक्षा २५ एप्रिल पर्यत उशीरा जरी घेण्याचा निर्णय घेतला असला तरी निकाल हा १ मे पर्यतच लावला जाणार आहे. असे शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेचे म्हणणे आहे. म्हणजे परीक्षा झाल्यावर फक्त ६ दिवसातच निकाल लावणे म्हणजे शिक्षकांसाठी ही मोठी तारेवरची कसरत आहे. तसेच एप्रिल महीन्यात उन्हाचा तीव्र तडाखा असतो यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत लांबून यावे लागते त्यामुळे त्यांच्या जीवाशी अक्षरशः खेळ आहे का असा प्रश्न पालकातून विचारला जात आहे. खरेतर शाळा स्तरावर घटक चाचण्या घेणे,गुणदान करणे,विदयार्थनचे मुल्यमापन करणे, पेपर तपासणे, परीक्षांचे नियोजन करणे हे शाळा स्तरावर करावे असे शासनाचे अगदी स्पष्ट धोरण आहे. मात्र नव्या परीक्षेच्या वेळापत्रकामुळे शाळांच्या स्वायत्ततेला धक्का लागला आहे. शिक्षक संघटनाचा याला पुर्णपणे विरोध आहे.

> शासनाने शाळांनी केलेल्या परिक्षांचे नियोजन पालकांचे नियोजन याचा कसलाही विचार केला नाही. शासनाला याबाबतची वस्तुस्थिति अजिबात माहीती नाही.
>
> **- प्रा. संजय पाटील - उपाध्यक्ष, शिक्षक पालक संघ, क.भा. पाटील. विद्यालय, पिलीव.**

> जिल्हा परिषदेने सदरच्या नव्या परीक्षा वेळापत्रकाची आम्हाला अजुन माहीती दिलेली नाही किंवा अधिकृत पत्र आलेले नाही. पण आम्हाला आमच्या रयत शिक्षण संस्थेच्या नियमानुसार व वेळापत्रकानुसार परीक्षा घेणे बंधनकारक आहे.
>
> **- शिवाजी कापसे - मुख्याध्यापक क.भा. पाटील विदयालय, पिलीव**

# शिंगणापूर व बारामतीला वेळेत बसेस सोडण्याची मागणी

### अकलूज आगार प्रमुख व नातेपुते एसटी नियंत्रकास दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १२ मार्च-**

नातेपुते येथून शिखर शिंगणापूर व बारामतीला जाणाऱ्या एसटी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता वेळेवर व जादा बस सोडाव्यात या मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते सुनील ओवाळ यांनी अकलूज आगारप्रमुख व नातेपुते एसटी नियंत्रक यांना दिले आहे.

नातेपुते (ता. माळशिरस) येथून राज्याचे आराध्य दैवत शिखर शिंगणापूर या ठिकाणी जाण्याकरता, विदर्भ मराठवाडयासह पश्चिम महाराष्ट्रातून अनेक भाविक भक्त येतात. सातारा, पुणे, सोलापूर या तीन जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या नातेपुते येथून वेळेत तसेच जादा बसेस नसल्यामुळे प्रवाशांना त्रास होतो. नातेपुतहुन शिखर शिंगणापूर या मार्गावर परिसरातील विद्यार्थी दहिवडी, सातारा, कराड या ठिकाणी कॉलेजचे शिक्षण घेत आहेत. अलीकडे ज्यादा गाड्या नसल्यामुळे या विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. नियोजन नसल्यामुळे त्याचा फटका प्रवासी विद्यार्थ्यांना बसत आहे. या संदर्भात वारंवार तक्रारी करून सुद्धा बसेस वाढवत नाही. गैरसोय टाळावी असे निवेदन सुनील ओवाळ यांनी प्रमोद शिंदे व नियंत्रक पवार यांच्याकडे दिले. यावेळी विलास भोसले, श्रीराम भगत, उमेश साळवे, राहुल सोरटे, गोरख साळवे उपस्थित होते.



> नातेपुते ते बारामतीला जाणाऱ्या एसटी बसेसचे फेरे कमी तर आहेतच परंतु एकही एसटी बसेस वेळेत सोडली जात नाही. याबाबत एसटी आगार प्रमुख दुर्लक्ष करीत आहेत. नातेपुते ते बारामती बसेस वेळेत नसल्याने बारामती वरून नातेपुतेला येणाऱ्या प्रवाशांना बारामतीहून फलटण मार्गे नातेपुत ला यावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ व पैसा खर्च होत आहे.
>
> **- बाबुराव खिलारे, दहिगाव ता. माळशिरस**

# गुंजेगाव येथील दोघांच्या खूनप्रकरणी आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१२ मार्च**

गुंजेगाव येथील रिना आप्पासो ढोबळे (वय ३५),चंद्रकांत तात्यासो पाटील (वय ४५) या दोघांचा खून केल्याप्रकरणी लक्ष्मण ढोबळे, प्रदिप कारंडे, गणेश ढोबळे, निशांत ढोबळे, कैलास कारंडे यांना पोलीसांनी अटक करुन मंगळवेढा न्यायाधिश व्ही.के.पाटील यांच्या समोर उभे केले असता न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.११ रोजी फिर्यादी रावसाहेब पाटील (रा. राजापूर) यांना त्यांचा मयत भाऊ चंद्रकांत पाटील याने फोन करुन सांगितले मी रिनाच्या घरी आहे. येथे खूप मोठे भांडण होण्याची शक्यता असून तिचे दीर लक्ष्मण ढोबळे व त्यांचे नातेवाईक आमचे सोबत भांडण करण्यासाठी जमले आहेत. हातात लोखंडी पाईप,लोखंडी हातोडा, काठ्या,कोयता असून तू तात्काळ येथे ये असे कळविल्यानंतर फिर्यादी हे मोटर सायकलवरुन रिनाच्या घराजवळ पोहचले. फिर्यादीचा भाऊ चंद्रकांत व रिना ढोबळे यांच्या डोकीत लक्ष्मण ढोबळे हा फटके मारत असल्याचे फिर्यादीस दिसून आले. तर आरोपी ज्ञानेश्वर खोळपे हातातील कोयत्याने त्या दोघांवर वार करीत होते. या दरम्यान दोघेजण गंभीर जखमी होवून जागेवर पडले होते. फिर्यादी हे भावाला सोडविण्याकरिता गेले असता आरोपी सतिश कारंडे, प्रदिप कारंडे यांनी फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी पाईपने डोकीत मारुन गंभीर जखमी केले. तसेच पुन्हा आमच्या वस्तीवर आला तर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी देवून आरोपी तेथून पळून गेले. जखमी फिर्यादीस चुलत भाऊ सुनिल पाटील याने उपचारासाठी मोटर सायकलवरुन आंधळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरु असताना नातेवाईकाकडून फिर्यादीस समजले की भाऊ चंद्रकांत व रिना ढोबळे यांना वरील सर्व आरोपींनी ठार मारले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दोघांचा खून केल्याप्रकरणी लक्ष्मण ढोबळे (वय ५६),सतिश कारंडे (वय३५), प्रदिप कारंडे (वय ३१),गणेश ढोबळे (वय२८),निशांत ढोबळे (वय २७), ज्ञानेश्वर खोळपे,कैलास किसन कारंडे (सर्व रा.गुंजेगाव) या सात जणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या पैकी कैलास किसन कारंडे याला बुधवारी सायंकाळी अटक केली आहे. जखमी आरोपी सांगली येथे दवाखान्यात उपचार घेत आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी बारा तासाात सर्व आरोपींना आटक केली. अटक आरोपींना न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी मंजूर केली. आरोपीच्या वतीने अॅड.उल्हास माने यांनी काम पाहिले. दरम्यान दोघांचा खून होवूनही स्पष्ट कारण फिर्यादीत नमूद नसल्याने नेमके दोन खून कुठल्या कारणामुळे झाल्याबाबत संभ्रम असल्याचे चर्चेला ऊत आला आहे.

# अज्ञात कारणाने तरूणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

मंद्रुप येथील कापडाचे व्यापारी रवींद्र भागण्णा कल्याणी वय ३० याने घरातील लोखंडी हुकाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी दुपारी एक वाजता घडली.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहीती अशी कि, रवींद्र कल्याणी हा विवाहीत असून पत्नी व मुलांना माहेरी हत्तूर येथे सोडले होते. तर आई वडील नातेवाईकांच्या कार्यक्रमासाठी विजयपूर येथे गेले होते. भाऊ कापड दुकानात होता. वडीलांनी मोबाईल करून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल उचलत नसल्याने भावाला सांगितले. तेव्हा भाऊ दुकानातून घरी जाऊन पाहीले असता रवींद्र यांनी विठाई नगर येथील घराच्या लोखंडी हुकाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसले. मंद्रुप पोलीसांना घटनेची माहीती दिली. रवींद्र हा विवाहीत असून त्यांच्या आई , वडील, पत्नी, भाऊ, मुले असा परीवार आहे. मंद्रुप येथील हिंदु स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना राष्ट्राभिमान बाळगण्यास प्रेरीत करणारे नवीन शैक्षणिक धोरण : बसवराज डोनूर

### अणदूर येथे एक दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.१२ मार्च -**

विद्यार्थ्यांना राष्ट्राभिमान बाळगण्यास प्रेरीत करणारे नवीन शैक्षणिक धोरण आहे. भारतीय ज्ञानपरंपरेच्या वैभवशाली इतिहासाचे पुनरुज्जीवन करून आजच्या काळाशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करून विद्यार्थ्यांना राष्ट्राविषयी अभिमान बाळगण्यास प्रेरित करावे असे मत कर्नाटक केंद्रीय विश्वविद्यालय कलबुर्गी चे शैक्षणिक कार्य संचालक प्रो. डॉ. बसवराज डोनूर यांनी व्यक्त केले.



ते जवाहर महाविद्यालयामध्ये आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदे प्रसंगी बोलत होते. भारतीय ज्ञान प्रणाली आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आधुनिक भारतात सामाजिक परिवर्तन प्रक्रियेची पुनर्बांधणी या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. उदघाटन प्रो. डॉ. बसवराज डोनूर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे होते. तर भारतीय ज्ञान प्रणाली लातूरचे तज्ञ प्रशिक्षक कविता बियाणी, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड,श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटीचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, ग्लोबल व्हिलेज चे प्राचार्य स्वामी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांची उपस्थिती होती. समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. वीरभद्र दंडे , जवाहर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अॅड.लक्ष्मीकांत पाटील, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे उपस्थित होते.प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी अध्यक्षस्थानी होते. कविता बियाणी यांचेही या वेळी मार्गदर्शन झाले,

# आयुष्मान भारत गोल्डन कार्डसाठी सांगोला न.प.तर्फे शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ मार्च-**

सांगोला नगर परिषदेच्या वतीने शहरातील विविध रेशन धान्य दुकानाच्या ठिकाणी आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड वितरित करणे संबंधी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

केंद्रशासन पुरस्कृत आयुष्यमान भारत योजने अंतर्गत प्रती कुटुंब वार्षिक ५ लाखापर्यंतचा वैद्यकीय विमा उपलब्ध करून दिला जातो याकरिता त्या कुटुंबाकडे गोल्डन कार्ड असणे आवश्यक आहे. आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढण्याकरिता दि. १० मार्चपासून सांगोला नगरपरिषदेने शहरातील १० ठिकाणी शिबिराचे आयोजन केलेले आहे. त्यामध्ये प्रियदर्शनी महिला औ.उ.स. मर्या.दक्षता हॉस्पिटल जवळ, अंबिका महिला बचत गट, खरेदी विक्री संघ.१, खरेदी विक्री संघ.२, क्षेत्रीय माळी सोसायटी बुरांडे पिठाच्या गिरणी जवळ कचेरी रोड, ग्रामोद्योग तेल उत्पादक संस्था, जय भवानी चौक, बलभीम धनंजय चांडोले,चांडोले वस्ती, विणकर को.ओ.सो.कोष्टी गल्ली, संतोष रमेश बनसोडे भीम नगर, शिवपार्वती म.औ.सह संस्था,दक्षता हॉस्पिटल जवळ या ठिकाणी सांगोला नगर परिषदेचे १० ऑपरेटर उपलब्ध करून दिलेले आहेत. आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे- स्वतः चे आधार कार्ड, आधार लिंक असलेला मोबाईल नंबर, रेशन कार्ड




> आज दि.१३ मार्च रोजी स.८ ते सायं.५ पर्यंत जि. प. शाळा, चांडोलेवाडी येथे आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड काढणे करिता सांगोला नगरपरिषदेच्या वतीने विशेष शिबिराचे आयोजन केलेले आहे. तरी सांगोला शहरातील पात्र लाभार्थी यांनी या विविध ठिकाणी आयोजित केलेल्या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोला नगरपरिषद**

### बारबालेचा विनयभंग; दोघावर गुन्हा

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

बारबालेच्या घरात जबरदस्तीने घुसून तिचा विनयभंग करून तिला मारहाण करणाऱ्या दोघांवर फौजदार चवळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरून जुनेद जमील बॉम्बेवाले (रा. मौलाली चौक, सोलापूर) आणि विनायक नरेंद्र कटकधोंड (वय २७, रा. महादेव चौक, शास्त्रीनगर, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील पिडीता ही हॉटेल बार मध्ये काम करीत असताना तिची ओळख जुनेद बॉम्बेवाले याच्याबरोबर झाली होती. ११ मार्च रोजी सकाळी पीडिता ही घरामध्ये एकटीच झोपलेली असताना जुनेद याने तिच्या फोन नंबर वर फोन केले. त्यावेळी पीडितेने फोन उचलला नाही. त्यामुळे काही वेळानंतर जुनेद याने पीडितेच्या घरात घुसून तू फोन का उचलत नाही, तुला जिवंत राहायचे आहे की नाही असे म्हणून पिडीतेला मारहाण करून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे पिडीतेने आरडा ओरड केल्यानंतर आजूबाजूच्या लोक आलेले पाहून जुनेद पळून गेला. घडल्या प्रकाराबद्दल पिडीता ही पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी बाळे पोलीस चौकी येथे जात असताना जुनेद व त्याचा मित्र विनायक कटकधोड हे दोघे त्या ठिकाणी आले व त्यांनी तू पोलिसात तक्रार देती का असे म्हणत शिवीगाळ करीत लाथाबुक्याने पिडीतेला मारहाण केली. त्यावेळी रोडवरील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी पीडितेची सुटका केली अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे.

# स्वेरीच्या एमबीएमधील विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ मार्च -**

मागील काही दिवसांपासून आपल्यातील तरुणाई ही पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करत विविध डे साजरा करत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे सामाजिक भान हरपलेली ही तरुणाई अंधकारमय भविष्याच्या दिशेने जात असल्याचे आपण पाहत आहोत. 'उद्याच्या भारताचे आपण आधारस्तंभ आहोत' याचा जणू या तरुणाईला विसर पडलेला असल्याचे आपल्याला जाणवते. अशा मुल्यहिन संस्कृती मधून तरुणाईला वेळीच बाहेर काढणे गरजेचे आहे म्हणून स्वेरीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व एम.बी.ए.चे विभागप्रमुख डॉ.कमल गलानी यांच्या नेतृत्वाखाली नुकताच 'रोटी डे' साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे पंढरपूर पंचक्रोशीत कौतुक होत आहे.




स्वेरीचे मधील एम.बी.ए. विभागामधील विद्यार्थ्यांनी काहीतरी वेगळा असा सामाजिक उपक्रम करायचे ठरवले. या अनुषंगाने स्वतःच्या घरून कोणी चपात्या तर कोणी भाकरी आणल्या. वेळ न घालवता पॅकेटमध्ये दोन तर काहीमध्ये तीन चपात्या, भाकरी व भाजी अशा स्वरूपात जवळपास ७०० पॅकेट तयार करून मोठ्या बॉक्समध्ये घेवून साधारण अकराच्या सुमारास ११० विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी संभाजी वलटे यांच्यासह एम.बी.ए.विभाग आपली मोहीम फत्ते करण्यास निघाला. सुरुवातीलाच गोपाळपूरातील मातोश्री वृद्धाश्रम गाठले. वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धनंजय राक्षे यांनी सर्वांचे स्वागत केले. तेथे वृद्धाश्रमात 'अन्नदान' करून हा आगळावेगळा 'रोटी डे' साजरा केला. 'आमची मुले, आमचे नातू तुमच्या एवढीच मोठी झाली असावीत' असे म्हणत तेथील वृद्धांच्या डोळ्यात अश्रू तरळले. विद्यार्थ्यांनी आणलेले अन्न, फळे त्यांनी घेऊन विद्यार्थ्यांना आशिर्वाद दिले. अन्नदान करताना वृद्धांसमवेत साधलेल्या संवादामुळे अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनींना अक्षरशः रडू कोसळले. विद्यार्थ्यांनी पुन्हा पंढरपूर शहरातील दत्तघाटा नजीकच्या पायऱ्यांकडे मोर्चा नेला ! तेथे असलेल्या सर्व भिक्षुकांना विद्यार्थ्यांनी अन्नाची पाकिटे दिली तसेच कोर्टी रोड लगत असलेल्या पालवी या बालकाश्रमात देखील चटई वाटप केले.



## शक्तिपीठ महामार्गाविरोधात बळीराजाचा एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार

**आझाद मैदानावर हजारो शेतकऱ्यांचा एल्गार**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १२ मार्च-**

शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने सांगली आणि कोल्हापूर भागातील शेतकऱ्यांनी आज शक्तीपीठ महामार्गाविरोधात आझाद मैदानावर मोर्चा काढण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील आदींनी उपस्थित राहत शक्तिपीठ महामार्ग रद्द व्हावा, यासाठी एकजुटीने संघर्ष करायला पाहिजे असा एल्गार पुकारला. जयंत पाटील, अंबादास दानवे, सतेज पाटील यांच्यासह कैलास पाटील, सचिन अहिर, प्रवीण स्वामी, राजू नवघरे, राजू शेट्टी व दिलीप सोपल आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**शक्तीपीठ महामार्ग लादणार नाही**

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी विधान परिषदेत लक्षवेधी पुकारणे आली होती यावेळी विरोधकांच्या प्रश्नाला उत्तर देताना आम्ही हा मार्ग बांधणार आहोत पण कोणावर लादणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली ते म्हणाले की शक्तिपीठ महामार्ग व्हावा यासाठी अनेक शेतकऱ्यांनी पाठिंबा दर्शविलेला आहे आता काहीजण विरोध करत आहे तर आम्ही बैठक घेऊन चर्चा करू व त्यातून मार्ग काढू, त्यासाठी विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही निमंत्रित केले जाईल, असेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

## एमपीएससीच्या परीक्षा मराठीमध्ये घेण्याचे शासनाचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १२ मार्च-**



राज्यात एमपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या सर्वच स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेण्याबाबत राज्य शासनाचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससी स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेण्याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की,'राज्यातील अभियांत्रिकी आणि कृषी विषयक तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीमध्ये घेतल्या जात नाहीत. अभियांत्रिकी विषयांची पुस्तके मराठीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे या परीक्षा इंग्रजी भाषेत घेतल्या जातात. पण, आता अभियांत्रिकी शिक्षणही मराठी भाषेत घेण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाची पुस्तके आता मराठी भाषेत उपलब्ध होणार आहेत. त्या अनुषंगाने अभियांत्रिकी परीक्षांचा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार करून सर्व तांत्रिक पदांच्या स्पर्धा परीक्षाही मराठीमध्ये घेण्याचे नियोजन शासनाने केले असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली.



## होळी व अंतिम संस्कारावेळी लाकडाऐवजी गोकाष्ठ व देशी गाईच्या गौऱ्याचा वापर व्हावा

**आरडीसी कुंभार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

होळी सण आणि अंतिम संस्कारावेळी लाकडांऐवजी देशी गाईच्या गौऱ्यांचा व गोकाष्ठाचा वापर केल्यास त्या गोशाळांची आर्थिक सुधारणा होईल. याबाबतचे नवेदन सोलापूर विकास मंच सदस्य केतन शहा यांनी आरडीसी मनिषा कुंभार यांना दिले .

या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यात गोशाळा असून, त्या गोशाळामधून ३ हजार ७५ गोवंशांची देखभाल केली जाते. होळी व अंतीम संस्कारावेळी लाकडाऐवजी देशी गाईच्या गौऱ्या व गोकाष्ठ यांचा वापर करावा. या व्यतिरिक्त महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९६०, १९७६ तसेच सुधारीत अधिनियम १९९५ च्या अनुषंगाने ४ मार्च २०१५ कायद्याची अंमलबजावणी कडकपणे चालू असल्याने पोलिस विभागाकडून न्याय वैद्यक गुन्हयात जप्त केलेली जनावरे गोशाळामध्ये दाखल केली जातात. गो वंशाचा ओघ मोठया प्रमाणावर गो-शाळांकडे वाढला असून, गोशाळांची आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सदरची जनावरे संपूर्ण भाकड असतात यां गोमातेचे रक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असून, जिकीरीचे बनले आहे.

त्याकरिता अंतिम संस्कार आणि होळी सण यासाठी लाकडाऐवजी देशी राज्य गोमाता शेणापासून तयार केलेली गौरी व गोकाष्ठाचा वापर केल्यास कार्बनचे प्रमाण कमी होऊन पर्यावरण स्वच्छ राखण्यासाठी मदत होईल. यावेळी विश्व हिंदू परिषद जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे महाराज, जय संतोषी माता गोशाळेचे डॉ. राजेंद्र गाजूल, संतोष शिर्के, विजय महिंद्रकर, हिंगुलअंबिका देवस्थान अध्यक्ष या वेळी उपस्थित होते.

## सर्पदंश झालेल्या रुग्णाने रुग्णालयातून काढला पळ

**सोलापूर, दि.१२ मार्च-**

सर्पदंश झाल्यानंतर उपचाचारास दाखल झालेल्या रुग्णाने रुग्णालयातून पळ काढला. हा प्रकार रविवारी रात्री ११ च्या सुमारास उघडकीस आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. बन्सी सिताराम गुंगेवाले (वय ३६, रा. लष्कर) असे रुग्णाचे नाव आहे. बन्सी हा हगलूर परिसरात बांधकामावर काम करत होता. रविवारी सायंकाळी ५.३० वाजता कामाच्या ठिकाणी त्याच्या डाव्या पायाला सर्पदंश झाला. नातेवाईक गुरू ब-हाणपुरे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी तो शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. परंतु ११ च्या सुमारास तो रुग्णालयातून पळून गेला.

# पंकजा मुंडे व सुरेश धस यांच्यामध्ये तू तू- मैं मैं जोरात

## दोघांचाही पक्षश्रेष्टीकडे तक्रार करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१२ मार्च-**

गेल्या काही महिन्यापासून राज्यात सातत्याने चर्चेत व वादाच्या पडलेल्या बीड जिल्ह्यातील भाजपातील नेत्यांमधील संदोपसदी आता उघडपणे चव्हाट्यावर आली आहे. मंत्री पंकजा मुंडे व आष्टीचे आमदार सुरेश धस यांच्यात आत्तापर्यंत अंतर्गत सुरू असलेला कलहाने आता उघड स्वरूप घेतले आहे.

सुरेश धस हे जाणीवपूर्वक आपली व पक्षाची सातत्याने बदनामी करत असून त्यांना पक्षश्रेष्ठींनी समज द्यावी अशी मागणी केली आहे. तर धस यांनी मुंडे या आपल्यावर कोठे आरोप करत असून विधानसभेत त्यांनी पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात प्रचार केला होता.त्यांच्याबाबत आपण पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले. प्रचंड बहुमताने सत्तेत असलेल्या भाजपातील या दोन प्रमुख नेत्यांमध्ये उघडपणे जिंकल्याने विरोधकांनीही त्यावर हल्ला



चढवला आहे विधानसभेत जिल्ह्यातील व जनतेचे प्रश्न मांडण्याऐवजी हे नेते आपल्या स्वार्थासाठी भांडत असून त्यामुळे भविष्यात या सरकारचा काय होईल, हे सांगता येत नाही असा टोला त्यांनी लगावला.मस्तजोक चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणीमुळे बीड जिल्हा गेल्या तीन महिन्यापासून सातत्याने वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मिकी कराड यांच्याशी असलेले घनिष्ठ संबंध व अन्य विविध भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे मंत्री धनंजय मुंडे यांना या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी राजीनामा द्यावा लागला. त्यासाठी सुरेश धस हे सातत्याने पाठपुरावा करत होते धनंजय मुंडे यांच्याबरोबरच त्यांची बहीण व मंत्री पंकजा यांच्यावरही त्यांची अप्रत्यक्ष टीका करत होते .मात्र पंकजा मुंडे यांनी एका उपपत्राला दिलेल्या मुलाखतीत सुरेश धस यांच्यावर उघडपणे टीका केली त्यांनी जाणीवपूर्वक परळी मतदारसंघ व माजी आणि पक्षाची बदनामी सुरू केली आहे.देशमुख प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी सखोल तपासाचे ग्वाही दिली असतानाही सातत्याने हे प्रकरण माध्यमांमध्ये चर्चेत ठेवले. त्यामुळे पक्षाचे व जिल्ह्याची बदनामी झाली आहे त्या विरोधात पक्षश्रेष्ठीकडे तक्रार केली असून त्यांनी त्यांना समज द्यावी ,अशी मागणी करीत नेहमी कॅमेऱ्यावाल्यांना सोबत घेऊन फिरणाऱ्या धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट गुपचूपपणे का घेतली होती ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

त्यांच्या टीकेवर सुरेश धस यांनीही विधिमंडळाच्या आवारात पत्रकारांशी बोलताना जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले,' मी पंकजा किंवा अन्य कुणाचीही बदनामी करत नाही. तर बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक गुन्हेगारी, खंडणी, खून ,मारामारीचे प्रकार हे परळीमध्येच घडत आहेत त्यामुळे तेथील गुन्हेगारीला लगाम घालणे,जरुरी आहे त्याच्या पाठीशी असणाऱ्या सर्वावर कारवाई झाली पाहिजे, अशी आपली मागणी आहे. देशमुख हत्याप्रकरणातील आरोपींना फासावर लटकवीत भटकेपर्यंत आपले लढाई चालूच राहणार असल्याचे सांगून ते म्हणाले की पंकजा यांनी विधानसभेत पक्षाच्या उमेदवाराऐवजी शिट्टी चिन्ह असलेल्या उमेदवाराचा प्रचार केला होता, मी आत्तापर्यंत संयम बाळगला होता पण आता त्यांच्याविरोधात पक्षश्रेष्ठीकडे तक्रार करणार आहे ,असेही सांगितले. तर पंकजा मुंडे यांनी मी जर विधानसभेत त्यांचा प्रचार केला नसता तर ते निवडून आले नसते, असे सांगत त्यांनीच लोकसभा निवडणुकीवेळी आपल्याला मदत केली नसल्याचा आरोप केला.

**जिल्ह्यातील संघर्ष अधिवेशनात चव्हाट्यावर**

पंकजा मुंडे व सुरेश धस यांच्यात सुरू असलेल्या अंतर्गत संघर्ष मुळे सत्ताधारी भाजपाचे पंचायत झाली आहे. अधिवेशनात जनतेचे प्रश्न हाताळायचे असताना दोन्ही नेते जिल्ह्यातील राजकारण चव्हाट्यावर आणत एकमेकांवर आरोप- प्रत्यारोप करत आहेत. त्यामुळे विरोधकांना आयते कोलीत मिळाले आहे यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य वरिष्ठ नेते या दोघांनी त्यांची कशी समजूत काढतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## शक्तीपीठ महामार्गामुळे महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१२ मार्च-**

शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा महामार्ग नागपूरपासून सिंधुदुर्गपर्यंत १२ जिल्ह्यांमधून जाणार असून, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शक्तीपीठांना जोडणारा आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासाला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

ते म्हणाले की , जसे समृद्धी महामार्गामुळे १२ जिल्ह्यांचे जीवनमान बदलले, त्याचप्रमाणे शक्तीपीठ महामार्गामुळेही मोठे परिवर्तन घडेल. या महामार्गामुळे राज्यातील विविध भागांची सुलभ आणि वेगवान वाहतूक व्यवस्था निर्माण



होईल, ज्यामुळे व्यापार आणि उद्योगांना गती मिळेल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतःहून या महामार्गासाठी जागा देण्याची तयारी दाखवली आहे. कोल्हापूरच्या एअरपोर्टवर त्यांना एक हजार शेतकऱ्यांचे निवेदन मिळाले, ज्यात महामार्गाचे समर्थन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी चर्चा करू, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पण हा महामार्ग महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे आणि तो होणारच, असे त्यांनी ठामपणे सांगितले. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले की, दिल्ली-मुंबई ग्रीनफिल्ड महामार्ग का तयार करण्यात आला याचेच हे उत्तम उदाहरण आहे. ज्या भागांकडे आजवर दुर्लक्ष झाले होते, त्या भागांचा विकास करण्यासाठी ग्रीनफिल्ड महामार्ग हे योग्य माध्यम आहे.अमेरिकन अध्यक्षांचे वाक्य आहे - अमेरिका श्रीमंत आहे कारण तेथे चांगले रस्ते आहेत. आपण महाराष्ट्राचाही हा विकास साधणार आहोत, असे त्यांनी नमूद केले. शक्तीपीठ आणि औद्योगिक केंद्रे जोडली जातील. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील उद्योगांना चालना मिळेल.राज्यातील वाहतुकीचा वेग आणि सुविधा सुधारतील.पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. शेतकऱ्यांना अधिक चांगल्या रीतीने बाजारपेठेपर्यंत पोहोचता येईल.हा केवळ रस्ता नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल आहे.

## जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १२ मार्च:**

राज्यातील जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेमध्ये केले.

आ. शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले,'जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असतात .कोणीही अशा प्रकारे जादा व्याज देऊ शकत नाही.

बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते चार टक्के जास्ती व्याज दिले जाणे शक्य आहे. पण त्यापेक्षा जास्त किंवा भरघोस व्याज देणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे असे जादा व्याजाचे अमिष देणाऱ्या योजना फसव्याच असतात. त्यांच्या अमिषाला जनतेने बळी पडू नये आणि अशा फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करू नये, तसेच प्रश्नाला उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, राज्यातील गुंतवणूक तसेच अर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांवर देखरेखीसाठी इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटची स्थापना करण्यात येत आहे. तसेच टोरेस प्रकरणी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## शहरातील सर्व प्राथमिक शाळा आजपासून सकाळच्या सत्रात

**मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी गिरीश पंडित यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार महानगरपालिका अंतर्गत मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अधिकारीक्षेत्रातील सर्व माध्यम, सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात, असे परिपत्रक महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांनी काढले आहे.



उन्हाची तीव्रता वाढल्याने १३ मार्चपासून सकाळच्या सत्रात सकाळी ७.३० ते १२.३० या वेळेत भरविण्यात याव्यात तसेच शनिवार अर्धवेळ शाळा या सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत भरविण्यात याव्यात, असे परिपत्रकाद्वारे सर्व मुख्याध्यापकांना सुचित करण्यात आले आहे. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासनाने तातडीने या संदर्भात सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याचा निर्णय घेतला. ही समाधानकारक आणि स्वागतार्ह बाब आहे, अशी भावना महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना मनपा शाखा अध्यक्ष नागेश गोसावी यांनी व्यक्त केली.



## राष्ट्रीय तंत्रपरिषद विचारमध्ये सिंहगड इन्स्टिट्युटची हॅटट्रिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये दोन दिवसीय पंधराव्या राष्ट्रीय तंत्रपरिषद विचार २०२५ मध्ये केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकाविला.

शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांकासह द्वितीय क्रमांकही सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दुसऱ्या समूहाने पटकाविला. रोख रक्कम, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रथम क्रमांकाच्या समूहात गौरी जिंदे, वैष्णवी पाटील, ललित चौधरी, प्रगती पाटील यांचा तर द्वितीय क्रमांकाच्या ग्रुप मध्ये श्रेयस आडम, निखिल घोडके, प्रतीक्षा वडनाल यांचा समावेश होता.

शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेत पहिल्या आणि द्वितीय क्रमांक सिंहगड इन्स्टिट्यूटने पटकाविला. या यशाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**टाकळी सिकंदर येथे निकृष्ट दर्जाचा रस्ता केल्याप्रकरणी कारवाई करा, अन्यथा**

## कॅनॉलमध्ये जलसमाधी आंदोलनाचा इशारा

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

मौजे मोहोळ तालुक्यातील मौजे टाकळी सिकंदर येथील रस्ता निकृष्ट दर्जाचा करण्यात आला आहे. उर्वरित निधी हा संबंधित अधिकाऱ्यांनी वापरला असल्याचा आरोप करत याप्रकरणी संबंधितांना बडतर्फ करावे. मागणीसाठी दि.१३ मार्चला टाकळी सिकंदर येथील कॅनॉल मध्ये जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा अक्षय गायकवाड यांनी दिला आहे.

या गावात अनुसूचित जाती जमाती नवबौद्ध घटक योजनेअंतर्गत दलित वस्ती सुधारणा मधील गायकवाड वस्ती तीन दार ते कारखाना पोहोच रस्ता पर्यंतचा रस्ता हा सिमेंट काँक्रिटीकरण न करता फक्त खडीकरण व मुरमीकरण असा निकृष्ट दर्जाचा केला आहे. संबंधित ठेकेदार संस्था, सेक्शन इंजिनियर, कनिष्ठ अभियंता यांनी हा निधी परस्पर वापरला आहे. याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी. संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकावे. या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे अक्षय गायकवाड यांनी स्पष्ट केले. अशाच पद्धतीने विविध विकास कामातही संगनमतातून काम न करता निधी उचलला असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या पत्रकार परिषदेस केराप्पा सोनटक्के, ज्ञानेश्वर कसबे, अविनाश गायकवाड, दमन चव्हाण आदी उपस्थित होते.

# जड वाहतुकीसाठी रिंग रोड, ४० हजार घरकुले अन् समतोल धान्य वितरणाची आ.कोठेंची विधानसभेत मागणी

- विमानतळाला द्यावे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांचे नाव
- पर्यटन धोरणात व्हावा सोलापूर जिल्ह्याचा समावेश
- सोलापूरच्या विकासाकडे आ. देवेंद्र कोठे यांनी वेधले शासनाचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

जड वाहतुकीमुळे दर आठवड्याला होणारे मृत्यू थांबवण्यासाठी रिंग रोड, प्रधानमंत्री आवास योजनेतून भटक्या विमुक्त जमातींसाठी ४० हजार घरकुले आणि अन्न योजनेतील धान्यापासून वंचित असलेल्या सर्व एक लाख सोलापूरकरांना समान पद्धतीने धान्य वितरण व्हावे, तसेच सोलापूरच्या विमानतळाला ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांचे नाव द्यावे, महाराष्ट्र टेक्निकल टेक्स्टाईल मिशनमध्ये सोलापूरचा प्राधान्याने समावेश करावा, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरणामध्ये धार्मिक पर्यटनाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्याचा समावेश व्हावा, सोलापूर जिल्ह्याला उमेद भवन मिळावे अशा मागण्या आमदार देवेंद्र कोठे यांनी मंगळवारी रात्री उशिरा विधानसभेत केल्या. अर्थसंकल्पावरील चर्चेवेळी रात्री तब्बल ११.३० वाजेपर्यंत सभागृहात थांबून आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरकरांच्या विकासकामांकडे शासनाचे लक्ष वेधत कार्यतत्परता दाखवली.

आ. कोठे म्हणाले, सोलापूर शहर कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशच्या सीमेवर असल्यामुळे या तीनही राज्यातील जड वाहतूक सोलापूर शहरातून जाते. परिणामी, जड वाहतुकीमुळे दर आठवड्याला २ जणांचा मृत्यू होत आहे. त्यामुळे यावर उपाय म्हणून जड वाहतूक शहराबाहेरून नेण्यासाठी केगाव, कासेगाव, दोड्डी, कुंभारी, हत्तुर असा रिंग रोड होणे गरजेचे आहे. सुरत - चेन्नई ग्रीनफिल्डमध्ये या रस्त्याचा समावेश झालेला आहे. परंतु या कामाची अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे याचा प्राधान्याने विचार करून सोलापूर शहरातील जड वाहतूक कायमस्वरूपी बंद होण्यासाठी आणि गोरगरिबांचे मृत्यू थांबवण्यासाठी शासनाने अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५- २७ मध्ये रिंग रोडची तरतूद करावी. वस्त्रोद्योग आणि आयटी क्षेत्रासाठी सोलापूरमध्ये चांगली क्षमता आहे. त्यामुळे या क्षेत्रातील अधिकाधिक कंपन्या सोलापुरात याव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी यावेळी केली. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण, रेल्वे मार्ग, महामार्ग, कुशल कामगार वर्ग आहे. महाराष्ट्र शासनातर्फे स्थापन होऊ घातलेल्या टेक्निकल टेक्स्टाईल मिशनमध्ये सोलापूरचा समावेश प्राधान्याने करावा, असेही आमदार कोठे म्हणाले.



सोलापूर विमानतळावरून प्रवासी वाहतूक सुरू व्हावी याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घातले आहे. त्यामुळे अल्पावधीतच सोलापूरची विमानसेवा सुरू होईल. सोलापुरातून प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर विमानतळाला ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांचे नाव देण्यात यावे, अशी आग्रहाची मागणीही कोठे यांनी केली. सोलापुरातील गोरगरिबांसाठी अत्यावश्यक बाब असलेल्या घरकुलांचा प्रश्नही आमदार देवेंद्र कोठे यांनी विधानसभेत मांडला. प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात भटक्या विमुक्त जमातींसाठी सेटलमेंट परिसरात प्रस्तावित असलेल्या ४० हजार घरकुलांच्या योजनेला शासनाने प्राधान्याने मान्यता द्यावी, याकडे आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाचे लक्ष वेधले.

राज्य शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत निकषात बसणाऱ्या सर्वांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळणे अपेक्षित असतानाही सोलापुरातील एक लाख नागरिकांना धान्य मिळत नाही. त्यामुळे शासनाने समतोलपणे धान्य वितरण करावे, अशी भूमिका आमदार देवेंद्र कोठे यांनी घेतली. प्रत्येक जिल्ह्याला एक उमेद भवन उभारण्याकरिता १० जिल्ह्यांची निवड शासनाने केली आहे. त्याकरिता १५० कोटींची तरतूदही करण्यात आली आहे. यात सोलापूर शहराचा विचार प्राधान्याने व्हावा, असे आमदार कोठे याप्रसंगी म्हणाले.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरणामुळे आगामी दोन वर्षात राज्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. सोलापूर शहर हे अक्कलकोट, पंढरपूर आणि तुळजापूर अशा देवस्थानांना जोडणारे शहर आहे. त्यामुळे सोलापूर शहरात धार्मिक पर्यटनाला मोठा वाव आहे. त्याकरिता महाराष्ट्र शासनाने पर्यटन धोरणामध्ये सोलापूर शहराचा विचार करावा, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी सभागृहात केली.

**मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कौतुक आणि विकासाची हमी**

आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरच्या विकासकामांबाबत शासन दरबारी मांडलेल्या विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार देवेंद्र कोठे यांचे प्रत्यक्ष भेटीत कौतुक केले. सोलापूर शहराच्या संपूर्ण विकासासाठी लागेल ती सर्व मदत करण्याची हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना दिली.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# क्लिष्ट कायद्याचे सुलभीकरण स्वागतार्ह

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी संसदेत अर्थसंकल्प सादर करताना नवीन प्राप्तिकर विधेयकाची घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने हे नवीन प्राप्तिकर विधेयक मंजूर केले. ते अलिकडेच लोकसभेत सादर झाले. ते वित्तविषयक स्थायी समितीकडे पाठवले जात आहे. या विधेयकाची वैशिष्ट्ये जाणून घेतली पाहिजेत. प्राप्तिकर कायदा-१९६१ मध्ये सुधारणा करून विधेयक आणण्यासाठी अर्थ मंत्रालयाने बराच काळ काम केले आहे. या कायद्याच्या विविध पैलूंचा आढावा घेण्यासाठी २२ विशेष उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. सर्वसामान्य जनता आणि करदात्यांना या कायद्याबाबत आपल्या सूचना देण्यासाठी ऑनलाईन पोर्टलही उघडण्यात आले होते. पोर्टल उघडल्यानंतर ऑक्टोबरमध्ये अर्थ मंत्रालयाला ६५०० हून अधिक सूचना प्राप्त झाल्या. यासोबतच उद्योगांकडून सूचनाही मागवण्यात आल्या होत्या. आता या सूचनांच्या आधारे प्राप्तिकर कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. प्राप्तिकर कायद्यातील दुरुस्तीचा मसुदा तयार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. अंतिम फेरीत उद्योगांकडून सूचनाही मागवण्यात आल्या आहेत; जेणेकरून त्यांचाही समावेश करता येईल.

नवीन आयकर विधेयक, २०२५ हा एक प्रस्तावित कायदा आहे. त्याचा उद्देश भारताची आयकर प्रणाली सुलभ आणि आधुनिक करणे आहे. प्राप्तिकराचा कायदा १९६१ मध्ये तयार झाला, त्यावेळी त्यात २९९ कलमे होती. मात्र वर्षानुवर्षे यात नवी कलमे समाविष्ट करण्यात आल्याने वाढून ती ८१९ झाली. नवीन आयकर विधेयक आता ५६१ कलमांचे आहे. या विधेयकाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल, अशी शक्यता आहे. त्या पद्धतीची शिफारस करण्यात आली आहे. स्थायी समिती तसेच, संबंधित अन्य व्यक्तीच्या सूचना येण्यास वेळ लागू शकतो, हे लक्षात घेऊनच ही तारीख निश्चित करण्यात आली असावी. नवीन प्राप्तिकर विधेयक, २०२५ भारताच्या करप्रणालीचे आधुनिकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करते. ते जुना प्राप्तिकर कायदा, १९६१ ची जागा घेईल. सोपी कायदेशीर भाषा, कमी कर स्लॅब आणि विश्वासावर आधारित स्व-मूल्यांकन यासारख्या महत्त्वाच्या सुधारणा त्यात आहेत. व्यवसाय आणि वैयक्तिक करदात्यांना फायदा होत असताना अनुपालन वाढवणे, खटले कमी करणे आणि आर्थिक वाढीस चालना देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे, हे महत्त्वाचे. शिवाय, कर कायद्यांमध्ये अधिक स्पष्टता प्रदान करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या अनेक प्रमुख सुधारणांवर हे विधेयक लक्ष केंद्रित करते. ही नवीन आयकर विधेयक २०२५ ची उद्दिष्टे आणि प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. कर कायदे समजून घेणे सोपे करण्यासाठी साधी आणि स्पष्ट भाषा वापरणे हे विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट सांगता येईल. यद्वारे कायदेशीर भाषेचे सर्वसामान्यांना समजेल, असे सरलीकरण केले जाईल. यामुळे विशेष कायदेशीर ज्ञानाची गरज कमी होईल. परिणामी, करदात्यांना अधिक आत्मविश्वासाने प्रणाली वापरता येईल. नवीन कायद्याची लांबी सध्याच्या कर कायद्यांच्या लांबीच्या अंदाजे अर्धी असणे अपेक्षित आहे. हे लहान स्वरूप अनावश्यक विभाग काढून टाकण्यास मदत करेल. यामुळे कर अधिकारी आणि करदात्यांना माहितीवर प्रक्रिया करणे अधिक जलद आणि अधिक कार्यक्षम होईल. या विधेयकाद्वारे कोणतेही नवीन कर लादले जाणार नाहीत, परंतु विद्यमान कर कायदे सुलभ करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल, याची खात्री वाटते. व्यक्ती आणि व्यावसायांसाठी कर प्रणाली स्थिर, अंदाज लावता येण्याजोगी आणि कमी ओझे असणारी असेल याची खात्री करणे हा त्याचा उद्देश आहे. हे विधेयक राष्ट्रीय अर्थसंकल्पात जाहीर केलेले महत्त्वपूर्ण करबदल एकत्रित करेल. त्यात आयकर दर आणि (स्रोतावर कर वजा) तरतुदींचा समावेश आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी केलेल्या तरतुदींमध्ये आयकर विधेयक, २०२५ च्या कलम १५३, आयकर कायदा १९६१ अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना कलम ८० अंतर्गत बँक आणि पोस्ट ऑफिसमधील ठेवींमधून मिळणाऱ्या व्याजावर पन्नास हजार रुपयांपर्यंत वजावट मिळण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे, सामान्य नागरिक कलम ८० अंतर्गत बचत खात्यातील ठेवींमधून मिळालेल्या व्याजावर दहा हजार रुपयांपर्यंतच्या कपातीचा दावा करू शकतात. तसेच, ज्येष्ठ नागरिक बचत खाती आणि बँक, पोस्ट ऑफिस आणि सहकारी बँकांमधील मुदत ठेवींमधून कमावलेल्या व्याज उत्पन्नावर पन्नास हजार रुपयांच्या करकपातीचा दावा करण्यास पात्र आहेत, ही आनंदाची बाब म्हटली पाहिजे.

आयकर विधेयकाने सध्याच्या आयकर कायद्यातील ३०० हून अधिक तरतुदी, जसे की कलम ८० सीसीए (राष्ट्रीय बचत योजनेतील गुंतवणुकीसाठी वजावट), कलम ८० सीसीएफ (दीर्घकालीन पायाभूत सुविधा बॉण्डमधील गुंतवणुकीसाठी वजावट) काढून टाकल्या आहेत. त्या कालांतराने अनावश्यक झाल्या होत्या किंवा हटवण्यात आल्या होत्या. नवीन विधेयक पगार, व्यावसायिक शुल्क, व्याज उत्पन्न आणि भाडे यासारख्या विविध उत्पन्न स्रोतांवर टीडीएस नियमन लादण्याचे सुचवते. याव्यतिरिक्त, मद्य, तेंदूपत्ता, खनिजे, भंगार साहित्य, दहा लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची मोटार वाहने आणि सात लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम कर परदेशी पाठवणे यासह विशिष्ट व्यवहारांवर लागू केला जाईल, हेही महत्त्वाचे आहे. नवीन आयकर विधेयक हे प्राप्तिकर कायदा, १९६१ सुलभ करण्यासाठी आवश्यक आहे. यातील २९८ पेक्षा जास्त विभाग आणि २३ अध्याय नेव्हिगेट करणे कठीण जाते. आयकर कायद्यातील अस्पष्ट तरतुदींमुळे अनेकदा करदाते आणि अधिकारी यांच्यात वाद निर्माण होतात. मर्यादित कर आधारामुळे अनौपचारिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात वापर होत नाही. त्यामुळे महसूल कार्यक्षमता कमी होते. २०१२-१३ पूर्वी सादर केलेल्या अनेक विभागांनी आजच्या आर्थिक परिस्थितीमध्ये कालबाह्य तरतुदींमुळे प्रासंगिकता गमावली आहे. सध्याच्या इन्कम टॅक्स कायद्यातील इंग्रजी शब्द, नियमांमध्ये वापरली जाणारी भाषा खूपच गुंतागुंतीची असून हे नियम आणि तरतुदी सामान्य माणसाला समजत नाहीत, हे वास्तव आहे.

विधेयकामध्ये सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत नियम समजवण्याची तरतूद असेल. व्यवसाय आणि महामंडळांना चांगल्या आर्थिक नियोजनासाठी नवीन विधेयकातील तरतुदी कामी येतील. करकायद्यांची सुस्पष्टता, संरचित करकायद्यांचे ओझे कमी होईल. वैयक्तिक करदात्यांपासून कॉर्पोरेट क्षेत्रापर्यंत सगळ्यांना अनावश्यक तरतुदींपासून मुक्ती मिळण्याची शाश्वती या विधेयकामुळे वाटत आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. नव्या कायद्यानुसार छोट्या प्रकरणांमध्ये करदात्यांना नोटिसा बजावल्या जाणार नाहीत. आजघडीला प्राप्तिकर कायद्यात अशा अनेक तरतुदी आहेत. करदात्याला विवरणपत्र भरताना बरीच प्रक्रिया ऑनलाईन करावी लागते. आता अशी कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता भासणार नाही. नवीन विधेयकाचे हे सकारात्मक परिणाम करदात्यांना दिसून येतील आणि त्यांचे स्वागत केले जाईल, अशी जी अपेक्षा सरकारला आहे, ती खरी ठरेल. ती स्वागतार्ह आहे. कालौघात अनेक क्लिष्ट कायद्यांच्या बाबतीत अशा प्रकारचे बदल घडत आहेत. न्याय संहितेतही आपण असे बदल अनुभवले. तसेही प्राप्तिकर खात्याच्या नोटिसा आणि काही कडक नियम अनेक जणांच्या नाराजीचे मोठे कारण असते. निर्धारित केलेला कर नीट भरूनही काही नोटिसा निघत असल्याने अनेक सामान्यजन त्रस्त असतात. यामागे सरकारी कार्यालयांचे खेटे घालण्याबाबत विशेष नाराजी असते. सरकारी मागणी चुकीची असते, असे नाही; मात्र अनेकदा ती गैरसमजातून आणि नियमांच्या तांत्रिक स्वरूपामुळे असते. यामुळे सामान्यजनांचा वेळ जातोच, शिवाय, कामे करून घेण्यासाठी, वेळ वाचवण्यासाठी अनेकदा मनस्ताप सहन करावा लागतो. या पृष्ठभूमीवर क्लिष्ट कायद्याचे सुलभीकरण स्वागतार्ह आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# इस्लामोफोबिया डे नव्हे, हा तर...!

संयुक्त राष्ट्र संघाने २०२२ मध्ये दरवर्षी १५ मार्च हा दिवस जगभर 'इस्लामोफोबिया कॉम्बॅट डे' म्हणून साजरा करण्यात यावा, असा एक ठराव पारित केला. हा दिवस, मुस्लिम घृणा संघर्ष दिवस म्हणून साजरा करण्यास कारण जगभरात इस्लाम धर्मीयांबद्दल इतर धर्मीय लोक प्रकट करीत असलेल्या घृणा आणि तिरस्कार या भावना कारणीभूत आहेत, असे संयुक्त राष्ट्र संघाचे म्हणणे आहे. ६० सदस्य संख्या असलेल्या 'मुस्लिम सहकार्य गटाने' मांडलेल्या प्रस्तावाला मान्यता देत 'मुस्लिम घृणा संघर्ष दिन' साजरा करण्याचे जगातील सर्व देशांना जणू संयुक्त राष्ट्र संघाने अनिवार्य केले आहे. अर्थात आता जगभरात, १५ मार्च मुस्लिम घृणा संघर्ष दिवस म्हणून साजरा करण्यात येईल. तसेच आतंकवाद अथवा हिंसक उग्रवाद हा कोणत्याही धर्म, राष्ट्रीयता अथवा संस्कृतीशी जोडला जाऊ नये म्हणून सर्व सदस्य राष्ट्रांनी आपापल्या देशात कायदे करावेत, अशी राष्ट्र संघाची अपेक्षा आहे. प्रश्न भारतासारख्या बहुधर्मीय पण स्वतःला धर्मनिरपेक्ष मानणाऱ्या आणि चुकीच्या पद्धतीने तथाकथित धर्मनिरपेक्षता राखण्यासाठी कायदे करणाऱ्या पण इस्लामिक आतंकवादाने होरपळलेल्या देशांचा आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकीत फ्रान्स, बेल्जियम, यूके, भारत यांनी फक्त 'इस्लामोफोबिया' किंवा 'इस्लाम आणि पवित्र पुस्तक' या शब्दाऐवजी 'रिलिजिओफोबिया' हा शब्द वापरावा म्हणून आग्रह धरला होता, परंतु ही शब्द सुधारणा फेटाळण्यात आली. ही शब्द सुधारणा करावी असे वरील देशांना वाटत होते. कारण बहुधर्मीय देशांमधील सामाजिक, आर्थिक वा राष्ट्रीय सुरक्षेसंबंधित वातावरण हे इतर देशांतील वातावरणापेक्षा संपूर्णपणे वेगळे आहे. आज संयुक्त राष्ट्र संघ आणि अगदी इस्लामिक व ख्रिश्चन राष्ट्रांनी 'धर्म तटस्थता' पाळली पाहिजे. पण असे घडताना दिसत नाही. मागील दोन वर्षांत फ्रान्स, बेल्जियम, यूके आणि भारत या देशांमध्ये इस्लामिक जनसमुदायाने घडवून आणलेल्या दंगली अनेक गोष्टींचा पुन्हा विचार करण्यास उद्युक्त करतात. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सभासद असलेल्या भारतासारख्या बहुधर्मीय देशांतील नागरिकांनी प्रथम मुस्लिम घृणा अर्थात इस्लामोफोबिया या शब्दाचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे.

इस्लामोफोबिया म्हणजे इस्लाम धर्म किंवा सरसकटपणे मुस्लिम धर्म व धर्मीयांबद्दल भीती, द्वेष किंवा पूर्वग्रह. विशेषतः जेव्हा मुस्लिम धर्म आणि जनसमुदायाकडे भू-राजकीय शक्ती किंवा दहशतवादाचा स्रोत म्हणून पाहिले जाते, तेव्हा निर्माण होणाऱ्या तिरस्कार, घृणा व भीतीचा अर्थ इस्लामोफोबिया असा घेतला जातो. काही विद्वानांच्या मते इस्लामोफोबिया हा द्वेषपूर्ण भाषणे, भेदभाव आणि मुस्लिमविरोधी हिंसाचाराच्या रूपात दिसून येतो. अशा प्रकारचा हिंसाचार, भेदभाव आणि मुस्लिमविरोधी वर्तन हे मुस्लिमांच्या मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन असून त्यामुळे मुस्लिम देशांमध्ये



अस्वस्थता निर्माण होत आहे. तर, काही विद्वानांच्या मते, हा दिवस अकारण एका विशिष्ट धर्माच्या बाजूने आपला आवाज उठवतो आहे तसेच इतर धर्मीयांवरील अत्याचार मात्र यामुळे दुर्लक्षित होण्याची मोठीच शक्यता आहे. हा दिवस जागतिक पातळीवर साजरा करण्यामुळे इतर सर्व धर्मांविरोधात होणारा द्वेष आणि हिंसाचार यांचे गांभीर्य दुर्लक्षित होण्याची शक्यता आहे. नुकत्याच बांगलादेशातील हिंदुविरोधी हिंसाचाराच्या घटना याचे ज्वलंत उदाहरण होय. मुस्लिम देशांची राष्ट्र संघात असलेली संख्या मुस्लिम घृणा संघर्ष दिवस, आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होण्यास कारणीभूत आहे. हा दिवस भारतासारख्या बहुधर्मीय देशांमध्ये राष्ट्र संघाच्या दबावाखाली साजरा होणार आहे. विविध देशांतील मुसलमान, आश्रयासाठी इस्लामेतर देशांमध्येच स्थलांतर का करतात, हा एक प्रश्नच आहे. हमास या अतिरेकी संघटनेने इस्रायली नागरिकांच्या केलेल्या अपहरणामुळे संतापलेल्या इस्रायलने गाझापट्टीवर हल्ला केल्यानंतर, पॅलेस्टाईन मुस्लिम लोकांना गाझापट्टीच्या भोवताली असणारे इस्लामिक देश आसरा देण्यास का तयार नव्हते, यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर वा संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिसभेत चर्चा व्हायला हवी होती. मात्र या विषयावर चर्चा का झाली नाही. संयुक्त राष्ट्र संघ एकप्रकारे या दिवसाच्या माध्यमातून मुस्लिम समाजाला आणि धारणांना संरक्षण देताना दिसतो. पण जागतिक समुदायामध्ये इस्लामविषयी घृणा निर्माण होण्याची जी कारणे आहेत ती नाहीशी झाल्याशिवाय इस्लामोफोबिया दूर करता येणार नाही.

अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील मुस्लिम अतिरेकी हल्ल्यानंतर अमेरिकन माणसांच्या मनात इस्लाम धर्मीयांविषयी घृणेत मोठी वाढ झाली, असे दिसून आले. आज विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या अतिरेकी संघटनांपैकी ९० टक्के अतिरेकी संघटना या इस्लामिक आहेत. या सर्व संघटना इस्लामेतर प्रदेशांत इस्लाम धर्म, इस्लामिक संस्कृती आणि शरिया कायदे स्थापित करू इच्छितात. कारण इस्लाम, जगाची विभागणी इस्लामवर श्रद्धा असलेले ते मोमीन आणि इस्लामवर श्रद्धा नसलेले ते काफीर अशी करतो. इस्लाम जगाची विभागणी 'दार-उल-इस्लाम' म्हणजे इस्लाम शासित प्रदेश आणि 'दार-उल-हरब' म्हणजे जेथे इस्लामिक शासन नाही असा प्रदेश, अशी करतो. आणि सगळे जग 'दार-उल-इस्लाम'मध्ये परिवर्तित करण्याचे ध्येय ठेवतो. राष्ट्र संघ मात्र इस्लामविषयी घृणा करू नये याकरिता कार्यक्रम राबविण्याचे हास्यास्पद आवाहन करताना दिसते. हे आवाहन करताना आपल्या सदस्य राष्ट्रांनी सांस्कृतिक विविधता जोपासण्यासाठी कायदे करावेत असेही सुचवते. त्याच वेळी इस्लामिक संघटना वा मुस्लिम अतिरेक्यांनी जागतिक स्तरावर प्रचंड प्रमाणात केलेला हिंसाचार दृष्टिआड करताना दिसते. भारतात तर इस्लामने धार्मिक आधारावर हिंसाचार, घृणा, मंदिरांचा विध्वंस, बलात्कार, दंगली, हिंदी भाषेला विरोध व फारसी/उर्दूचा पुरस्कार अशा सर्व प्रकारच्या अत्याचारांची परिसीमा गाठली हा इतिहास आहे. स्वतंत्र भारतातदेखील धर्म परिवर्तन, लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद असे अनेक प्रकार बॉम्बस्फोट आणि दंगलीच्या बरोबरीने चालूच आहेत. वक्फच्या द्वारे जमिनी हडपण्यात आघाडीवर असलेला मुस्लिम समुदाय वक्फ कायदा, सीएए, एनआरसी, समान नागरी कायदा अशा कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा विरोध हिंसक मार्गाने करण्याचे जाहीर करतो. फ्रान्स, स्विडन, इंग्लंड या देशांत आश्रय घेतलेला मुस्लिम समाज कोणत्या तरी फुटकळ कारणासाठी दंगली घडवून आणताना दिसतो आहे, जाळपोळ-दगडफेक करताना दिसून येतो. त्याच वेळी बांगलादेशात अल्पसंख्यक असलेल्या हिंदू समाजाला हिंसेचे लक्ष्य करताना दिसतो. जगातील प्रत्येक शहरात मुस्लिम समाजाची वस्ती वेगळी असते. मग त्या वस्तीत त्या देशाचे कायदे चालत नाहीत, तर फक्त मतलबाच्या शरिया तरतुदी लागू होतात. अशा मुस्लिम वस्त्यांमध्ये तपासासाठीदेखील त्या देशातील पोलिस यंत्रणा जाऊ शकत नाहीत. वीज चोरीपासून इतर सर्व नागरी सुविधांचा मात्र तथाकथित मानवाधिकारांच्या नावाखाली फुकट वापर करण्यात येतो. ज्या लोकशाही देशात जातील तेथे हरप्रयत्ने आपली संख्या वाढवायची आणि इस्लामिक कायदे, उपासना पद्धती यासाठी दंगली घडवून आणायच्या ही इस्लामची प्रमाणित कार्यपद्धती झालेली आहे. अब्राहमिक धर्मीय आणि विशेषतः इस्लाम धर्म मागील दोन हजार वर्षांपासून जगात जो उत्पात माजवीत आहे तो इस्लामोफोबियामागील कारण आहे. यासाठी इतर धर्मीयांनी नव्हे, तर मुस्लिम समाजाने स्वतःत मोठा बदल करणे आवश्यक आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# 'स्टील हब' विकासाचे नवे पर्व

माओवाद्यांच्या रक्तरंजित कारवायांनी गाजलेला गडचिरोली जिल्हा... कुपोषण आणि आरोग्याच्या समस्यांमुळे राज्याच्या पटलावर मागास म्हणून उमटलेला गडचिरोली जिल्हा... बेरोजगारी व उद्योगविरहित आणि विकासाच्या बाबतीत संपूर्ण राज्यात मागासलेपणाच्या यादीत अव्वल स्थानावर पोहोचलेला गडचिरोली जिल्हा, अशी ओळख असणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचे भाग्य उजळण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मुख्यमंत्री हेच गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्याचे इतिहासात पहिल्यांदाच घडले असून त्याचा फायदा निश्चितच गडचिरोली जिल्ह्याला होऊ लागला आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णयाची आणि भरीव तरतुदींची गरज आहे. ही उणीव केवळ मुख्यमंत्री असणारा पालकमंत्रीच भरून काढू शकतो आणि त्यामुळेच देवेंद्र फडणवीस या जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्याने गडचिरोलीची घोषणा 'स्टील हब' म्हणून झाली आहे. जिल्ह्याला 'स्टील हब'च्या दिशेने विकसित करण्यासाठी ५०० कोटी रुपयांच्या खनिकर्म महामार्ग प्रकल्पाची घोषणा नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

गडचिरोलीत लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि. कंपनीच्या वाढीव प्रकल्पाचे वर्षाच्या पहिल्याच दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी भूमिपूजन करून गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली आहे. मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टपैकी गडचिरोली जिल्ह्याचा विकास हे अग्रस्थानी आहे. त्या दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीच्या विकासाचे नवे पर्व सुरू केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ स्थापन करून स्थानिक बेराजगारांना संधी दिली जाणार आहे. याशिवाय दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत गडचिरोलीसाठी २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून ७ हजार ५०० नवीन रोजगाराच्या निर्मितीची अपेक्षा केली जात आहे.



लॉयड मेटल्समुळे गडचिरोलीतील शेकडो बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. याशिवाय जिल्हा स्थानावर व्यापारातही वाढ होऊ लागली आहे. तसेच येथील एमआयडीसी परिसरातील लघु उद्योजकांनाही लॉयड मेटल्सने काम देण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. लॉयड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांनी जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून गडचिरोलीच्या विकासाचा मुद्दा शासनापर्यंत पोहोचविला असून, गडचिरोलीच्या विकासात स्टील उद्योगाचे मोठे योगदान राहील, अशा सूचना देखील शासनाला केल्या आहेत. त्यामुळे शासनाने सुद्धा गडचिरोलीत नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण आणि अन्वेषणाची कामे सुरू केली आहे. गडचिरोलीच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या या घोषणांमुळे जिल्ह्यात उद्योग, वाहतूक आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील अशी अपेक्षा केली जाऊ लागली आहे. शासनाच्या एकूणच ५०० कोटींच्या खनन कॉरिडोर प्रकल्प आणि गडचिरोलीला स्टील हब म्हणून विकसित करण्याच्या दृष्टिकोनाचे लॉयड मेटल्सचे निवासी संचालक विक्रम मेहता यांनी स्वागतही केले आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक वाढ, रोजगार निर्मिती आणि सामाजिक व आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पात गडचिरोलीसाठी भरीव तरतूद करून या भागातील दारिद्र्य दूर करण्याचा सरकारचा संकल्प आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे गडचिरोलीतील प्रकल्प जलद गतीने कार्यान्वित होण्यासाठी विशेष लक्ष देत आहेत. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाधिक लक्ष देऊ असे आश्वासन सहपालकमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल यांनी दिले आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्याला मुख्यमंत्रीच पालकमंत्री म्हणून लाभले आहेत. आणि त्यांना सहकार्य करण्यासाठी सहपालकमंत्री म्हणून अ‍ॅड. आशिष जयस्वाल यांनी गडचिरोलीच्या विकासाचे शिवधनुष्य हाती घेतले आहे. गडचिरोलीच्या दीर्घकालीन समृद्धीसाठी लॉयड मेटल्स शासनाला सहकार्य करेल आणि गडचिरोलीच्या विकासासाठी लॉयड मेटल्स सुद्धा प्रयत्न करेल, अशी ग्वाही कंपनीचे निवासी संचालक मेहता यांनी दिली आहे. जो गडचिरोली जिल्हा आजवर नक्षल्यांच्या घातपाताने, अविकासाने, मागासलेपणाने देशाच्या पटलावर अव्वलस्थानी पोहोचला होता, तोच गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून अख्ख्या देशाचे लक्ष वेधून घेत आहे. गुंतवणूकदारांचा लोंढा आता गडचिरोलीच्या दिशेने वाढू लागला आहे आणि हेच खऱ्या अर्थाने गडचिरोलीच्या विकासाची नांदी ठरेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# प. बंगालमध्येही २०२६ मध्ये कमळ फुलणार?

देशातील १४ राज्यांत सध्या भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. रालोआतील मित्रपक्षांच्या मिळून मुख्यमंत्र्यांची संख्या दीड डझनापेक्षा जास्त होते. याचाच अर्थ सध्या देशातील अध्यपिक्षा जास्त राज्यांत भाजपा आणि मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत. दिल्लीत भाजपाच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेतल्यानंतर आता बिहार विधानसभा निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. बिहारमध्ये मुख्यमंत्री जदयूचा असला किंवा भाजपाचा असला तरी तो रालोआचाच राहणार, याबाबत शंका नाही.

देशातील उत्तरेकडील बहुतांश राज्यात भाजपाचे मुख्यमंत्री असले तरी दक्षिणेकडील पाचपैकी सध्या एकाही राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री नाही. विधानसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री होता. कर्नाटकवगळता दक्षिणेतील अन्य कोणत्याही राज्यात भाजपाला आतापर्यंत सत्ता मिळवता आली नाही. कर्नाटकात मात्र भाजपाने दोन-तीनवेळा सत्ता मिळवली, येदियुरप्पा हे राज्यातील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री होते, तर एस. आर. बोम्मई हे दुसरे.

दक्षिण भारतात कर्नाटक वगळून केरळ, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या चार राज्यांत भाजपाला आतापर्यंत एकदाही सत्ता मिळवता आली नाही. त्यामुळे कर्नाटकला भाजपाचे दक्षिण भारतातील प्रवेशद्वार म्हटले जाते. आंध्रप्रदेशात भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या तेलगू देसमचे एन. चंद्राबाबू नायडू हे मुख्यमंत्री आहेत. म्हणजे दक्षिण भारतातील पाचपैकी एकाच राज्यात सध्या रालोआचा मुख्यमंत्री आहे. उर्वरित चार राज्यांत भाजपा वा रालोआ सत्तेपासून दूर आहे. दक्षिण भारतातील केरळ, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू वगळता देशात आणखी काही राज्ये अशी आहेत, ज्याठिकाणी भाजपाचा मुख्यमंत्री कधी झाला नाही. यापैकी काही ठिकाणी भाजपाच्या मित्रपक्षांचा मुख्यमंत्री नक्की झाला, पण भाजपाचा मुख्यमंत्री आतापर्यंत शपथ घेऊ शकला नाही. यात बिहारचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. बिहारमध्ये भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या जदयूचे नितीशकुमार मुख्यमंत्री आहेत. यावर्षीच्या अखेरीस बिहार विधानसभेची निवडणूक होत आहे, ही निवडणूक जदयू आणि भाजपा एकत्रितपणे लढवत आहे. निवडणुकीनंतर जदयू आणि भाजपा युतीला बहुमत मिळाल्यानंतर पुन्हा एकदा नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, असे मानले जाते. प्रत्येकवेळी भाजपाला उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. आधी सुशीलकुमार मोदी उपमुख्यमंत्री राहात होते, आता भाजपाचे विजयकुमार सिन्हा आणि सम्राट चौधरी उपमुख्यमंत्री आहेत. दोन्ही सरकारमध्ये मुख्यमंत्री मात्र नितीशकुमार होते आणि आहे. फरक एवढाच की भाजपाच्या उपमुख्यमंत्र्यांची संख्या एकवरून दोनवर गेली. विशेष म्हणजे सध्याही बिहार विधानसभेत भाजपा आमदारांची संख्या जदयू आमदारांपेक्षा जवळपास दुप्पट आहे. असे असतानाही भाजपाने जदयूला मुख्यमंत्रिपद दिले, हा भाजपाचा मनाचा मोठेपणा मानायचा की राजकीय तडजोड, हे सांगता येणार नाही.

पंजाबमध्ये सध्या आम आदमी पक्षाची सत्ता आहे, कधीकाळी पंजाबमध्ये भाजपा आणि अकाली दल बादल गट यांची सत्ता होती. अकाली दल बादल गटाचे प्रकाशसिंग बादल यांनी अकाली दल आणि भाजपा युतीचे नेते म्हणून दीर्घकाळ पंजाबचे मुख्यमंत्रिपद भूषवले. अकाली दलाचा मित्रपक्ष म्हणून भाजपा राज्यात दीर्घकाळ सत्तेवर होता, पण राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री आतापर्यंत कधीही झाला नाही. नंतर काळाच्या ओघात राज्यातील अकाली दल आणि भाजपा यांची युतीही तुटली. अकाली दल हा भाजपाचा सर्वांत जुना मित्रपक्ष म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे केंद्रातील वाजपेयी सरकारमध्ये आणि त्यानंतर नरेंद्र मोदी सरकारमध्येही अकाली दलाचे नेते सहभागी झाले होते.

जम्मू-काश्मीरमध्येही आतापर्यंत एकदाही भाजपाची सत्ता आली नाही, वा भाजपाचा नेता मुख्यमंत्री झाला नाही. नाही म्हणायला भाजपाने मेहबुबा मुफ्ती यांना पाठिंबा देत राज्यात सरकार स्थापन केले होते. त्यावेळी भाजपाचे डॉ. निर्मलसिंह उपमुख्यमंत्री होते. पण हे सरकार फारकाळ टिकले नाही, लवकरच कोसळले. जम्मू-काश्मीरची सत्ता सुरुवातीला काही वर्षे कॉंग्रेसकडे होती, नंतर आलटून पालटून ती नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीकडे राहिली. नॅशनल कॉन्फरन्सचे आधी शेख अब्दुल्ला, नंतर फारुक अब्दुल्ला मुख्यमंत्री होते आणि आता उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री आहेत. पीडीपीत मुफ्ती मोहम्मद सैद यांनी मुख्यमंत्रिपद भूषवले, नंतर त्यांच्या कन्या मेहबुबा मुफ्तीही मुख्यमंत्री झाल्या होत्या. पश्चिम बंगाल हे देशातील एकमेव असे राज्य असावे, ज्या राज्यात आतापर्यंत भाजपाला एकदाही सत्ता मिळवता आली नाही. सुरुवातीला हे राज्य डाव्या पक्षाचा म्हणजे माकपचा बालेकिल्ला होता, नंतर गेल्या १५ वर्षांपासून राज्यात तृणमूल कॉंग्रेसची सत्ता असून ममता बॅनर्जी मुख्यमंत्री आहेत. माकपच्या कार्यकाळात आधी ज्योती बसू यांनी दीर्घकाळ पश्चिम बंगालचे मुख्यमंत्रिपद भूषवले, त्यांच्यानंतर बुद्धदेव भट्टाचार्य मुख्यमंत्री झाले. तृणमूल कॉंग्रेसतर्फे ममता बॅनर्जी १४ वर्षांपेक्षा जास्त काळापासून मुख्यमंत्री आहे. पण आता त्यांच्या आणि तृणमूल कॉंग्रेसच्या राज्यातील बालेकिल्ल्याला खिंडार पडत आहे. २०११ मध्ये पहिल्यांदा सत्ता मिळवताना ममता बॅनर्जी यांची लोकप्रियता जशी होती, तशी आता राहिली नाही. २०११ नंतर, २०१६ तसेच २०२१ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी विजय मिळवला असला तरी २०२६ ची निवडणूक जिंकणे ममता बॅनर्जी यांना सोपे राहिले नाही. त्यांची स्थिती दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्यासारखी व्हायची शक्यता आहे. केजरीवाल यांनीही २०१३ आणि नंतर २०१५ ते २०२० अशी सलग तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, पण २०२५ च्या चौथ्या निवडणुकीत आपचाच पराभव झाला नाही तर केजरीवाल यांनाही दिल्लीच्या जनतेने धूळ चारली. ममता बॅनर्जी यांची स्थिती तशीच झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

राज्यात भाजपाचा प्रभाव आधी खूप कमी होता, पण २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाचा राज्यातील प्रभाव वाढत गेला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर यात भर पडली. त्यामुळे २०२६ मध्ये होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने दिल्लीसारखाच नेत्रदीपक विजय मिळवला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पश्चिम बंगाल हे देशातील एकमेव असे राज्य म्हणायला पाहिजे, ज्याठिकाणी भाजपाचे कमळ आतापर्यंत फुलले नाही. पण यावेळी राज्यात कमळ फुलवण्याची पूर्ण तयारी भाजपाने केली आहे.

९८८१७१७८१७

### थोर देशभक्तांचा अपमान थांबवा!

सध्या देशात थोर देशभक्त, क्रांतितिकारी, हुतात्मा आणि धर्मवीरांच्या चारित्र्यावर टीका करण्याची स्पर्धाच सुरू आहे. नुकतेच अबू आझमी यांनी औरंगजेबाला प्रतिभावान असे संबोधले. म्हणजेच धर्मवीर संभाजी राजे यांच्या अतुलनीय शौर्याचा आणि धर्मनिष्ठेचा अपमान केला. तसेच, कॉंग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी लोकसभेत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका करत 'हमारी तरफ शहिदों की लाईन लगी थी । तुम्हारे सावरकर अंग्रेजों की माफी मांग रहे थे' असे उन्मत्त वक्तव्य केले. यातून त्यांचे इतिहासाचे अज्ञान दिसून येते.

अशी विधाने म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे चारित्र्यहनन करणेच आहे. स्वातंत्र्यलढ्यातील स्वा. सावरकरांचे योगदान अमूल्य आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कॉंग्रेसच्या नेत्यांनीच पूर्वी सावरकरांचा गौरव केलेला आहे. २६ फेब्रुवारी १९६६ या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे निर्वाण झाले. त्यावेळी लोकसभेत श्रद्धांजली वाहताना कॉंग्रेसच्या इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, देशभक्ती, शौर्य आणि स्वार्थत्याग, साहस या गुणांचे दुसरे नाव म्हणजे सावरकर!

महात्मा गांधींनीही १९२१ साली स्वा. सावरकरांच्या सुटकेसाठी व्हाइसरॉयकडे विनंती करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे स्वा. सावरकरांचा सुटकेसाठी केलेला अर्ज माफीनामा होता असे म्हणणे हा इतिहासाचा विपर्यास आहे. त्यांच्या अर्जाला 'माफीनामा' संबोधून त्यांची कुचेष्टा करणाऱ्यांना हे देखील बहुधा माहिती नसावे की, स्वा. सावरकर यांच्या सुटकेनंतर त्यांचा सत्कार सगळ्याच पक्षांनी केला, अगदी कॉंग्रेसच्या नेत्यांनी देखील!

स्वा. सावरकर हे इंग्रजांचे गुप्तहेर होते असा अपप्रचार केला जातो. परंतु जेव्हा सरकारने स्वा. सावरकरांच्या उपजीविकेच्या साधनांची जप्ती केली, त्यानंतर त्यांची उपजीविका चालवण्याची जबाबदारी ही सरकारची होती, त्यानुसार जीवनावश्यक गोष्टी पुरविण्यास सरकार कायदेशीर बांधील होते. त्यामुळे या ठिकाणी कुठेही हेरगिरी करण्याच्या मोबदल्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कुठल्याही देशभक्ताच्या चारित्र्यावर खोटे आरोप करणे हे पूर्वग्रहदूषितपणाचे लक्षण आहे आणि बुद्धीची दिवाळखोरी दर्शवते.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### राष्ट्रविघातक विचारांच्या उच्चाटनासाठी राष्ट्रधर्म जागृतीची गरज

अबू आझमी यांनी विधानसभेतील आवारात औरंगजेब किती चांगला शासक होता वगैरे वगैरे अशी हिंदुद्रोही मुक्ताफळे उधळली. ते अशा प्रकारच्या वल्गना नेहमीच करत असतात. कारण आपण त्यांना कायमस्वरूपी आणि एकजुटीने विरोध करत नाही म्हणून त्यांची हिंमत वाढते. विचार केला तर लक्षात येते की, काही जण इतिहासाची एकतर्फी मांडणी करून सत्य लपवण्याचा प्रयत्न करतात. इतर धर्मीय आपल्या धर्माच्या रक्षणासाठी सतत जागरूक असतात, तसेच हिंदूंनाही आपला धर्म आणि अस्तित्व सुरक्षित ठेवायचे असेल, तर हिंदुराष्ट्राच्या स्थापनेशिवाय पर्याय नाही.

हिंदुराष्ट्र स्थापनेसाठी कार्य करणाऱ्या संघटनांना प्रसारमाध्यमांमध्ये अधिक प्रसिद्धी मिळणे गरजेचे आहे. धर्माच्या रक्षणासाठी योगदान दिल्यास हिंदुराष्ट्राच्या स्थापनेसाठी वेळ लागणार नाही. पुरोगामित्वाच्या नावाखाली राष्ट्रवाद चिरडणारे, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली तरुणांचे खच्चीकरण करणारे आणि ईश्वर, राष्ट्रपुरुष तसेच संतांविषयी वाद निर्माण करणारे हेच देशाचे खरे शत्रू आहेत. अशा व्यक्तीचा खरा चेहरा लोकांसमोर आणणे आवश्यक आहे.

खरंच हिंदुराष्ट्र निर्माण करायचे असेल, तर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेच्या उपदेशाने शस्त्रसज्ज केल्याप्रमाणे गीता पठन करणाऱ्या प्रत्येक हिंदूंनी शस्त्रसज्ज व्हायला हवे! आपल्या लेखणीच्या शस्त्राने अबू आझमीसारख्या विचारांचे खंडन करणे. हे सुद्धा शस्त्रसज्ज होणेच आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

### वारे... गतिमान, पारदर्शक जिल्हा प्रशासन

राज्यातील सर्वसामान्यांची कामे सुकर व्हावी यासाठी दिल्या गेलेल्या लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक प्रशासन पुरस्कारासाठी नागपूर जिल्ह्याची 'राज्यातून प्रथम' क्रमांकासाठी निवड झाली. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या सत्काराची बातमी प्रकाशित झाली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे १ मार्चला 'पाणीटंचाई आराखडा तयारच नाही' अशा शीर्षकाची बातमी वाचली. आणि शासनाचे हे पुरस्कार ठरवून तर दिले जात नसावे अशी शंकाही मनात आली. ग्रामीण भागातील संभाव्य पाणीटंचाईची समस्या ओळखून खरे तर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातर्फे दरवर्षी जानेवारी महिन्यातच आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवायचा असतो. परंतु तो आराखडा संबंधित विभागाने तयारच केला नाही. यावरून ग्रामीण जिल्हा प्रशासनाचा कारभार किती गतिमान आहे हे दिसून येते.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त



### महापालिकेच्यावतीने माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**सोलापूर, दि.१२ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे थोर नेते भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनानिमित्त कौन्सिल हॉल समोरील पुतळ्यास आणि कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे थोर नेते भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेस सहायक आयुक्त गिरीष पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी चंद्रशेखर गायकवाड, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, सचिन कांबळे,बाळू दिलपाक,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### विषारी औषध प्राशन केलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

राहत्या घराच्या मोकळ्या मैदानात विषारी औषध प्राशन करून बेशुध्दावस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा प्रकार मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता उघडकीस आला. निलकंठ लक्ष्मण कुंभार (वय ५५, रा. मित्र नगर, शेळगी, सोलापूर ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी ५.३० वाजता निलकंठ हे त्यांच्या मित्र नगर येथील राहत्या घराच्या मैदानात बेशुध्दावस्थेत आढळून आले होते. त्यांना मुलगा अजय कुंभार यांनी सायंकाळी ६.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. मंगळवारी रात्री उपचारादरम्यान रात्री ८.१५ वाजता ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




### न्यु बापूजी नगरात ९२ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

शहरातील उत्तर सदर बझार परिसरतील न्यु बापूजी नगर येथे चोरट्याने ९२ हजारांचे सोन्याचे दागिने व इतर साहित्य चोरून नेले.याबाबत अंजप्पा हणमंतु पल्लोलू (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ जानेवारी २०२५ रोजी रात्री अंजप्पा हे घरासमोरील मोकळ्या जागेत झोपले होते. त्यावेळी चोरटयाने अंजप्पा यांच्या घराचा पुढे केलेला दरवाजा उघडून घरातून सोन्याचे दागिने व इतर साहित्य असा ९२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.



### किडवाई चौकातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

शहरातील किडवाई चौकातून चोरट्याने दुचाकी व सोन्याचे कानातील झुबे चोरून नेले. याबाबत तस्लीम रजाक बागवान (वय १९, रा. वेलकम हॉलच्या बाजूस, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ मार्च रोजी सायंकाळी तस्लीम बागवान या किडवाई चौक येथे त्यांची एमएच १३ एआर ५८२५ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेली. या दुचाकीच्या डिक्कीत रोख रक्कम व ४ ग्रॅमचे सोन्याचे झुबे ठेवले होते. चोरट्याने ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

### महिला सबलीकरणाला बळकटी देत आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करणार

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

महिला सबलीकरणाला बळकटी देत टोयोटा किर्लोस्कर मोटर २०२५ चा आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या थाटामाटात साजरा करणार आहे.टोयोटा किर्लोस्कर मोटर उत्पादन, तंत्रज्ञान क्षेत्रासह आघाडीच्या पदांमध्ये महिलांना प्राधान्य देणाऱ्या धोरणांना आणि सुविधांना प्राधान्य देत आहे. २०३० पर्यंत ३०% महिला प्रतिनिधित्व साध्य करण्याच्या उद्देशाने, टीकेएम संस्थेतील महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि उन्नतीसाठी अनेक उपक्रम राबवत आहे.या वर्षीचा महिला दिन ॲक्सिलरेट ॲक्शन्स या संकल्पनेवर आधारित असणार आहे जो टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

# सोलापूर विद्यापीठाच्या २५१ कोटीच्या अंदाजपत्रकास मंजुरी

**४६ कोटींची तूट**

**विद्यार्थी विकास व संशोधनासाठी भरीव तरतूद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या अंदाजपत्रकात २०५ कोटी ६ लाख ८२ हजार रुपये इतकी अपेक्षित रक्कम जमा गृहीत धरून २५१ कोटी ३६ लाख २५ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास अधिसभेने एकमताने दुरुस्तीसह मंजुरी दिली. या अंदाजपत्रकात ४६ कोटी २९ लाख ४३ हजार रुपये इतकी तूट दर्शविण्यात आली आहे. विद्यार्थी विकास आणि संशोधनासाठी या अंदाजपत्रकात भरीव अशी तरतूद करण्यात आली आहे.

बुधवारी, विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक पार पडली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्यासह अधिसभेचे सदस्य उपस्थित होते. या सभेचे सदस्य सचिव म्हणून कुलसचिव योगिनी घारे यांनी काम पाहिले. या बैठकीत वित्त व लेखा अधिकारी सीए. डॉ. महादेव खराडे यांनी अंदाजपत्रक सादर केले. विद्यापीठाच्या या अंदाजपत्रकाची प्रामुख्याने पाच टप्प्यांमध्ये वर्गवारी करण्यात आली आहे. देखभाल दुरुस्ती, वेतन, ऋण आणि अनामत, विकास योजना भाग एक- शासन अनुदान तसेच विकास योजना भाग दोन- विद्यापीठ निधी अशा पाच टप्प्यांमध्ये अंदाजपत्रक सादर करण्यात आले. यंदाच्या अंदाजपत्रकात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तसेच संशोधन कार्य, विविध उपक्रम राबविण्यासाठी निधीची भरीव तरतूद करण्यात आली आहे. अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर अधिसभा सदस्यांनी चर्चा करून दुरुस्तीसह अंदाजपत्रकाला एकमतानी मंजुरी दिली. मंगळवारच्या तहकुबीनंतर बुधवारी ही अधिसभा बुधवारी झाली.

नंतर सदस्यांनी मंडलेल्या ठरावावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. यात डॉ. वीरभद्र दंडे, रोहिणी तडवळकर, डॉ. मंगेश वेदपाठक, डॉ. शिरीष शिंदे. डॉ. राजेंद्र सुर्यवंशी, डॉ. भगवान आदटराव, गणेश डोंगरे, डॉ. सीमा गायकवाड, डॉ. जैनोद्दीन मुल्ला, सिद्धेश्वर स्वामी, ॲड. उषा पवार, सूरज मस्के यांचे ठराव मंजूर झाले. या चर्चेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, समाधान पवार, सिनेट सदस्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी भाग घेतला होता.

### अंदाजपत्रकातील ठळक तरतूदी

- शिक्षकांच्या संशोधनास चालना मिळण्यासाठी सीड मनी संशोधन उपक्रमाकरिता ३५ लाख
- मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढवण्यासाठी मुली शिकवा, समाज घडवा उपक्रमाकरिता ५ लाख
- कमवा व शिका योजनेसाठी १५ लाख.
- विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेसाठी २० लाख
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीवर्ष कार्यक्रम लाख रुपये.
- विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांसाना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळा व परिसंवादासाठी १० लाख
- विद्यार्थ्यांच्या संशोधन शिष्यवृत्ती योजना आणि विद्यापीठ परिसरातील गरीब ४० विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके भेट उपक्रमासाठी भरीव तरतूद.
- इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेसकरिता ५० लाख.

### बजेट सादरीकरणावर हरकत

व्यवस्थापन परिषदेने ठरविलेल्यानुसार अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषद सदस्य राजाभाऊ सरवदे यांनी मांडावे असे अशी सूचना कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केली. परंतु वित्त व लेखाधिकारी डॉ. खराडे हजर असताना त्यांनीच हे अंदाजपत्रक सादर करावे अशी हरकत डॉ. भगवान आदटराव यांनी घेतली. त्यामुळे श्री. सरवदे यांनीच त्यास अनुमोदन दिल्यानंतर वित्त व लेखाअधिकारी यांनी हे अंदाजपत्रक सादर केले.

### गोशाळेवरून वादंग

अंदाजपत्रकात विद्यापीठात गोळाशाळा तयार करणेसाठी ४० हजाराची तरतूद कशासाठी, याचा विद्यार्थ्यांना काय फायदा? असा प्रश्न गणेश डोंगरे यांनी उपस्थित केला. परंतु या माध्यमातून छोटे अभ्यासक्रम सुरु करणार असा खुलासा प्र. कुलगुरु डॉ. दामा यांनी केला. परंतु गोशाळा या नावावरून बरीच वादावादी झाली. या चर्चेत डोंगरे, डॉ. दंडे, रोहिनी तडवळकर, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, डॉ. मुल्ला, चन्नवीर बंकुर, सूरज रोंगे, सचिन गायकवाड, प्रभाकर कोळेकर यांनी भाग घेतला होता. याला धार्मिक रंग देऊ नका, असा हस्तक्षेप करीत कुलगुरू यांनी गोशाळेऐवजी पशुपालन अशी दुरुस्ती सुचविली.

### खेळाडूंच्या विकासासाठी १.५० कोटीची तरतूद

क्रीडा विभागाच्या विकासासाठी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन प्रकल्प तसेच चर्चासत्रासाठी भरीव तरतूद केली आहे. इनडोअर स्टेडियममधील क्रीडा साहित्यासाठी वीस लाख तर क्रीडा विभागासाठी एक कोटी ५० लाखापर्यंतची तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे खेळाडूंना सर्व प्रकारच्या स्पर्धांसाठी चांगल्या सुविधा निर्माण होतील तसेच त्यांना इच्छित ध्येय गाठता येईल.

**-प्रा. सचिन गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य**

**संत सेवालाल निधी फायनान्स फसवणूक प्रकरण**

## साडेतीन कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

संत सेवालाल निधी फायनान्सच्या साडेतीन कोटी रूपयांच्या फसवणुकप्रकरणी मुख्य आरोपी शिवाजी जाधव यांचा जावई सचिन चव्हाण यास जिल्हा न्यायाधीश वाय ए राणे यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. यातील फिर्यादी योगेश पवार यास व इतर गुंतवणुकदारांना संत सेवालाल निधी लि., या फायनान्सचे संचालक शिवाजी जाधव यांनी फायनान्समध्ये गुंतवणूक करण्यास व गुंतवणूकीतून मिळणाऱ्या ज्यादा व्याजदराचे आमिष दाखवून पैसे गुंतविण्यास प्रवृत्त केले होते.सदर फायनान्समध्ये योगेश पवार यांनी सन २०२२ मध्ये ५० हजार रुपये इतकी रक्कम इतर ७१ गुंतवणूकदारांनी मिळून ३ कोटी ५९ लाख इतकी रक्कम गुंतवणूक केली. गुंतवणूकदारांना फायनान्सच्या संचालकांनी गुंतवणूक केलेल्या ठेवी परत न करता त्यांची फसवणूक केली. त्यावरुन फायनान्सचे संचालक व आरोपी सचिन किसन चव्हाण यांचेविरुध्द सदर बझार पोलीस स्टेशन गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यामुळे आरोपी सचिन चव्हाण याने जिल्हा न्यायालय येथे अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर अटकपूर्व जामीनाच्या अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपीचे वकिलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून जिल्हा न्यायाधिश वाय. ए. राणे यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. यात सरकार पक्षातर्फे ॲड. दत्तुसिंग पवार यांनी तर आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. सतिश शेटे यांनी काम पाहिले.



## १४ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

येथील व्यापारी अभिजित अरुण गोडसे (वय ४०) यांच्या ओळखीचे ''श्री गणेश मिलर ॲण्ड डीलर'' कंपनीचे मालक बाबुराव रावजी चव्हाण, विश्वास बाबुराव चव्हाण, उज्ज्वला दिनेश चव्हाण यांनी कंपनीत तीस टक्के भागिदारी देतो म्हणून चौदा लाख पन्नास हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सोलापूर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी व्ही.आय. भंडारी यांनी सबळ पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

फिर्यादी अभिजित गोडसे यांच्या ओळखीचे ''श्री गणेश मिलर ॲण्ड डीलर'' कंपनीचे मालक बाबुराव रावजी चव्हाण, विश्वास बाबुराव चव्हाण, उज्ज्वला दिनेश चव्हाण यांची वेगवेगळ्या डाळी साफ करणे, त्यावर प्रक्रिया करणे व पॅकिंग करण्याचा कारखाना होता. चव्हाण यांनी फिर्यादी गोडसे यांना सदरच्या कंपनीमध्ये तीस टक्के भागिदारी देतो, असे आश्वासन देऊन त्यांच्याकडून १४ लाख ५० हजार रोख घेतले व तसे भागीदार पत्र तयार करुन घेतले. सुमारे सहा महिन्यांनी फिर्यादी गोडसे यांनी आरोपी चव्हाण यांना भागीदारीतील पैशांची व कंपनीच्या नफ्याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी चव्हाण हे त्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यानंतर गोडसे यांनी स्वतः कंपनीत जाऊन कंपनीच्या कामाची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कोणतेही कामकाज कंपनीत चालू नाही असे दिसून आले, त्यानंतर त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सदर बझार पोलीस स्टेशन येथे रीतसर फिर्याद दाखल केली. सदर प्रकरणात पोलीस निरीक्षक आय. एस. सय्यद यांनी सखोल तपास करुन आरोपींविरुध्द कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची मुख्य न्यायदंडाधिकारी व्ही. आय. भंडारी यांचेसमोर सुनावणी होऊन सदर प्रकरणात एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांच्या साक्षीमधील विसंगती व आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मे. कोर्टाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात सरकारपक्षातर्फे ॲड. अमर डोके तर आरोपीतर्फे ॲड. अभिषेक गुंड, ॲड. ए.डी. कुलकर्णी व ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

## रस्त्यावर बेकायदेशीर अतिक्रमण; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

मजरेवाडी येथे रस्त्यावर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून पत्रा शेड मारणाऱ्या दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भिमाशंकर नागप्पा सरसंबी (वय ५३, रा. शिवरत्न नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संतोष उर्फ पिंटु कुंभार आणि रोहन मोरे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुना सर्व्हे नं. २२६/१/२ नवीन सर्व्हे नं. ४६ नियोजित दिक्षीत नगर भाग २ मध्ये अस्तित्वात नसलेला प्लॉट नं. १००/अ हा पवनकुमार विजयकुमार दुबे यांनी त्यावर भोगवटदार म्हणून मकसूद म. शफी इनामदार यांचे नाव लावले. तो प्लॉट संतोष कुंभार याने नोटरी कब्जापावती करून विकत घेतला आहे. त्यानंतर संतोष कुंभार व रोहन मोर यांनी सरसंबी यांचा प्लॉट नं. ९७ च्या उत्तर बाजूला असलेला रहिवाश्यांच्या वापराचा सार्वजनिक वाहतूकीचा रस्ता आडवून त्यावर पत्र्याचे कंम्पाऊंट मारून बांधकामाचे रॅबीटची भर घालून पत्रा शेड मारले. या पत्रा शेडमध्ये महावितरण विभागाच्या मदतीने विद्युत मिटर बसवून रस्त्यावर अतिक्रमण केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.

## भारताच्या फॅशन राजधानीमध्ये आणला 'दि वन अँड ओनली' अनुभव

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

गुरुग्राम आणि चंदीगडमधील ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या भरघोस यशानंतर,या टूरने आता पुढचे त्याचे प्रदर्शन मुंबईला दाखवण्याचे ठरवले आहे, ज्यामुळे भारताची ग्लॅमर राजधानी एका आकर्षक नवकल्पक उपक्रमाच्या यशामध्ये रूपांतरित झाली.या प्रदर्शनाने अत्याधुनिक कलेची क्रिएटिव्हीटी,धाडसी कलात्मक विधाने आणि समकालीन सौंदर्यशास्त्राच्या कुशलतेने तयार केलेल्या सिम्फनीद्वारे पुन्ही प्रतिष्ठा प्राप्त केली आहे.पर्नोड रिकार्ड इंडियाचे ग्लोबल बिजनेस डेव्हलपमेंट विभागाचे मुख्य विपणन अधिकारी आणि प्रमुख कार्तिक मोहिंद्रा म्हणाले,ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर नेहमीच क्रिएटिव्हिटी मर्यादेपलीकडे नेण्यासाठी आणि फॅशनला कला म्हणून पुन्हा समोर आणण्यासाठी आयोजित केला जातो. या अनोख्या भव्य तरंगत्या रनवेमुळे भारताची फॅशन राजधानी असलेल्या मुंबईमध्ये टूर आणल्याने आम्हाला हे स्वप्न नवीन शिखरावर नेण्याची संधी मिळाली.''इंडिया एन-व्होग'' या मोहक थीम अंतर्गत, तरुण ताहिलियानी यांनी त्यांचा भव्य संग्रह ड्रीमस्केप सादर केला.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022
IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 12557991 | मालमत्तेवर कर्ज | 1. सोहेल महमूद शेख 2. महमूद सिकंदर शेख 3. मयमुना सिकंदर शेख 4. तौफिक महमूद शेख | 28/12/2024 | INR 8,59,321.68/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 255 चे सर्व तुकडा आणि पार्सल, 810 चौ. फूट., उपविभागातील ग्रामपंचायत कवठे हद्दीत. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र-413002, आणि सीमा:- पूर्व - रस्ता, पश्चिम – रमजान अजमोद्दीन शेख, उत्तर - मथुराबाई प्रकाश कारंडे, दक्षिण - जयश्री एकनाथ सुतार.

तुम्हाला याद्वारे IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली आणि सध्या IDFC FIRST Bank Limited लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे वरील तक्तत्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार, त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : 13/03/2025
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

Classifieds

**भाड्याने देणे**

**युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं. २२/२०२५
निशाणी नं. ५

**बार्शी येथील मे. सह. दिवाणी न्यायाधिश क. स्तर बार्शी यांचे न्यायालयात**
**(मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट)**

**प्रमोद प्रल्हाद वाघमोडे, वगैरे** - **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ ते ४ हे मयत शहाबाई प्रल्हाद वाघमोडे यांचे वारस आहेत. तसेच मयत शहाबाई प्रल्हाद वाघमोडे यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदारांचे नांवे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत यातील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी त्याकामी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश व्हावेत म्हणून अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार हे मयत शहाबाई प्रल्हाद वाघमोडे हीचे वारस आहेत अथवा कसे त्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र देणे कामी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश देऊन तसे वारस प्रमाणपत्र देणेकामी जर का कोणाचीही हरकत अथवा तक्रार असलेस हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून पुढील नेमलेल्या ता. २१/०३/२०२५ रोजीपर्यंत मे. कोर्टात हजर राहून स्वतः अगर आपल्या विधिज्ञा मार्फत म्हणणे मांडावेत तसे मुदतीत करणेस कसुर केल्यास त्या अर्जाचा अनुषंगाने पुढील योग्य ते आदेश पारीत होतील याची नोंद घ्यावी हे प्रसिध्दीकरण दिले असे. ता. १२/३/२०२५

**सही-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही** **सहाय्यक अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ - शास्त्री नगर नगर अ झोपडपट्टी या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं.९८९ ही मिळकत घरजागा आमचे अशिल १) राजेश व्यंकटेश बुरा २) किसन वैंकुठम बुरा ३) प्रशांत आनंद बुरा ४) सुवर्णा श्रीनिवास बुरा यांचे वडील कै. व्यंकटेश व्यंकटय्या बुरा यांचे नांवावर होते. त्यांचे मृत्युपश्चात त्यांची पत्नी म्हणजे आमची आई श्रीमती कलावती व्यंकटेश बुरा हे वारस असून त्यांचेसह अन्य आमचे अशिल अ.क्र. १ ते ४ हे देखील सहवारस आहेत. सदर ठिकाणी त्यांचे मालकीचे चार खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधलेले वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले आहेत.

आमचे अशिलांचे वडील कै. व्यंकटेश व्यंकटय्या बुरा यांचे दिनांक. ०१/०२/२०२२ रोजी सोलापूर येथे राहते घरी मृत्यु झालेला आहे व तसेच आमचे अशिलांचे आई श्रीमती कलावती व्यंकटेश बुरा हे मुख्य वारस आहेत. त्यांनी देखील वर नमुद चार वारसांना त्यांचे हयातीतच चार खोल्या त्यांना राहणेसाठी नेमून दिलेल्या जागेत राहणेस आहेत.

सदर ठिकाणी वर नोटीसीत नमुद असलेले चारही वारस त्यांचे वडिलांचे हयातीपासूनच सदरहू घरजागेवर आजपावेतो कुटुंबासह राहणेस आहेत. सदरहू घरजागेवरील आमचे अशिलांचे मयत वडील कै. व्यंकटेश व्यंकटय्या बुरा व त्यांची पत्नी श्रीमती कलावती व्यंकटेश बुरा यांचे नांव कमी करुन १) राजेश व्यंकटेश बुरा, २) किसन बैंकुठम बुरा, ३) प्रशांत आनंद बुरा, ४) सुवर्णा श्रीनिवास बुरा यांचे नांवाची सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल सोलापूर महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : १२/०३/२०२५

**सही/-**
**ॲड. एस.एम. ढेकणे**
**रा. १२६-अ वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली ता. २४/०४/२०२५
दि.कि.अ.नं. १२/२०२५

**बार्शी येथील मा.दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**कांताबाई महादेव आमले,**
वग ६७ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. भवानी पेठ, तेलेगल्ली, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

१) **संगीता चंद्रकांत आमले**
वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
रा. एस.टी. स्टॅण्डजवळ, संध्या टेलर्स,
हारेगांव. ता. औसा, जि. लातूर
२) **अतिष चंद्रकांत आमले**
वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण.
रा. सदर
३) **तेजस धनंजय आमले**
वय २० वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. तेलेगल्ली, भवानी पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
४) **अश्विनी धनंजय आमले**
यय ४५ वर्षे, धंदा - घरकाम. रा. सदर
— **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार अर्जदार हिस चंद्रकांत व धनंजय महादेव आमले अशी दोन मुले होती ती दोन्ही मुले मयत असून मयत चंद्रकांत यास सा.वाली नं. १ ही पत्नी व सा.वाला नं.२ मुलगा तसेच मयत धनंजय यास सा.वाला नं. ३ हा मुलगा व सा.वाली नं.४ ही पत्नी असे वारस आहेत अर्जातील मिळकत ही चंद्रकांत महादेव आमले यांचे नावे असून सदर चंद्रकांत महादेव आमले ता. ०२/०८/२०२४ रोजी मयत झालेला आहे त्यास वारस अर्जदार व सा.वाला हे आहेत. अर्जातील मिळकतीस वारस हक्काने अर्जदाराचे नाव लावण्याची विनंती केली असता तेथील अधिकारी यांनी हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदार व सा.वाला हे मयत चंद्रकांत महादेव आमले यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हे हेअरशिप प्रमाणपत्र मागणीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख २४/०४/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होऊन आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता ११/०३/२०२५

**सही/-** **वरिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय व. स्तर ता. बार्शी** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा. अधिक्षक,** **दिवाणी न्यायालय व. स्तर ता. बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### मालविका दुसऱ्या फेरीत सिंधू पहिल्या फेरीतच बाहेर

**बर्मिंगहॅम** : दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूला प्रतिष्ठेच्या ऑल-इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत निराशाजनक पराभव पत्करावा लागला. जागतिक क्रमवारी १६ व्या स्थानावर असलेल्या पी.व्ही. सिंधूला दक्षिण कोरियाच्या किम गा-यूनकडून २१-१९, १३-२१, १३-२१ असा पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे या प्रतिष्ठित सुपर १००० स्पर्धेत नागपूरच्या मालविका बनसोडने महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत १२ व्या क्रमांकावर असलेल्या येओ जिया मिनला पराभवाचा धक्का दिला आणि आता तिचा सामना तिसऱ्या मानांकित अकाने यामागुचीशी होईल. दरम्यान, लक्ष्य सेनने तैवानच्या सु ली यांगला हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेनने यापूर्वी या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. मिश्र दुहेरीत रोहन कपूर व ऋत्विका शिवानी गड्डे या भारतीय जोडीने दुसऱ्या फेरीत प्रवेश करताना चीन तैपेईच्या ये हाँग वेई व निकोल गोंझालेस चान या जोडीला २०-१०, १७-२१, २४-२२ असे पराभूत केले. आता रोहन व ऋत्विका पाचव्या मानांकित चिनी जोडी, यान झे फेंग आणि या झिन वेई यांच्याविरुद्ध दुसऱ्या फेरीत खेळतील. गत वर्षी पॅरिस ऑलिम्पिक पदक जिंकण्यास मुकल्यानंतर, सिंधू तिचे नवीन इंडोनेशियन प्रशिक्षक इरवंस्या आदि प्रतामा यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न करत आहे.

### सेनादलाने पटकावले सर्वसाधारण अजिंक्यपद

**गुलमर्ग** : गुलमर्ग गोल्फ क्लब येथे पाचव्या खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभात भारतीय सेनादलाने सर्वसाधारण अजिंक्यपदाचा मान मिळविला. समारोप समारंभात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि जम्मू आणि काश्मीरचे युवा सेवा आणि क्रीडा मंत्री सतीश शर्मा यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. जम्मू-काश्मीरमधील हिवाळी खेळांना चालना देण्यासाठी, यांनी बुधवारी येथे गुलमर्गला हिवाळी खेळांसाठी क्रीडा केंद्रात रूपांतरित करण्याच्या सरकारच्या योजनेची घोषणा केली. भारतात प्रचंड प्रतिभा आहे व आपल्याला ९ वर्षांपासून ते २४ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील प्रतिभावान खेळाडू शोधून त्यांचे संगोपन करावे लागेल, असे मांडविया यावेळी म्हणाले. आपण २०३६ च्या उन्हाळी ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी योग्य आराखडा तयार करण्यासाठी २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांचे क्रीडा मंत्री आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या वरिष्ठ सदस्यांची भेट घेतली. ऑलिम्पिकसाठी आम्हाला एक मजबूत क्रीडा पायाभूत सुविधा आणि दर्जेदार क्रीडा परिसंस्था विकसित करावी लागेल, असे ते म्हणाले.

### रोहित २०२७ विश्वचषकात खेळू शकतो : पॉण्टिंग

**दुबई** : भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा अजूनही मजबूत असून तो वन-डे क्रिकेटमधून निवृत्त होण्यापूर्वी २०२७ च्या विश्वचषकात खेळू शकतो, असा विश्वास ऑस्ट्रेलियाचा दिग्गज रिकी पॉण्टिंग याने व्यक्त केला. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे व नामिबियाच्या संयुक्त यजमानपदाखाली २०२७ साली एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून या वन-डे विश्वचषकापर्यंत ५० षटकांच्या क्रिकेट स्वरूपात भारताचे नेतृत्व करत राहण्याच्या हा त्याच्या निर्णयामागे अपूर्ण कामाची भावना आहे. एकदिवसीय विश्वचषक वगळता, रोहितने भारताचे नेतृत्व करताना सर्व आयसीसी जेतेपदे जिंकली आहेत. तो २०२३ मध्ये मायदेशात वन-डे विश्वचषकाच्या समीप पोहोचला होता, परंतु अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून त्याला पराभव पत्करावा लागला.

### राष्ट्रीय युवा ॲथ्लेटिक्स महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर

**पाटणा** : उत्तराखंडचा सूरज सिंग बुधवारी पाटलीपुत्र क्रीडा संकुलात पार पडलेल्या २० व्या राष्ट्रीय युवा ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी हरयाणाला ८७ गुणांसह एकूण विजेता घोषित करण्यात आले. त्यानंतर उत्तर प्रदेश ५१ गुणांसह आणि महाराष्ट्र ४६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. १८ वर्षांखालील मुलांच्या विभागात उत्तर प्रदेशने ३८ गुणांसह सांघिक अजिंक्यपद जिंकले तर १८ वर्षांखालील मुलींच्या विभागात हरयाणाने १५ गुणांसह सांघिक अजिंक्यपद जिंकले. १८ वर्षांखालील गटात उत्तराखंडचा सूरज सिंग नवीन राष्ट्रीय विक्रमासह मुलांच्या १,००० मीटर धावण्याच्या शर्यतीत विजेता ठरला.पहिल्या चार धावपटूंनी १८ वर्षांखालील गटातील विक्रम मोडीत काढला व पहिल्या दोन धावपटूंनी २०१० मध्ये राहुल पालने प्रस्थापित केलेल्या १५ वर्षांच्या राष्ट्रीय युवा विक्रमाला मोडीत काढले. सूरज सिंगचा विजयी वेळ २२६:.०४ असा होता, जो राष्ट्रीय युवा विक्रम झाला. उत्तर प्रदेशच्या विकास कुमारने २२६:.५९ वेळेसह रौप्यपदक जिंकले आणि राष्ट्रीय युवा विक्रमापेक्षाही खाली घसरले. हरयाणाच्या सोहित विजेंदरने २२७:.२७ या वेळेसह कांस्यपदक जिंकले व त्याने गत वर्षी बिलासपूरमध्ये मोहम्मद नूरुद्दीनने केलेल्या २२८:.८९ या वेळेच्या विक्रमापेक्षा चांगले होते.

# रोहितची तिसऱ्या स्थानी झेप

### आयसीसी एकदिवसीय क्रमवारी
### गिल अव्वल स्थानी कायम



◆ **दुबई, १२ मार्च**

आयसीसी चॅम्पियन्स चषकाया अंतिम सामन्यात शानदार कामगिरी केल्यानंतर भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत दोन स्थानांनी झेप घेऊन तिसऱ्या स्थानावर पोहोचला, तर त्याचा सहकारी शुभमन गिल अव्वल स्थानावर कायम आहे.

रोहितने केवळ ८३ चेंडूत ७६ धावा फटकावल्या, त्यामुळे भारताला अंतिम सामन्यात न्यूझीलंडवर ४ गड्यांनी विजय मिळवता आला.

आठ संघांच्या आयसीसी स्पर्धेत २१८धावा करणारा भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली एका स्थानाने घसरून पाचव्या स्थानावर पोहोचला, तर श्रेयस अय्यर आठव्या स्थानावर कायम राहिला. त्यामुळे चार भारतीय अव्वल १० मध्ये राहिले.

डॅरिल मिचेल (एक स्थानाने वर सहाव्या स्थानावर), रचिन रवींद्र (१४ स्थानांनी वर १४ व्या स्थानावर) आणि ग्लेन फिलिप्स (सहा स्थानांनी वर २४ व्या स्थानावर) या न्यूझीलंडच्या त्रिकुटानेही लक्षणीय प्रगती केली.

न्यूझीलंडचा कर्णधार व डावखुरा फिरकी गोलंदाज मिशेल सॅण्टनर हा एकदिवसीय गोलंदाजांच्या अद्ययावत यादीत मोठा सुधारणा करणारा खेळाडू होता.

अंतिम सामन्यात दोन बळींसह नऊ बळी घेणारा सॅण्टनर सहा स्थानांनी वर चढला आणि श्रीलंकेचा ऑफस्पिनर महेश थिक्षानाच्या मागे दुसऱ्या स्थानावर पोहोचला.

चॅम्पियन्स चषकातील कामगिरीनंतर भारतीय जोडी - कुलदीप यादव व रवींद्र जडेजा- प्रत्येकी तीन स्थानांनी वर चढून अव्वल -१० मध्ये पोहोचली.

डावखुरा मनगटी फिरकी गोलंदाज कुलदीप (तीन स्थानांनी वर तिसऱ्या स्थानावर) या स्पर्धेत सात बळी घेतल्यानंतर मोठी सुधारणा करत आहे.

चॅम्पियन्स चषकामध्ये भारताकडून नाबाद राहिल्याने पाच बळी घेतल्यानंतर डावखुरा फिरकी गोलंदाज जडेजा तीन स्थानांनी वर चढून दहाव्या स्थानावर पोहोचला.

अफगाणिस्तानचा स्टार अझमतुल्लाह उमरझाईने एकदिवसीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अव्वल स्थान कायम ठेवले आह.

सॅण्टनर एकूण एका स्थानाने वर चढून चौथ्या स्थानावर पोहोचला. मायकेल ब्रेसवेल सात स्थानांनी पुढे सरकला व रचिन रवींद्र आठ स्थानांनी वर चढून आठव्या स्थानावर पोहोचला. ◂(वृत्तसंस्था)

# शुभमन गिल ठरला आयसीसी महिन्याचा मानकरी



◆ **दुबई, १२ मार्च**

भारताचा स्टार सलामीवीर शुभमन गिलला बुधवारी फेब्रुवारीसाठी आयसीसी महिन्याचा सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटू म्हणून घोषित करण्यात आले. यात त्याच्या संघाच्या विजेत्या चॅम्पियन्स चषक मोहिमेतील त्याच्या कामगिरीचा समावेश आहे.

गिलने ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्ह स्मिथ व न्यूझीलंडच्या ग्लेन फिलिप्सला मागे टाकत हा पुरस्कार पटकावला.

महिन्याभरात गिलने आपल्या पाच वन-डे सामन्यांमध्ये ९४.१९ च्या स्ट्राईक रेटने सरासरी १०१.५० धावा केल्या. यामध्ये इंग्लंडविरुद्धच्या ३-० मालिका विजयातील एक शानदार खेळीचा समावेश आहे. गिलने सलग तीन वेळा पन्नासपेक्षा जास्त धावा केल्या.

गिलने नागपूरमध्ये आत्मविश्वासाने ८७ धावांनी सुरुवात केली व त्यानंतर कटकमध्ये ६० धावा केल्या. त्याने अहमदाबादमध्ये शतक झळकावत शानदार शैलीत कामगिरी केली. त्याच्या ११२ धावा केवळ १०२ चेंडूत होत्या व त्यात १४ चौकार व ३ षट्?कारांचा समावेश होता. या खेळीसाठी गिलला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला व त्याने मालिकावीराचा पुरस्कारही पटकावला.

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सुवर्णपदक मिळवत गिलने बांगलादेशविरुद्धच्या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात नाबाद १०१ धावा फटकावत भारताचे नेतृत्व केले. त्यानंतर त्याने पाकिस्तानविरुद्ध ४६ धावा केल्या.

या खेळींमुळे भारताने चॅम्पियन्स चषकातील त्यांचे दोन्ही सुरुवातीचे सामने जिंकले.

गिलचा हा तिसरा आयसीसी पुरुष महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा सन्मान आहे, ज्याने यापूर्वी २०२३ मध्ये जानेवारी आणि सप्टेंबरमध्ये हा पुरस्कार दोनदा जिंकला होता. ◂(वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय कुस्ती संघ निवड चाचणी १५ मार्च रोजी

◆ **नवी दिल्ली, १२ मार्च**

भारतीय कुस्ती महासंघाचा (डब्ल्यूएफआय) राष्ट्रीय क्रीडा महासंघ (एनएसएफ) म्हणून दर्जा पुनर्संचयित झाला असून त्यानुसार डब्ल्यूएफआयने आपल्या कार्याला सुरुवात केली आहे. आगामी आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघासाठी १५ मार्च रोजी दिल्लीच्या इंदिरा गांधी क्रीडा संकुलात राष्ट्रीय संघ निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

नवीन डब्ल्यूएफआय प्रशासनाच्या देखरेखीखाली ही पहिली योग्य चाचणी असेल. कारण २१ डिसेंबर २०२३ रोजी नवीन पदाधिकारी निवडण्यासाठी निवडणूक झाल्यानंतर तीन दिवसांनी ते स्थगित करण्यात आले होते.

२५ ते ३० मार्च दरम्यान जॉर्डनमधील अम्मान येथे देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अव्वल कुस्तीपटूंची निवड करण्यासाठी चाचण्या घेण्यात येणार आहे.

डब्ल्यूएफआयच्या परिपत्रकानुसार पुरुष फ्रीस्टाईल, महिला कुस्ती आणि ग्रीको रोमन शैलीतील सर्व श्रेणींसाठी वजन तसेच चाचणी एकाच दिवशी आयोजित केले जाणार आहे आणि सर्व प्रतिस्पर्ध्यांना २ किलो वजन कमी करण्याची परवानगी असेल.

निलंबनाच्या काळात डब्ल्यूएफआय राष्ट्रीय संघ निवडू शकले नाही कारण कुस्तीगीरांनी डब्ल्यूएफआयचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात निषेध केला होता, त्यांनी महासंघाच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्याला न्यायालयात खेचले होते.

डब्ल्यूएफआयने ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या आवारातून आपले कार्यालय हलवण्यासारखे सुधारात्मक उपाय केले आहेत. हे आढळल्यानंतर निलंबन रद्द करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# वेस्ट इंडीज मास्टर्स उपांत्य फेरीत

### आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीग
### दक्षिण आफ्रिकेचा २० धावांनी पराभव



ब्रायन लारा



लेंडल सिमन्सचे शतक

◆ **रायपूर, १२ मार्च**

शतकवीर लेंडल सिमन्सच्या अष्टपैलू कामगिरी व रवी रामपॉलच्या ५ बळींच्या जोरावर वेस्ट इंडीज मास्टर्सने दक्षिण आफ्रिका मास्टर्सचा २९ धावांनी पराभव केला आणि आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीगच्या (आयएमएल) उपांत्य फेरीत प्रवेश केला.

दक्षिण आफ्रिका मास्टर्सने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडीज संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. लेंडल सिमन्सचे (१०८) शतक, कर्णधार ब्रायन लारा (३४ चेंडूत २९ धावा) व चॅडविक वॉल्टनच्या (नाबाद ३८) दमदार फलंदाजीच्या बळावर वेस्ट इंडीज मास्टर्सने ५ बाद २०० धावा उभारल्या. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना जॅक कॅलिस (४५), रिचर्ड लेव्ही (४४) व जॅक रुडोल्फच्या (३९) चिवट झुंजीनंतरही दक्षिण आफ्रिकेला मर्यादित षटकांत ८ बाद केवळ १७१ धावांपर्यंतच मजल मारता आली.

वेस्ट इंडीजच्या डावाची सुरुवात वाईट झाल्यानंतर लेंडल सिमन्स व ब्रायन लाराने तिसऱ्या गड्यासाठी १२५ धावांची भागीदारी करून संघाला चांगली मुसंडी मारून दिली. सिमन्सने ३१ चेंडूत अर्धशतक झळकावले, तर लारानेही आपल्या लौकीकास सुंदरपणे खेळी खेळली. सिमन्सने चमकदार कामगिरी कायम राखत अवघ्या ५४ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. एन्टिनीने सिमन्सची ५९ चेंडूत १३ चौकार व ५ षट्?काराची खेळी संपवून स्पर्धेत पुन्हा चुस निर्माण केली. वॉल्टनने आपल्या खेळात उत्कष्ट कामगिरी केली आणि सहा उत्तुंग षट्?कार हाणून वेस्ट इंडीज मास्टर्सना २०० धावांचा टप्पा गाठण्यास मदत केली. दक्षिण आफ्रिका मास्टर्सचा पाठलाग स्फोटक पद्धतीने सुरू झाला, यष्टिरक्षक रिचर्ड लेव्हीच्या ४४ धावांच्या खेळीमुळे सुरुवात चांगली झाली. मात्र सुरुवातीचा हा वेग अल्पकाळासाठी टिकला, कारण तीन गडी झटपटरीत्या बाद झालेत. त्यामुळे त्यांच्या खेळाची गती मंदावली. त्यानंतर जॅक कॅलिस व जॅक रुडोल्फने ७८ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करून डाव सावरला आणि दक्षिण आफ्रिकेच्या आशा पुन्हा जागवल्या. रुडोल्फला ३४ चेंडूत चार चौकारांसह ३९ धावांवर बाद करून भागीदारी मोडली. रवी रामपॉल दुसऱ्या स्पेलसाठी परतला आणि त्यानंतर जे काही घडले ते नाट्यमय होते. केवळ पाच चेंडूंमध्ये रामपॉलने दक्षिण आफ्रिका मास्टर्सच्या मधल्या फळीला धक्का दिला. कॅलिस (४५), फरहान बेहार्डियन व डेन विलासला बाद केले. त्याआधी हाशिम अमला (३) याला बाद केले. शेवटच्या षटकात रायन मॅकलरेनच्या बळीसह रवी रामपॉलने ५ बळी टिपले व दक्षिण आफ्रिका संघाचा डाव अखेर ८ बाद १७१ धावांवर आटोपला.

**संक्षिप्त धावफलक** : वेस्ट इंडिज मास्टर्स २००/५ (लेंडल सिमन्स १०८, चाडविक वॉल्टन ३८ नाबाद, ब्रायन लारा २९; गार्नेट क्रुगर २/१४, मखाया एन्टिनी २/३४) ने दक्षिण आफ्रिका मास्टर्सचा १७१/८ (जॅक कॅलिस ४५, रिचर्ड लेव्ही ४४, जॅक रुडोल्फ ३९; रवी रामपॉल ५/२६) यांचा २९ धावांनी पराभव केला. ◂(वृत्तसंस्था)

# क्रीडा मंत्रालयाचे कुस्ती महासंघावरील निलंबन मागे

### राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तडस यांनी केले स्वागत



◆ **वर्धा, १२ मार्च**

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघावरील निलंबन मागे घेतले. या निर्णयामुळे देशांतर्गत स्पर्धा, आशियाई आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी राष्ट्रीय संघाची निवड करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा भारतीय कुस्ती संघाचे सदस्य माजी खासदार रामदास तडस यांनी स्वागत केले.

१५ महिन्यांपूर्वी क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघाचे निलंबन केले होते. विविध स्पर्धांच्या आयोजनासाठी न्यायालयाने भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनला कुस्ती महासंघाचे कामकाज हाताळण्यासाठी एड-हॉक पॅनेल पुन्हा सुरू करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, यूडब्ल्यूडब्ल्यू फक्त भारतीय कुस्ती महासंघाला मान्यता देत असल्यामुळे देशाच्या सर्वोच्च क्रीडा संस्थेने नकार दिला होता. त्यामुळे अनेक राष्ट्रीय स्पर्धा झाल्या नाही. तसेच भारतीय संघ दोन जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकला नाही. प्रशिक्षण शिबिरे बंद झाले. निर्बंधामुळे खेळाडू कोणत्याही मोठ्या स्पर्धेत भाग घेऊ शकत नव्हते. त्यामुळे भारतीय पहेलवानांचे मोठे नुकसान झाले.

कुस्ती संघावरील निर्बंध हटविल्यामुळे कुस्ती खेळासाठी मोठा दिवस आहे. महाराष्ट्रातील कुस्तीगीरांनासुद्धा एक मोठी सुवर्ण संधी प्राप्त झाली. पूर्वी हरयाणा येथीलच जास्तीत जास्त पहेलवान आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जात होते. या निर्णयामुळे पुन्हा राष्ट्रीय स्पर्धा सुरू होईल व महाराष्ट्रातील पहेलवानसुद्धा राष्ट्रीय, आशियाई, कॉमनवेल्थ, ऑलिम्पिक, आशियाई स्पर्धेत सहभागी होईल, असे रामदास तडस यांनी कळवले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# प्रणवी, दीक्षा, अवनी सज्ज

### ऑस्ट्रेलियन महिला क्लासिक गोल्फ उद्यापासून

◆ **कॉफ्स हार्बर , १२ मार्च**

भारतीय गोल्फपटू प्रणवी उर्स, दीक्षा डागर आणि अवनी प्रशांत शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन महिला क्लासिक गोल्फ स्पर्धेसाठी सज्ज झाल्या आहेत.

गत आठवड्यात ब्रिस्बेन येथे होणाऱ्या स्पर्धा अल्फ्रेड चक्रीवादळामुळे रद्द करण्यात आला होत्या, त्यामुळे या भारतीय महिला गोल्फपटू या स्पर्धेत खेळण्यासाठी उत्सुक असतील.

सरावासाठी मर्यादित संधी असल्यामुळे त्यांना स्पर्धेपूर्वी रेंजवर सराव सत्रांवर समाधान मानावे लागेल. कॉफ्स कोस्ट प्रदेशात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे ऑस्ट्रेलियन महिला क्लासिक ५४ होलपर्यंत कमी करण्यात आल्याची पुष्टी लेडीज युरोपियन टूरने केली आहे.

स्पर्धा आता शुक्रवारी सकाळी सुरू होणार आहे, स्थानिक वेळेनुसार सकाळी ७.३० वाजता पहिला टी टाइम होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# रोहितलाच स्वतःच्या भविष्याबद्दल ठरवू द्या : दिलीप वेंगसरकर

**नवी दिल्ली** : भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मासारख्या महान खेळाडूंना त्यांच्या भविष्याबद्दलचा स्वतः निर्णय घेण्यासाठी वेळ द्यायला हवा व त्यालाच स्वतःच्या भविष्याबद्दल ठरवू द्यायला हवे, असे मत भारतीय संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केले.

आयसीसी चॅम्पियन्स चषकादरम्यान भारतीय कर्णधार रोहित शर्माच्या निवृत्तीबद्दलच्या वावड्या उठल्या होत्या, त्यामुळे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर नाराज झाले होते. तथापि, चॅम्पियन्स चषकानंतर सध्याच वन-डे क्रिकेटमधून निवृत्तीचा विचार नाही, असे रोहितने स्पष्ट केले.



# जिल्हा खो-खो संघाच्या कर्णधारपदी जुबेर शेख व सादिया मुल्ला

### शेवगाव येथील वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी संघ रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापूर जिल्हा खो-खो संघाच्या कर्णधारपदी उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या जुबेर शेख व किरण स्पोर्टस् क्लबच्या सादिया मुल्ला यांची निवड करण्यात आली. शेवगाव (अहिल्यानगर) येथे १३ ते १६ मार्च दरम्यान होणाऱ्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेण्यासाठी जिल्हा संघ रवाना झाले

जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतून निवड समिती सदस्य धोंडीराम पाटील (सांगोला), विजय दत्तू (मंगळवेढा) व उमाकांत गायकवाड (सोलापूर) यांनी निवडलेले संघ सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशिनचे सरचिटणीस ए. बी. संगवे यांनी जाहीर केले. संघास असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या.





पुरुष संघाचे सराव शिबिर उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने ह. दे. प्रशालेच्या मैदानावर व महिला संघाचे सराव शिबिर किरण स्पोर्टस् क्लबच्या वतीने वसुंधरा महाविद्यालयाच्या मैदानावर झाले. या शिबिराचा समारोप ह. दे. प्रशालेचे पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने यांच्या हस्ते झाला. यावेळी निवृत्त तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण, सरचिटणीस ए. बी. संगवे, सहसचिव राजाराम शितोळे, उत्कर्ष क्रीडा मंडळाचे सचिव अजित शिंदे, खजिनदार उमाकांत गायकवाड, किरण स्पोर्टस्‌चे सचिव मोहन रजपूत, संघव्यवस्थापक वैभव लिगाडे आदी उपस्थित होते.

**संघ असा : पुरुष** : जुबेर शेख (कर्णधार), विजय संकटे, जाफर शेख (उत्कर्ष मंडळ), अक्षय इंगळे, सौरभ चव्हाण, राकेश राठोड, समर्थ कोळी, रोहन रजपूत (किरण स्पोर्टस्), अजित रणदिवे, गणेश बोरकर, अजय कश्यप, कृष्णा बनसोडे (अर्धनारी नटेश्वर, वेळापूर), तुषार चव्हाण (फ्लाईंग स्पोर्टस् पंढरपूर), आकाश हजारे, अमोल केदार (शिवप्रतिष्ठान मंगळवेढा). प्रशिक्षकः आशिष औदुर्ती, संघव्यवस्थापक : वैभव लिगाडे

**महिला** : सादिया मुल्ला (कर्णधार), सृष्टी रुपनवर, गौरी कासवीद, सपना बंडे, साक्षी व्हनमाने, अर्चना व्हनमाने, आरती खरात, सृष्टी नारायणी (किरण स्पोर्ट्स), स्नेहा लामकाने, समृद्धी सुरवसे, साक्षी देठे, श्रुती कस्तुरे (के.के. स्पोर्टस्, वाडीकुरोली), विशाखा लोखंडे (साकत प्रशाला, बार्शी), अक्षता परचंडे (समृद्धी स्पोर्टस्), सृष्टी काळे (न्यू सोलापूर), प्रशिक्षक : मोहन रजपूत, संघव्यवस्थापिका : समृद्धी बगले.

# मराठा प्रीमियर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धा २६ मार्चपासून

### १६ संघांनी नोंदविला सहभाग; एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापूर शहर जिल्ह्यामधील मराठा समाजातील क्रिकेट खेळाडूंसाठी मराठा प्रीमियर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नेहरूनगर येथील शासकीय क्रीडांगणावर करण्यात आलेले आहे. या स्पर्धेची सुरुवात २६ मार्चपासून सुरू होणार असून अंतिम सामना ३० मार्च रोजी खेळण्यात येणार आहे,अशी माहिती आयोजक प्रशांत बाबर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. सोलापुरातील विजापूर रोडवरील नेहरू नगर शासकीय मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेमध्ये सोलापूर शहरांमधील आठ संघ व सोलापूर ग्रामीण मधील आठ संघ असे सोळा संघाने सहभाग नोंदविला आहे. ही स्पर्धा टेनिस बॉलवर खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये एकूण २५६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे.

या स्पर्धेतील सर्व खेळाडूंना ड्रेस प्रा. शिवाजीराव सावंत यांच्याकडून देण्यात आलेले आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक एक लाख रुपयांचे आहे. द्वितीय पारितोषिक ५१ हजार रुपयांचे शुभम भोसले यांच्या वतीने देण्यात आलेले आहे. तृतीय पारितोषिक २५ हजार रुपयांचे विजय कोकाटे मोहोळ यांच्या वतीने देण्यात आलेले आहे. या स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांमध्ये मालिकावीर साठी १० हजार रुपयांचे पारितोषिक डॉ. सुमित मोरे यांच्या वतीने देण्यात आलेले आहे, तर उत्कृष्ट फलंदाज व उत्कृष्ट गोलंदाज यासाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांचे पारितोषिक योगेश गवळी यांच्या वतीने देण्यात आलेले आहेत. या स्पर्धेतील सर्व ट्रॉफी विक्रांत पवार यांच्या वतीने देण्यात आलेल्या आहे.ही स्पर्धा लीग पद्धतीने खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये प्रत्येक संघाला लीग मधील तीन सामने खेळावयास मिळणार आहेत. शहरातील आठ संघांचे खेळाडू ऑक्शन पद्धतीने निवडण्यात येणार आहेत. शहरांमधील मराठा समाजातील ज्या खेळाडूंना या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी शंकर पवार - ७०२०८३२०७९, अमोल जगताप - ९९६००१२०८०, सागर गव्हाणे - ९१३०७७३४५६, रोहित जाधव - ९०२१३९६५६४ यांच्याकडे नावे नोंदवावी, असे आवाहन आयोजक प्रशांत बाबर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस राम साठे, शंकर पवार, सागर गव्हाणे, रोहित जाधव, प्रा. अश्विन नागणे आदी उपस्थित होते.

**प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉ द्वारे बक्षीस**

या क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित राहणाऱ्या प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉ द्वारे बक्षीस देण्यात येणार आहेत. खेळांचे साहित्य असे या बक्षिसांचे स्वरूप राहणार आहे. या स्पर्धेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशांत बाबर यांनी केले आहे.

# अंगणवाड्यांच्या ३०८ जागांसाठी २,४८३ अर्ज

## महिला व बालविकास विभागाकडून अर्ज पडताळणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त व नवीन अंगणवाड्यांमध्ये १०८ सेविका व २०० मदतनीस पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी जिल्ह्यातून ३०८ रिक्त जागांसाठी २४८३ अर्ज आले आहेत. अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यातील महिलांचे सर्वाधिक अर्ज आहेत.

अंगणवाडी सेविकांना दरमहा १२ ते १५ हजार रुपये तर मदतनीस महिलांना १० हजारांपर्यंत मानधन आहे. त्यामुळे अर्ज करण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून रिक्त जागांच्या आठ पट अर्ज कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत. इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण अपेक्षित असताना डीएड, पदवीपर्यंत शिक्षण झालेल्या तरुणी व महिलांनी यासाठी अर्ज केले आहेत. दुसरीकडे मदतनीस पदासाठी इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण आवश्यक आहे, तरीपण या पदासाठी बारावी, पदवीप्राप्त तरुणी- महिलांनी अर्ज केल्याचे महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यात विधवा, परितक्त्या महिलांचाही समावेश आहे. पूर्वी अध्यापन किंवा काम केल्याचा अनुभव असल्यास त्यालाही स्वतंत्र गुण आहेत. आता अर्ज करण्याची मुदत संपली असून सध्या अर्जाची छाननी व कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. पडताळणीअंती शैक्षणिक कागदपत्रांनुसार उमेदवारांना १०० गुण दिले जातात. प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर त्या याद्या गावागावात प्रसिद्ध करून हरकती मागविल्या जातील. प्राप्त हरकतींवर निर्णय झाल्यावर अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करून निवड झालेल्या महिला उमेदवारांना पडताळणी समिती कागदपत्रांची पडताळणी करेल, त्यानंतर प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल. त्या याद्यांवर १० दिवस हरकती मागवून त्या हरकतींवर निर्णय होऊन लगेचच अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे.

सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ६५ वर्षांपर्यंत अंगणवाडी सेविका, मदतनीस महिला काम करू शकतात. त्यानंतर किंवा कामावर असताना मयत झालेल्या सेविकांना केवळ एक लाख रुपये दिले जातात. तर मदतनीस कर्मचाऱ्यास अवघे ७५ हजार रुपये मिळतात. ही रक्कम वाढवावी, अशी मागणी आहे. परंतु, त्यावर शासन स्तरावरून अजूनही निर्णय झालेला नाही.

### उच्चशिक्षित महिलांचा अंगणवाडी सेविका होण्यास प्राधान्य

ग्रामीण भागात गावातच नोकरी मिळत असल्याने व दोन वर्षांपपासुन मानधनात वाढ होत असल्याने अनेक पदवीधर, उच्चशिक्षित व शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महीला अंगणवाडी सेविका होण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच अर्जांचे प्रमाण वाढले आहे.

### कामाप्रमाणे नाही दाम

शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी अंगणवाडी सेविका लाभार्थ्यांच्या घरापर्यंत जाऊन महत्वाची भूमिका बजावतात. शिवाय मुलांचे शिक्षणातील पाया भक्कम करण्याचे काम अंगणवाडी सेविका करीत असताना त्यांच्या कामाप्रमाणे त्यांना मोबदला मानधन मिळत नाही. त्यामुळे मानधन वाढ करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र नवनिर्माण सेना अक्कलकोटतर्फे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**अक्कलकोट, दि. १२ मार्च-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना अक्कलकोट तालुका यांच्या लोकसेवेसाठी घेतलेल्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, अक्कलकोट मनसे ता.अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष जयवंत हक्के, संतोष घोडके, विश्वास गजभार, वाहतूक सेना शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर, गोविंद बंदपट्टे, प्रकाश कोळी, मनोज बचुटे ,पवन देसाई आदींची प्रमुख उपस्थिती होती. रुग्णवाहिका अक्कलकोट तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, शहर संपर्क प्रमुख आदर्श मळगी, भैय्या स्वामी या सर्व सहकाऱ्यांनी उपलब्ध करून दिले.

### बार्शीमध्ये घरफोडी : १५ हजार लंपास, दोन संशयितांवर आरोप

**बार्शी, दि. १२ मार्च-**

येथील मांगडे चाळ परिसरात घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने १५,००० रुपये रोख रक्कम लंपास केली आहे. फिर्यादी अंजु अंकुश शिंदे (वय ३०) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे. अंजु शिंदे आपल्या कुटुंबासह घरात झोपलेल्या असताना दि. ११ मार्च रोजी रात्री १० वाजल्यापासून ते १२ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या पत्राशेडमधून प्रवेश करुन डब्यात ठेवलेले १५,००० रुपये रोख रक्कम चोरुन नेली. सकाळी उठल्यानंतर घराचे दार उघडे दिसले तसेच घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले होते. पैसे गायब असल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरात चौकशी केली. शेजारी राहणाऱ्या महिलेने फिर्यादीला सांगितले की, रात्री १ वाजण्याच्या सुमारास शेजारी राहणारे दोघांनी फिर्यादीच्या घरासमोरील सायकल व भांडी अस्ताव्यस्त फेकल्याचे दिसून आले होते. त्यामुळे फिर्यादी यांनी त्या दोघांवर संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.





## महिला दिनानिमित्त बार्शी नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मार्च-**

महिला दिनानिमित्त जनसुराज्य फाऊंडेशन व बार्शी नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने नगरपालीकेतील कंत्राटी तसेच कायम महिला कर्मचाऱ्यांचा साडी व टिफीन बॉक्स देऊन गौरव करण्यात आला. येथील यशवंतराव सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी फाऊंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे, नगरपालिकेचे आरोग्य विभागप्रमुख शब्बीर वस्ताद तसेच बार्शी परिवहन आगारप्रमुख मधुरा जाधवर, लोकमंगलचे शाखाधिकारी वर्षा शिंदे, रोटरी इनरव्हिल बार्शीच्या अध्यक्षा गौरी रसाळ, शहर पोलीस ठाण्याच्या उपनिरिक्षक सिंधु देशमुख, डॉ. आयेशा शेख, पत्रकार बंधु भगिनी तसेच पंचायतराज ग्रामविकास विभाग भाजपा बार्शी शहराध्यक्ष शिल्पा कांबळे, तालुका उपाध्यक्षा रेखा कसबे, लक्ष्मी शिंदे, राहुल भड, भाजपा पंचायतराज ग्रामविकास विधानसभा प्रमुख हेमंत रातंजनकर यांची उपस्थिती होती. सगीता चादणे यांनी सुत्रसंचालन केले.

## कुर्डूवाडीत सुरक्षा रक्षक भरतीला चांगला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १० मार्च-**



येथील विद्यानगर भोसरेच्या के. एन. भिसे कॉलेजमध्ये सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रम ंतर्गत व पसारा ॲक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी दिनांक १० मार्च २०२५ ते १३ मार्च पर्यंत सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम आयएसओ मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी ॲंड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.लि., के. एन. भिसे कॉलेज, प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत केला. या भरतीस चांगला प्रतिसाद असून दि.१० मार्च रोजी निवड झालेल्या युवकांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ यांच्या हस्ते जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. मदन पाटील, एनसीसी विभाग प्रमुख डॉ. थोरात, करिअर काऊन्स्लींग सेलचे प्रमुख प्रा. नरखडे उपस्थित होते. भरती झालेल्या युवकांना कायमची नोकरी दिली जाणार आहे. त्याचबरोबर पीएफ, मेडिकल, ग्रॅजुटी, पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील. महाराष्ट्र गार्ड बोर्ड नियमाप्रमाणे १५ हजार ते २३ हजार रूपयांपर्यंत पगार मिळेल व सर्व सूविधा दिल्या जातील. ही भरती प्रक्रिया दि.१० ते १३ मार्च २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ तसेच भरती अधिकारी महेश सरतापे आणि चंद्रशेखर सिंग यांनी केले आहे.

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पंढरपूर विभागाच्या प्रमुखपदी सतीश सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१२ मार्च-**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने सांगोल्यातील माजी नगरसेवक सतीश सावंत यांची वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या पंढरपूर विभाग प्रमुखपदी निवड करण्यात आली.त्यांना निवडीचे पत्र कक्षाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे व प्रमुख रामहरी राऊत यांनी दिले. यामध्ये सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस या चार तालुक्यांची जबाबदारी सोपवली आहे.



## अनिवासी भारतीय नवदाम्पत्याकडून शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १२ मार्च -**

उजनीनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना साक्षी मस्के व राजदीप मस्के या अनिवासी भारतीय नवदाम्पत्याकडून कंपास बॉक्स, कलर पेन्सिलसह शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.

साक्षी व राजदीप मस्के यांचा नुकताच विवाह झाला. हे दाम्पत्य कॅनडामध्ये नोकरीस आहे. साक्षी बँक ऑफ मोंट्रियलमध्ये मॅनेजर पदावर तर राजदीप मस्के हे जॉन्सन ॲंड जॉन्सन कंपनीत मॅनेजर आहेत. विवाहाप्रित्यर्थ विद्यार्थाना मदतीचा त्यांचा मानस होता. तो त्यांनी टेंभुर्णीच्या उजनीनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देऊन पूर्ण केला. शिक्षक संजय लांडगे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उद्योजक नागेश बोबडे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा स्वराली बोबडे, विनोद शिंदे, नागेश कल्याणी, शिक्षक महादेव राखुंडे, रेखा बोबडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जॉकी सुर्वे, उपाध्यक्ष जयप्रकाश ननवरे हे उपस्थित होते. या उपक्रमाचे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासह सर्वांनी कौतुक केले.

## चव्हाण-शिंदे आदर्श मुख्याध्यापिका पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१० मार्च-**



कोर्टी (ता.करमाळा) येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका ज्योती चव्हाण-शिंदे यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेचा आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरात हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र माळी होते. या वेळी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र माळी, संचालक नवनाथ म ेहोळकर, शाखाध्यक्ष बापूसाहेब शिंदे, हेमलता साळुंके, भारत शेरे, बाळासाहेब भिसे, शिवम शिंदे, मृणाल शिंदे, ज्योती होगाडे, मंगल मोरे यांच्यासह सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील ११ तालुक्यातील आदर्श मुख्याध्यापक, क्रिडा शिक्षक, शिक्षक, कर्मचारी, आदर्श शाळा अशा एकूण ५५ जणांना पुरस्कार देण्यात आले. करमाळा तालुक्यातील आदर्श मुख्याध्यापिका ज्योती चव्हाण -शिंदे, क्रिडा शिक्षक भिमराव सरक (भारत हायस्कूल जेऊर), शिक्षक पोपट शिंदे (कन्या प्रशाला करमाळा), शिक्षकेतर कर्मचारी सोमनाथ ननवरे (घोटी) तसेच आदर्श शाळा श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय वीट यांचा स्नम ान करण्यात आला.

## माहेरा फरासने केला पहिला रोजा

**अक्कलकोट, दि. १२ मार्च-**



अक्कलकोटच्या मौलाली गल्लीतील माहेरा सोहेल फरास या सहा वर्षाच्या चिमुकलीने जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. रमजानमधील रोजाला मुस्लिम धर्मात खूप महत्व आहे. कुटुंबातील सर्व रोजा करत असल्याने माहेरानेही हा रोजा करण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी केला. प्रामुख्याने ७ वर्षांपेक्षा लहान मुले, मुली रोजाचा उपवास करीत नाहीत. परंतु माहेराने पहिला उपवास करण्याचा हट्ट करत तो पूर्ण केला. रोजा सोडण्यापूर्वी माहेराला आजी कडून नवीन कपडे व फुलाचा हार घालण्यात आला. म ाहेराचे आजी, आजोबा, आई, वडील, काका, काकू आणि भाऊ आदीसह सर्व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.

## निधन वृत्त...

### फुलाबाई भोसले



**मंगळवेढा, दि. १२ मार्च-**

उचेठाण येथील रहिवासी फुलाबाई राजाराम भोसले (वय ८०) यांचे मंगळवारी ११ मार्च रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात सूना, मुली, नातु असा मोठा परिवार आहे. ते माजी सैनिक कै. सुभाष भोसले व कै. बंडोपंत भोसले यांच्या ते मातोश्री तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन खंडागळे यांच्या आजी होत.

### प्रा. दत्ता नाईक



**सोलापूर, दि. १२ मार्च -**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. दत्ता भिकाजी नाईक, पर्वरी, गोवा यांचे राहत्या घरी वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. गेली ५१ वर्षे शैक्षणिक व सामाजिक कार्यात झोकून दिलेले एक तपस्वी कार्यकर्ता होते. शालेय व महाविद्यालयीन जीवनात कर्तृत्वावर स्कॉलरशीपवर शिक्षण घेतलेले व १९८२ अभाविपमध्ये विविध उत्तरदायित्व नंतर राष्ट्रीय उपाध्यक्ष पदावर कार्य. गोवा मुक्ती संग्राम, १९७५ मिसा कायदा अंतर्गत अटक आसाम व काश्मीर आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेतला.

### माणिक खटके



**सोलापूर, दि. १२ मार्च-**

बोरगांव (ता. माळशिरस) येथिल माणिक पाटलू खडके यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. ब्रिमासागर डिस्टलरीतील कामगार सदाशिव खटके व नारायण खटके यांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शहाजी काटकर



**सोलापूर, दि. १२ मार्च-**

वडजल (ता. माण, सातारा) येथील विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन शहाजी पांडुरंग काटकर (वय ४९) यांचे बुधवारी (दि. १२) सकाळी अल्प आजाराने निधन झाले. वडजल येथे त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, भाऊ, बहीण असा परिवार आहे. छायाचित्रकार रामदास काटकर यांचे लहान भाऊ होत.

### मंदार रानडे



**सोलापूर, दि. १२ मार्च-**

होटगी रोड, व्यंकटेश नगर येथील रहिवासी मंदार अरुण रानडे (वय ५०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. मंदार रानडे हे सोलापुरातील स्ट्रक्टऑन कन्सलटन्ट येथे कार्यरत होते. शासकीय रुग्णालयातील मेट्रन साधना चोळकर यांचे ते जावई होते. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ असा परिवार आहे.



## महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेल्या बार्शीच्या १६ स्काऊट गाईडचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मार्च-**

तामिळनाडू येथे डायमंड राष्ट्रीय स्काऊट गाईड जांबोरीसाठी निवड झालेल्या व भोर पुणे येथील राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बार्शीच्या महाराष्ट्र विद्यालयातील १६ स्काऊट गाईडचा सन्मान करण्यात आला.

देशभरातून २७ राज्यातून विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यातून ८८५ स्काऊट गाईड यांची निवड करण्यात आली होती. यामध्ये बार्शी येथील महाराष्ट्र विद्यालयाचे ८ स्काऊट, ७ गाईड, १ स्काऊट मास्टर व १ गाईड कॅप्टन यांची निवड करण्यात आली होती. यामधे फिजीकल डिस्प्ले, संचलन, स्टेट डे, शोभायात्रा, ग्रुप डान्स, संचलन, अशा विविध स्पर्धा झाल्या. उद्घाटन समारंभ व समारोपामध्ये महाराष्ट्राच्या लेझीमचे प्रदर्शन केले. या टीममध्ये अथर्व बीडकर, अथर्व शिंदे, रणवीर मोरे, अथर्व यादव, अथर्व सातपुते, शुभम यादव, सुखदेव गव्हाणे, सिध्दार्थ धुमाळ, आदिती पाटील, मृदुला गुरव, स्मिती निकम, स्वराली हावळे, मधुरा गुळवे, दिव्यांजली परबत, वेदांगी गुंजाळ, प्रतीक्षा गव्हाणे, आरती बरडे, प्रथमेश आवारी, स्वप्निल गव्हाणे, संस्कार गादेकर स्काऊट मास्टर योगेश उपळकर, गाईड कॅप्टन वैष्णवी सगट यांचा समावेश होता. या सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी.टी.पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मीराताई यादव, एस.बी. शेळवणे, कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, स्काऊट गाईड जिल्हा संघटक श्रीधर मोरे, अनुसया सिरसाठ यांनी अभिनंदन केले.

## सांगोल्यातील धुळीचा नागरिकांना त्रास

### नगरपरिषदेने उपाययोजना कराव्यात

### शहीद अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ मार्च-**



सांगोला शहर व उपनगरात नगरपरिषद अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम सर्वत्र सुरू आहे. त्यामुळे शहरातील सर्वच रस्ते उखडून ठेवले आहेत. शहरात नागरिकांना येताना आणि जाताना सर्वत्र प्रचंड धूळ उडते. या उडणाऱ्या धुळीमुळे जवळपास ५० हजाराहून अधिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. जे नागरिक नियमित शहरांमध्ये कामानिमित्त फिरतात त्यांना दमा, श्वसनाचे विकार वाढत आहे. त्यावर तात्काळ उपाययोजना कराव्यात अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने सांगोला नगरपरिषदेकडे केली आहे.

सांगोला शहरातील भुयारी गटार योजनेकरिता मोठ्या प्रमाणात निधी मंजूर होऊन काम प्रगतीपथावर आहे. शहरातील सर्वच भागात रस्ते खोदून या पाईपलाईनचे काम सुरू आहे पण हे काम पूर्ण झाल्यानंतर या ठिकाणी पूर्ववत चांगले रस्ते केव्हा होणार ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील सर्वच रस्त्यांची दुरावस्था आहे. २ ते ३ महिन्यानंतर पावसाळा सुरू होईल. त्यावेळेस फार मोठी समस्या शहरात निर्माण होऊ शकते. यादरम्यान नगरपालिकेने नियोजन करून भविष्यात स्थानिक नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन उपाय योजना कराव्यात अशी मागणी कामटे संघटनेने केली आहे.

### संपूर्ण शहरात पाणी मारल्यास धुळ उडणार नाही

शहरात, गल्लीबोळात वाहन आले की धुळ उडते. त्यामुळे व्यापारी, रहिवासी प्रचंड नाराजी आहे. शहरात सर्वत्र धुळीचे लोट पसरले आहेत. विना मास्क नागरिक शहरात फिरू शकत नाही अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. दिवसातून हजारो वाहने शहरात फिरतात. त्यावर उपाय योजना म्हणून दररोज दोन ते तीन वेळा सर्व शहरात पाणी मारून धुळीपासून नागरिकांची सुटका व शहरातील सर्व रस्ते करण्याची मागणी शहरवासीयातून होत आहे.

**-निलकंठ शिंदे, सांगोला.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अजित शिंदे, नागनाथ क्षीरसागर यांना सुवर्ण; सुरेश कुर्ले यांना रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च -**

राज्य वन विभागातर्फे प्रभावी कामाबद्दल तसेच वनसेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दलच्या सुवर्ण व रौप्य पुरस्कार मंगळवारी जाहीर झाले. येथील सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, उपवनसंरक्षक कार्यालयातील सर्वेक्षक नागनाथ क्षीरसागर यांना सुवर्ण पदक तर येथील वनरक्षक सुरेश कुर्ले यांना रौप्य पारितोषिक जाहीर झाले आहे.



राज्यभरातील वनसेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वनसंरक्षणाच्या प्रभावी भावी कामाबद्दल तसेच वन सेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दल देण्यात येणाऱ्या पदकांची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्यभरातून आलेल्या २०२० ते २०२३ दरम्यानच्या प्रस्तावाची छाननी करण्यात आली.

सहाय्यक वनसंरक्षक श्री. शिंदे यांना जुन्नर (पुणे) येथील वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून दोन वर्षांपूर्वी केलेल्या कामाबद्दल सुवर्ण पदक जाहीर झाले आहे. वनरक्षक कुर्ले यांनी मोहोळ, करमाळा येथील मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासह, वनजमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी केलेल्या कामासाठी पुरस्कार जाहीर झाला.

त्याचप्रमाणे या पदक निवडीमध्ये मूळचे सोलापूरचे असणारे सद्या सातारा सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी हरिश्चंद्र वाघमोडे यांनाही सुवर्ण पदक जाहीर झाले आहे. त्यांनी तीन वर्षांपूर्वी अमरावती, गडचिरोली येथे केलेल्या कामाबद्दल त्यांना सुवर्णपदक जाहीर झाले.

तसेच, जुन्नर (पुणे) येथील उवनसंरक्षक अमोल सातपुते यांनाही 'रजत' पदक जाहीर झाले आहे. जुन्नर येथील मानव बिबट संघर्ष कमी करण्यासह, लोक जागृतीबाबत सातपुते यांनी केलेल्या कामांची दखल घेऊन 'रजत' पुरस्कार मिळाला.

# विठुरायाच्या मुर्तीवर इपॉक्सी लेप करण्यास वारकरी सांप्रदायाचा विरोध

## वारकरी संप्रदाय पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ मार्च**

प्रतिवर्षी एखाद्या गणेशाच्या मुर्तीला ज्या प्रमाणे रंगरंगोटी केली जाते त्या प्रमाणे विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती कडून वारंवार विठ्ठल मुर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रियेचा घाट घातला जात आहे. त्यामुळे मुर्ती जतन आणि संवर्धन क्षेत्रातील तज्ञांच्या, अभ्यासकांच्या उपस्थिती मध्ये येत्या काळात विठ्ठल मुर्तीची पाहणी केली जावी. जर अशा प्रकारची प्रक्रिया करावयाचे सर्वानुमते सुचविण्यात आले तर भविष्यात शे, दीडशे वर्षे तरी पुन्हा मुर्तीवर प्रक्रिया करावी लागु नये अशा पध्दतीने, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन योग्य ती प्रक्रिया केली जावी.

दरम्यान मंदिर समितीकडून विठुरायाच्या मुर्तीवर केल्या जाणाऱ्या इपॉक्सी लेप प्रक्रियेस वारकरी सांप्रदायाचा विरोध असल्याची भूमिका पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी दैनिक सोलापूर तरुण भारत शी बोलताना स्पष्ट केली. या संदर्भातील वारकरी सांप्रदायाच्या भूमिकेबद्दल सविस्तर माहिती देताना वारकरी सांप्रदाय पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण वीर महाराज यांनी



सांगितले की, विठ्ठल रुक्मिणीच्या मुर्तीला पुन्हा एकदा इपॉक्सी लेपन अर्थात रासायनिक प्रक्रिया करण्या संदर्भातील चर्चा सुरु झालेली आहे. या अगोदर अनेक वेळेला ही रासायनिक प्रक्रिया केलेली आहे. याला कारण मुर्तीची झीज होते आहे असे दिलेले आहे. अलिकडच्या काळा मध्येच मुर्तीची कशी झीज होवू लागली हा वारकरी सांप्रदायापुढे पडलेला प्रश्न आहे. मागील वेळेला सुध्दा मुर्तीला अशा पध्दतीचा वज्रलेप करायला, रासायनिक प्रक्रिया करण्याला आम्ही विरोध केलेला होता. कोल्हापूरच्या महालक्ष्मीमातेच्या मुर्तीला अशा रासायनिक प्रक्रिया वारंवार करुन तेथील संपुर्ण मुर्ती खराब झालेली आहे. भविष्या मध्ये विठ्ठलाची मुर्ती खराब होवू नये अशी आमच्या भाविकांच्या मना मध्ये शंका आहे. याच्या करीता येत्या एक, दोन दिवसांमध्ये आम्ही मंदिर समितीला पत्र व्यवहार करुन ह.भ.प.देवव्रत (राणा) महाराज वासकर यांच्या नेतृत्वाखाली विठ्ठल मुर्तीची त्या क्षेत्रातील तज्ञांच्या व वारकरी संप्रदायातील महाराज मंडळीं सोबत पाहणी करण्याची आम्ही मागणी करणार आहोत. दरम्यान खरोखरच मुर्तीला आशा प्रक्रियेची गरज आहे का ? जर कोणती पक्रिया सुधारणेची त्याठिकाणी करावयाची असेल पुढच्या दोनशे, पाचशे, हजार वर्षे त्या मुर्तीला कोणतीही इजा होणार नाही अशा पध्दतीची दीर्घ कालिन टिकणारी प्रक्रिया करणे गरजेचे आहे. प्रतिवर्षी आपण एखाद्या गणपतीच्या मुर्तीला रंगरंगोटी करतो तशा पध्दतीची प्रक्रिया करणे चुकीचे आहे. जर अशा पध्दतीने मंदिर समितीकडुन पुन्हा एकदा मनमानी पध्दतीने जर ही मुर्ती रंगरंगोटी करण्याचा प्रयत्न करण्यात आला तर त्याला वारकरी सांप्रदाय तीव्र विरोध केल्या शिवाय राहणार नाही असा इशारा देखील वारकरी संप्रदाय पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी दिला आहे.

# चार उपजिल्हाधिकाऱ्यांना निवडश्रेणीत पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

राज्य सरकारने राज्यातील उपजिल्हाधिकारी संवर्गातील एकूण १२५ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश काढले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्हा महसूल प्रशासनातील एक महिला आणि तीन पुरुष उपजिल्हाधिकाऱ्याचा समावेश आहे. ही पदोन्नती निवडश्रेणीत देण्यात आली आहे.

ही पदोन्नती गेल्या १९१७ सालापासून रखडली होती. आता त्यासंबंधित आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. तसेच राज्यात लवकरच ८० अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे तयार करण्यात येणार आहेत. तसा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यामुळे महसूल अधिकाऱ्यांतून समाधानाचे वातावरण तयार झाले आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनातील निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक विभाग) आणि भूसंपादन अधिकारी प्रमोद गायकवाड या चौघांना निवड श्रेणीत पदोन्नती देण्यात आली आहे. याचबरोबर यापूर्वी सोलापूर जिल्ह्यात काम केलेल्या तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांत अधिकारी ज्योती पाटील, प्रांताधिकारी सचिन ढोले तसेच तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी अजित देशमुख, भूसंपादन अधिकारी श्रावण क्षीरसागर यांचाही या पदोन्नतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. या सर्वांचे नेमणुकीचे आदेश प्राप्त होताच त्या-त्या ठिकाणी ते रूजू होणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.

# विविध मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी अन् भारतीय बौद्ध महासभेचा सोलापुरात मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

जगभरातील व देशातील सर्व बौद्ध बांधवांच्या भावनेचा विचार व आदर करून १९४९ ची व्यवस्थापन ॲक्ट दुरुस्ती करावी या मागणीसह इतर मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर शहरात वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चाद्वारे दिलेल्या निवेदनात बुद्धगया येथील महाबोधी महाविहार तत्काळ मुक्त करण्यात यावा, बुद्धगया येथील महाबोधी महाविहार १९४९ च्या व्यवस्थापन ॲक्टमध्ये तात्काळ दुरुस्ती करून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धांच्या हाती देण्यात यावे, बुद्धगया महाबोधी महाविहार येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील सर्व मागण्या त्वरित मंजूर करण्यात याव्यात आदींचा समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन हा मोर्चा सिध्देश्वर मंदिर, पासपोर्ट कार्यालय, सिध्देश्वर प्रशालेमार्गे जिल्हा परिषदेच्या उपोषण गेट समोर आला. समाज बांधव या मोर्चामध्ये हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन सहभागी झाले होते, जय भीम व नमो बुद्धाय असा जयघोष करण्यात आला. १९४९ ची व्यवस्थापन ॲक्ट दुरुस्ती करावी या मागणीसह इतर मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत मडीखांबे, सरचिटणीस नागसेन माने, कोषाध्यक्ष मीनाक्षी बनसोडे, धम्मरक्षीता कांबळे, शांता गजभिये, पल्लवी सुरवसे, निर्मला कांबळे, नंदा काटे, आशा शिवशरण, बबन कांबळे, अतिश बनसोडे, सुनिता गायकवाड यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे दिसून आले.




# डिपीसीचा ९० टक्के निधी खर्ची; १० टक्के निधी या महिनाखेर खर्ची पडणार

**● जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार; शासनाकडून १०० टक्के निधी झाला प्राप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापूर जिल्हा नियोजन आराखड्यातील ७०२ कोटींपैकी ६३० कोटींची कामे पूर्ण झाली असून, ३१ मार्चपूर्वी उर्वरित ७० कोटींची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनासमोर आहे. यासाठी मनपा, नगरपालिका तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी युद्धपातळीवर काम करत आहेत. संबंधित ठेकेदारांकडून कामे करून घेत आहेत. पूर्ण झालेल्या ६३० कोटींच्या कामांची बिले मंजुरीसाठी अधिकाऱ्यांच्या टेबलावर आलेली आहेत.

या बिलांना लवकरच मंजुरी दिली जाणार आहे. एकंदरीत, डिपीसीमधून ९० टक्के निधी खर्ची पडला असून, उर्वरित १० टक्के निधीही लवकरच विकासकामांसाठी वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी दिली.

सोलापूरच्या जिल्हा प्रशासनाने २०२५ व २६ सालासाठी ८६१ कोटींचा नवीन वार्षिक नियोजन आराखडा सादर केला आहे. तर गतवर्षीचा ७०२ कोटीचा आराखडा शासनदरबारी होता. यातील गेल्या महिन्यापर्यंत ६० टक्केच निधी प्राप्त झाला होता. मात्र नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी याबाबत सविस्तर माहिती उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांना देवून उर्वरित ४० टक्के निधीचीही मागणी केली होती. यामुळे उपमुख्यमंत्री पवार यांनी मागील महिन्यात पुण्यात झालेल्या विभागीय बैठकीत यास मान्यता देवून ४० टक्के निधी वर्गही केला आहे. यानुसार एकूण ७०२ कोटीचा निधी सोलापूर जिल्ह्यास प्राप्त झाला असून, त्याद्वारे विविध विकासात्मक कामे केली जात आहेत.

### राज्य शासनाकडून काही प्रकल्पासाठी उदासीनता

सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक प्रारूप आराखडाअंतर्गत मंजूर २८२ कोटींच्या निधीतून उजनी धरण जल पर्यटन, विनयार्ड पर्यटन, कृषी व धार्मिक पर्यटन प्रकल्प मंजूर झाला होता. यास तूर्त स्थगिती मिळाली आहे. दुसरीकडे पंढरपूर येथे दर्शन मंडप व स्कायवॉक उभारण्यासाठी १२९.४९ कोटी रुपयांच्या कामांची निविदा प्रसिद्ध झाली होती. ही निविदा देखील रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे सोलापुरातील या प्रकल्पांना राज्य शासन पुढे नेईल की गुंडाळून टाकणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### आगामी वर्षासाठी २०० कोटीची अतिरिक्त मागणी

मागील वर्षी ७०२ कोटींचा विकास आराखडा मंजूर असून, शासनाकडून ७०२ कोटी निधी प्राप्त झाल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी दिली. विविध नियोजित कामांचा विचार करता यंदा २०० कोटींची अतिरिक्त निधीची मागणी उपमुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले



सोलापूर : चार पुतळ्यासमोर शहरात बुधवारी सायंकाळी सकल हिंदू समाजाच्या वतीने अबू आजमीच्या वक्तव्याच्या विरोधात जोडे मारून आंदोलन करण्यात आले. (छायाचित्र : केवल तिवारी)


# डॉ.आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी यशपाल वाघमारे

**सोलापूर, दि. १२ मार्च**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्ताने दयानंद कॉलेज स्टुडंट्स सर्कलचच्या डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळ अध्यक्षपदी यशपाल वाघमारे यांची निवड झाली. यावेळी संयोजक रूपेश थडसरे, सह-संयोजक अभि शिंगे, प्रमुख सल्लागार-अनिकेत गायकवाड, आकाश चंदनशिवे, सिध्दांत काळे, सुनिल मस्के, रॉक मुरुमकर, अविनाश गायकवाड, अनिकेत बनसोडे,किरण जगताप आदी उपस्थित होते.



**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्ष- सुयश गायकवाड, सुमित जानराव, अनिकेत वाघमारे, कार्याध्यक्ष मिलिंद गायकवाड, खजिनदार क्षितीज मोरे, सह खजिनदार अनिकेत जानराव, सचिव प्रिन्स वामने. आदी.




## सोलापूर जिल्ह्यासाठी गुड न्यूज

# मार्च संपत आला तरी एकाही पाणी टँकरची नाही मागणी

### गतवर्षी कोट्यवधींचा खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

२०२३-२४ साली (गतवर्षी) जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने मार्चमध्येच दुष्काळी नियोजन आराखडा तयार केला होता आणि १३७ गावे, ९१२ वस्त्यांवर राहणाऱ्या ४ लाख लोकांसाठी तब्बल १६७ पाण्याचे टँकर एप्रिलपासून चालू केले होते. या पाणी टँकरचे नियोजन मार्च महिन्यातच केले होते आणि हे नियोजन ऑगस्ट-सप्टेंबर २०२४ पर्यंत केले होते.

यंदा मात्र मार्च महिना संपत आला तरी जिल्ह्यातील एकाही गावातून अद्याप पाणी टँकरची मागणी आली नसल्याची गुड न्युज टंचाईचे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली. या चालू वर्षात जिल्हाभरात सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने जिल्ह्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा अन् जनावरांच्या चाऱ्याचा वर्षभराचा तसा तर प्रश्न मिटला आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत परतीच्या पावसाचा जोर झाल्याने अद्याप सर्वत्र पाणीसाठा मुबलक असून, आजतागायत जिल्ह्यातून एकही पाण्याच्या टँकरची मागणी आली नाही. दरम्यान, ज्या ठिकाणी पाणी टंचाई जाणवेल. अशा ठिकाणी पाणी टँकर देण्यात येणार असून, जिल्हा परिषदेकडून अशा गावांचा टंचाई आराखडा तयार असल्याची माहितीही नाटेकर यांनी दिली.




गतवर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात अती दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने कोट्यवधीचा खर्च करावा लागला होता. यामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, जिल्ह्यातील टंचाईवर मात करण्यासाठी २५० च्याहीवर पाण्याचे टँकर लागले आणि चारा टंचाईवर पर्याय म्हणून गवत बियाणे वाटपासाठी २५० कोटीच्या पुढे खर्च करण्यात आला होता.

यंदा मात्र शासनाचा हा सर्व खर्च सध्यातरी वाचला आहे. एप्रिल ते जून २०२५ अखेरपर्यंत ज्या भागात टँकर द्यावी लागतील, तितकाच खर्च जिल्हा प्रशासनाला यंदा करावा लागणार आहे. यंदा जिल्हाभरात सरासरीच्या दीटपट पाऊस झाल्याने चोहीकडे मुबलक पाणीसाठा झाला आहे. जिल्ह्यातील सर्व धरणे, साठवण तलाव, विहिरी, नाले-ओढे, नद्या भरभरून वाहिले आहेत. यामुळे अजूनही सर्वत्र पाणी दिसत आहे. पाण्याची पातळीही वर आलेली आहे. यामुळे सध्यातरी कोठेही पाण्याचे टँकर सुरू केले नाही. यंदा उजनी धरणासह मध्यम प्रकल्पांपैकीही एकरूख, हिंगणी, जवळगाव, मांगी, आष्टी, बोरी, पिंपळगावढाळे आदी प्रकल्पांतही १०० टक्के इतका पाणीसाठा झाल्याने जिल्ह्याची तहान सध्यातरी भागत आहे.

जनावरांचा चारा-पाण्याचा प्रश्नही सुटला आहे. इतकेच कायतर उजनीतून दोन आवर्तनेही आजतागायत सोडली आहेत. यामुळे शक्यतो काही गावातच टँकरच्या पाण्याची गरज भासेल, असा अंदाजही नाटेकर यांनी वर्तविला. तरीही काही गावात पाण्याची गरज भासते; अशा गावांसाठी पुढील महिन्यापासून पाणी टँकर देण्याची व्यवस्था जिल्हा प्रशासनाने केल्याचेही शेवटी नाटेकर यांनी नमूद केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बेगमपेठेत गळफास लावून तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

येथील बेगमपेठेत राहणा-या तरुणाने घरातील पंख्याला लुंगीच्या सहाय्याने गळफास लावून घेऊन आत्महत्या केली.

हा प्रकार मंगळवारी रात्री ७.५० वाजता उघडकीस आला. अमीर अब्दुलसत्तार शहाजी (वय २८, रा. बेगम पेठ) असे तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री ७.५० च्या सुमारास अमीर राहत असलेल्या घरात कोणीही नव्हते.त्यावेळी त्याने घरातील पंख्याला लुंगीच्या सहाय्याने गळफास



घेतला. ही बाब माहिती होताच नातेवाईकांनी घराच्या खिडकीला असलेली काच फोडून घरात प्रवेश करून त्याला गळफासातून सोडवले. त्यानंतर रुग्णवाहिकेतून बेशुध्दावस्थेत हवालदार काळेल यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## ▸▸क्राईम वृत्त...

### पैशाच्या व्यवहारातून लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

पैशाच्या व्यवहारातून लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून एकास जखमी केले. हा प्रकार बुधवारी सकाळी ११.३० वाजता ७० फूट रस्त्यावरील निलम बेकरी समोर घडला. तिरुपती व्यंकय्या चिलवेरी (वय ३९, रा. जोडभावी पेठ, सोलापूर ) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी सकाळी ११.३० वाजता तिरुपती हा निलम बेकरीसमोर थांबला असता, सदानंद पुट्टा याने पैशाच्या कारणातून लाकडाने मारहाण केल्याने नाकाला जखम झाली तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने तिरुपती स्वत : शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### दारुच्या नशेत ब्लेडने स्वत:ला केले जखमी

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

दारुच्या नशेत तरुणाने हातावर ब्लेडने मारून घेऊन स्वत:ला जखमी करून घेतले. हा प्रकार मंगळवारी रात्री ११ वाजता घडला. आकाश अशोक व्हनमाने (वय २७,रा. गजानन नगर, जुळे सोलापूर ) असे तरुणाचे नाव आहे. आकाश यास दारुचे व्यसन आहे. मंगळवारी रात्री तो नशेत असताना, त्याने ब्लेडने हातावर मारून घेऊन स्वत:ला जखमी करून घेतले. तो राहत असलेल्या घरी हा प्रकार घडला. आई रुपाली यांनी त्यास शासकीय रुग्णालयात बुधवारी रात्री २ वाजता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बेगमपुरात दोन महिलांना संशयावरून मारहाण

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

संशयावरून मोहोळ तालुक्यातील बेगमपुरात दोन महिलांना जणांनी मारहाण करून जखमी केले. हा प्रकार मंगळवारी सायंकाळी पाच वाजता घडला. मुक्ता देवप्पा जाधव (वय ३०) व सोमक्का देवप्पा जाधव (वय ६०, दोघी रा. बेगमपूर ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या महिलांची नावे आहेत. मंगळवारी सायंकाळी मुक्ता आणि सोमक्का या दोघी बेगमपुरातील त्यांच्या राहत्या घराजवळ होत्या. त्यावेळी सचिन शेळके, अर्जुन जाधव हे इतर आठ जणांसह तिथे आले. त्यांनी संशयावरून दोघींना तलवारीने म ारहाण केल्याने हाताला जखम झाली आहे. तर काठी तसेच दगडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने कामती येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून रुग्णवाहिकेतून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी सकाळी दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आर्थिक तणावातून तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

आर्थिक तणावातून तरुणाने फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मुळेगाव रोडवरील नारायण नगरात मंगळवारी सायंकाळी ६.४५ वाजता घडला. अशपाक रफिक पठाण (वय ३०, रा. नारायण नगर, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी ६.४५ वाजता अशपाक याने आर्थिक तणावातून राहत्या घ्ररात फिनेल प्राशन केले. त्यात त्याला त्रास होऊ लागल्याने पत्नीने रात्री ७.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सैनिक नगरजवळ अडवून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १२ मार्च -**

विजापूर रोडलगतच्या सैनिक नगरजवळ मंगळवारी रात्री १० वाजता तरुणाला अडवून काचेच्या बाटलीने मारहाण करून जखमी केले. ऋषीकेश प्रमोद सावळे (वय २४, रा. आशा नगर, एमआयडीसी, सोलापूर ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास सैनिक नगर येथून विजापूर रोडच्या दिशेने ऋषीकेश येत होता. त्यास दोघांनी अडवून अज्ञात कारणातून काचेच्या बाटलीने मारहाण केली. यात त्याच्या डोक्याला जखम झाली आहे. तसेच सर्वागास मुकामार लागल्याने मित्री हादीभाई पिरभाई यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# महिलांकडून पुरुषांना उद्या दंडुक्याचा प्रसाद

## बंजारा समाजाची होळीच्या दुसऱ्या दिवशी धुंड प्रथा

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या तांड्यांमध्ये आजही होळी सण मोठया उत्साहाने साजरा केला जातो. यावेळी लेंगीगीत, पाल, गेर व धुंड यासारख्या परंपरा जतन केले जात आहेत. म्हणून बंजारा समाज बांधवांसाठी होळी व धुलिवंदन सण महत्त्वाचा मानला जातो. होळी सणामध्ये तांडयातील सर्व अबालवृध्द व महिला एकत्र येऊन आनंदाने व ऊत्साहाने एकमेकांना काठीने मार देत व शिव्या देत धुंड व होळी सण साजरा करतात. बंजारा समाजातील महिला होळीमधील धुंड कार्यक्रमाच्या प्रतीक्षेत असतात.

ज्या कुटुंबामध्ये मुलगा जन्माला आला आहे, त्या कुटुंबामध्ये मुलाचा बारसं करण्यासाठी धुंड कार्यक्रम केला जातो. धुंड करताना तांडयातील प्रमुख नाईक, कारभारी व पंच एकत्र येऊन व काळया घोंगडीचे मंडप पाल टाकून त्या मुलांचे बारसं साजरा करतात. या पालमध्ये त्या मुलाला बसवून सर्व महिला एकत्र येऊन मंडपाला ठोळी म ारतात. एक प्रकारे या माध्यमातून महिला व पंच लोकांकडून त्या लहान मुलाला आशीर्वाद देण्याचे काम केले जाते. शेवटी त्या कुटुंबाच्या घरासमोर पंचमंडळींसाठी खिरीचे गोड जेवण



करण्यात येते. यावेळी जमीनीत दोन फूट खड्डा मारून दोन्ही बाजूला काठीने बांधुन खिरीसह हंडा जमीनीच्या आत ठेवण्यात येते. तो हंडा जमिनीतून वर काढण्यासाठी पुरुषांकडून प्रयत्न सुरू असताना महिलांकडून शिव्या देत काठीने मार दिला जातो.

आपल्या घरातील पती, मुलगा किंवा तरुण व ज्येष्ठ अशा प्रकारचा कुठलाही भेदभाव व दुजाभाव न करता त्या महिलांकडून पुरुषांना काठीने मार देण्यात येतो. यावेळी पुरुष मंडळी त्या महिलांना वारंवार चकवा देत तो हंडा जमीनीच्यावर काढण्याचा प्रयत्न करतात. महिलांकडून अनेक वेळा काठीने मार मिळत असताना पुरूष कुठल्याही प्रकारचा राग व द्वेष मनात न ठेवता हंडा वर काढतात. शेवटी पंचांसह उपस्थित समाज बांधवांमध्ये गोड जेवण व प्रसाद वाटप करण्यात येते. अशा प्रकारे पुरूषांना काठीने मारण्याचा महिलांसाठी महत्वाचा कार्यक्रम धुंड साजरा केला जातो. मात्र, धुंडमध्ये काठीने मारणारे व मार खाणारे परिचयाचे असले तरी एक प्रथा व परंपरा म्हणून हा कार्यक्रम चेष्टा व खेळीमेळीने घेतला जातो. धुंडनंतर कुणीही त्याठिकाणच्या शिव्या व काठीने मारण्याचा उल्लेखही करीत नाहीत. दरवर्षी प्रत्येक तांड्यांमध्ये चार ते पाच धुंड कार्यक्रम साजरा करण्यात येतो.

होळी आणि धुंड हा बंजारा समाज बांधवांसाठी मोठ्या आनंदाचा दिवस असतो. त्यामुळे बंजारा समाज बांधव दरवर्षी होळीची प्रतीक्षा करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदन दिवशी सकाळी बंजारा समाजाकडून होळी पेटवण्यात येते. यासाठी तांड्यातील नाईक, कारभारीसह पंच धुळवड साजरा करतात. होळीच्या दिवशी रात्री लेंगी व गाणी म्हणत त्या गावामध्ये जाऊन गावातील प्रमुख असणाऱ्या व्यक्तींकडे होळी साजरा करण्यासाठी परवानगी म्हणून तांड्यातील पाच गवऱ्या गावातील होळीमध्ये टाकतात आणि तेथील पाच गवऱ्या त्या आपल्या होळीसाठी घेऊन जातात. यावेळी बंजारा समाजातील परंपरा असणाऱ्या अनेक गाणी व नृत्य सादर करण्यात येतात. धुलिवंदनच्या दिवशी रात्री सर्व महिला व पुरुष एकत्र येऊन एकमेकांच्या मनातील राग व द्वेष माफ करण्याची मागणी करतात आणि मोठ्या उत्साहाने होळी व धुलीवंदन सण साजरा करतात. अशा प्रकारे अनेक वर्षापासून होळी व धुंड साजरा करण्याची प्रथा बंजारा समाजामध्ये आजही सुरू आहे.

**धुंड नसल्यास होळी नाही**

समाजातील महिलांसाठी महत्वाचा असणारा धुंड नसेल तर बंजारा समाजाकडून होळी पेटविण्यात येत नाही. मात्र दरवर्षी धुंड असल्याने आतापर्यंत अपवादानेच होळी न पेटविण्याचा योग आल्याचे ज्येष्ठ मंडळी सांगतात.

● **धुंडमध्ये महिला व पुरूष भेदभाव नाही :** होळी व धुंड साजरा करताना तांडयामध्ये महिला व पुरूष तसेच आपला व परका असा भेदभाव नसतो. महिला हौसेने शिव्या देत काठीने मार देत असले तरी पुरूष खुशीने स्वीकारतात. यामुळे एकमेकांमध्ये आपुलकी निर्माण होते. त्यामुळे बंजारा समाज होळीची आतुरतेने प्रतीक्षा करतात.

**-शिवाजी चव्हाण, नाईक नगर तांडा, मंद्रुप**

● **ऊत्साहाचा व आनंदाचा सण :** बंजारा समाजासाठी होळी व धुंड कार्यक्रम ऊत्साहाचा व आनंदाचा सण आहे. यावेळी सर्व समाजबांधव एकत्र येत मनामध्ये कोणत्याही प्रकारचे कटुता न ठेवता सण साजरा करतात. शिवाय समाजाच्या प्रथा व परंपरांचेही जतन केले जाते. यामुळे बंजारा समाज एकत्र येते.

**-सचिन राठोड, रावजी तांडा, मंद्रुप**

● **महिलांसाठी अनोखा ऊत्साह :** होळी सण पुरूषांसाठी महत्वाचा मानला जातो. मात्र होळीमध्ये धुंड कार्यक्रम असल्याने हा सण महिलांसाठी दोन दिवस महिला व पुरूष असा भेदभाव न करता सण साजरा केला जातो. भेदभाव व दुजाभाव न करता सर्वांना काठीने मार व बंजारा भाषेत शिव्या देण्यात येतात.

**- शालन चव्हाण , सदस्य, पंचायत समिती, मंद्रुप**

## ३० लाखांचे केमिकल घेऊन फसवणूक; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

केमिकल खरेदी करून ३० लाख १७ हजार १४४ रुपयांची फसवणुक करणाऱ्या हैद्राबादच्या दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत मनोहर सिद्राम वलसा (वय ३४, रा. रविंद्र नगर, एमआयडीसी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रवी कुमार सुदर्शी (रा. ६५, साई कृपा वनस्थली पुरम, हैद्राबाद, तेलंगणा) आणि पी एन राव यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर वलसा यांची मेडीकेअरसाठी लागणारे केमिकल विकण्याची कंपनी आहे. वलसा आणि रवि सुदर्शी हे दोघे एकमेकांना ओळखतात. २५ मे २०२४ रोजी रवि सुदर्शी व राव यांनी वलसा यांच्या मेडिकेअर कंपनीकडून ३० लाख १७ हजार १४४ रुपये किंम तीचे मिक्स झायलोन केमिकलचे ५८ ड्रम, नायट्रोबेझीर केमिकलचे ४० ड्रम खरेदी केले होते. त्या बिलाचे पैसे न देता सुदर्शी व राव यांनी वलसा यांना रकमेचे चेक दिले होते. हे चेक वलसा यांनी वठविण्यासाठी बँकेत सादर केले असता दोघांच्याही बँक खात्यात पैसे नसल्यामुळे ते वठले नाहीत. त्यामुळे आपली फसवणुक झाल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक तरंगे पुढील तपास करीत आहेत.

## ग्रामीण भागात होळीसाठी गोवऱ्या जमा करण्याची प्रथा


### मोठी होळी पेटविण्याची स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

होळी सणासाठी ग्रामीण भागामध्ये शेतातील , वाडी वस्ती व इतर ठिकाणी लावण्यात आलेल्या शेणाच्या गोवऱ्या व लाकडं जमा करून होळी साजरी करण्याची प्रथा आजही सुरू आहे. त्यामुळे होळीमध्ये एक प्रकारचा मनोरंजनात्मक उत्साह दिसून येतो . ग्रामीण भागामध्ये होळी म्हणजे शिमगा सण मोठया उत्साहाने साजरा करतात . मात्र या होळीच्या पंधरा दिवस आधी गोवऱ्या अथवा लाकडं जमा करण्यासाठी लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत सर्वजण एकत्र येतात. परिसरातील कुटुंबाकडे शेणाच्या गोवऱ्या व घरगुती वापरासाठी आणून ठेवण्यात आलेल्या लाकडं कल्पना न देता उचलून नेण्यासाठी मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा दिसून येते . होळीची ही परंपरा जतन करण्याची प्रथा आजही सुरू आहे .



होळीच्या आधी पंधरा दिवस सर्व प्रकारचे गोवऱ्या व लाकडं जमा करून त्या एकत्र करतात व होळीच्या दिवशी रात्री होळी पेटवून मोठ्या प्रमाणात उत्साह साजरा करतात. एखाद्या घरातील अथवा परिसरातील जळणाचे साहीत्य उचलून नेल्यानंतर घरमालकांकडून अथवा शेतकऱ्यांकडून त्या मुलांना कुठल्याही प्रकारे उध्दट बोलले जात नाही. उलट आपल्या घरातील जळणाचे साहीत्य होळीमध्ये पेटल्याचा एक प्रकारचा समाधान त्यांच्यामध्ये दिसून येते. म ात्र सर्व मुले दिवसा त्या जागेची पाहणी करतात आणि रात्री सर्वजण एकत्र येऊन तेथील गोवऱ्या व लाकडं उचलून आणतात . अशा प्रकारच्या प्रथा व परपरातून संघटन व आपुलकी वृधिंगत होते. शिवाय होळी दिवशी मुले एकत्र घरोघरी जाऊन प्रत्येक घरातून पाच गोवऱ्या जमा करून सर्वात मोठी होळी करून आपल्यातील वाईट विचार , प्रथा व परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. होळीमध्ये उत्साह आणण्याचे काम या माध्यमातून दिसून येतो . जमा केलेल्या गोवऱ्या व लाकडं एकत्र करून होळी पेटविताना लहान थोर सर्वजण एकत्र येऊन जल्लोष करतात . या माध्यम ातून एकमेकांमध्ये प्रेम व आपुलकी वाढीस लावते. संगणकाच्या युगातही ग्रामीण भागात प्रथा व परंपरा जतन करण्याचे काम होत आहे.



**बच्चे कंपनींचा मोठा सण**

होळी सणाखेरीज इतर वेळी कुटुंबामध्ये लहान मुलांना जोराने आवाज करताना रागावले जाते. मात्र होळीच्या दिवशी लहान मुले जोरजोराने ओरडत असले तरी घरातील मंडळी रागवत नाहीत. उलट त्यांना होळीच्या दिवशी ओरडण्यासाठी संधी दिली जाते.

# ७ जानेवारी ते आजतागायत १९,४३४ अभिलेख झाले अद्ययावत

▸▸अभिलेख कक्षात पाठविले ९,०९५ अभिलेख

▸▸८ हजार ३६२ अभ्यांगतांनी दिल्या भेटी






**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना १०० दिवस उद्दिष्टपूर्ती बाबत सात सूत्री कार्यक्रम दिला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांच्या सर्व विभाग प्रमुखांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने लेखी सूचना यापूर्वीच निर्गमित केलेल्या होत्या. त्यानुसार सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयात सात सुत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केला. दरम्यान, ७ जानेवारी ते आजतागायत जिल्ह्यातील १९,४३४ अभिलेख अद्ययावत झाले असून, अभिलेख कक्षात ९,०९५ अभिलेख पाठविले आहेत.

तर याच कालावधीत १४२ आपले सरकार पोर्टलला परवानगी दिल्याने नागरिकांची चांगली सोय झाली आहे. इतकेच नाहीतर या ठिकाणी काही अडचण आल्यास क्युआर कोड देवून त्यावर तक्रारी नोंदविण्याची सोय केली आहे. या कालावधीत ८ हजार ३६२ अभ्यांगतांनी जिल्हाधिकारी कार्यालयांना भेटी दिल्या आणि त्यांच्या समस्या अडचणी, तक्रारी निवारण करण्याचा प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय येथे अभिलेख कक्ष व क्षेत्रिय स्तरावरील अभिलेख कक्ष स्वच्छ तसेच अद्यावतीकरणाचे काम सुरु असून, आत्तापर्यंत अभिलेख कक्षात ९,०९५ अभिलेख पाठविण्यात आलेले आहे, अभिलेख कक्षात १९,४३४ अभिलेखे अद्यावत करुन ठेवण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत काम सुरु आहे. जनतेचे तक्रार निवारण करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय येथे अभ्यागतांना भेटीसाठी दिवस व वेळ ठरवून देण्यात आलेली असून कार्यालयात येणा-या सर्व अभ्यागतांच्या नोंदीसाठी नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. तसेच तक्रारीच्या अनुषंगाने आपले सरकार पोर्टलवर तक्रारी नोंदवून घेतल्या जातात. कार्यालयीन सोयीसुविधा जिल्हाधिकारी कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय येथे अभ्यागतांना बसण्यासाठी सोय, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच स्वच्छता गृहाची सोय करण्यात आली असून, काही ठिकाणी नवीन स्वच्छतागृहे प्रस्तावित केले आहे.




● **विविध समित्या नेमल्याने अनेक कामे सुकर**

आर्थिक व औद्योगिक गुतवणूकीस प्रोत्साहन देणेसाठी जिल्हास्तरावर समिती नेमण्यात आलेली आहे. तसेच उपविभागीय स्तरावर देखील समिती नेमण्यात आली आहे. व्यापारी व औद्योगिक वसाहत यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नियतकालिक बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

● **क्यु आर कोडमुळे सर्वसामान्यांचे हित**

नाविन्यपूर्ण उपक्रम-नागरिकांना महा ई सेवा, आपले सरकार केंद्र यांच्याबद्दल काही तक्रारी असल्यास त्या सोडविण्यासाठी प्रत्येक महा ई सेवा, आपले सरकार केंद्र तसेच तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी एक क्युआर कोड तयार करुन तो प्रसिध्द केला आहे. याचबरोबर तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी क्षेत्रिय कार्यालयांना भेटीचे आयोजन केले आहे. त्यानुसार क्षेत्रिय भेटी करुन नागरिकांच्या अडीअडचणी सोडविणे व शासकीय प्रकल्पांना भेटी देणेचे कामकाज केले जाते.

● **जिल्हा नियोजन कार्यालयास मागितला कोट्यवधींचा निधी**

जिल्ह्यातील विविध कार्यालयीन सोई- सुविधांसाठी जिल्हा नियोजन कार्यालयास खालीलप्रमाणे निधी मागणी करण्यात आलेली आहे.कार्यालय दुरूस्ती / नुतनीकरण-७४,७७,०००/-, कर्मचारी व अभ्यागतांसाठी प्रसाधनगृह दुरूस्ती / नवीन बांधकाम १,१७,६५, २०१/-, कार्यालयाची रंगरंगोटी- ४२,८२,३७५/-, फर्निचर-८०,०६,६७९/-, अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय तयार करणे / पत्रा शेड-३७,८४,०००/-

**- मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी**

## शरद बॅकेची ८६ लाखांची फसवणूक करणाऱ्या आठजणांविरुध्द गुन्हा दाखल

● **बँकेकडे गहाण ठेवलेली मिळकत परस्पर विकली**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

बँकेकडे गहाण ठेवलेली मिळकत परस्पर विकून शरद बँकेची ८६ लाख १९ हजार ९५९ रुपयांची फसवणुक करणाऱ्या आठजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शरद बँकेचे अधिकारी दत्तात्रय वसंत चटके (वय ५३, रा. लकी चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अरूणा दत्तात्रय इटाई, मनोज संजीव शेरला, मनोजकुमार लल्लनप्रसाद शर्मा, मंगला इटाई, अशोक गायकवाड, शामला महादेव ताकपीरे, जितेंद्र इटाई, जिलानी शेख (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अरूणा इटाई व मनोज शेरला यांनी सन २०१८ मध्ये सब रजिस्टार कार्यालय येथे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील कसबे सोलापूर येथील सिटी सर्व्हे नं. ११३/३ पैकी क्षेत्र १ हेक्टर ० आर ही मिळकत शरद नागरी सहकारी बँकेत तारण गहाण ठेऊन बँकेकडून ४० लाख रुपये कर्ज घेतले होते. कर्जासाठी मनोज शर्मा, मंगला इटाई, अशोक गायकवाड, शामला ताकपीरे, जितेंद्र इटाई, जिलानी शेख हे सर्व जामीनदार आहेत. इटाई व शेरला यांनी त्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे सध्या बँकेची थकबाकी ही ८६ लाख १९ हजार ९५९ रुपयांपर्यंत गेली. दरम्यान जून २०२३ मध्ये कर्जदार व जामीनदार या सर्वांनी मिळून बँकेला तारण म्हणून ठेवलेली जमीन ही परस्पर विकून टाकली. बँकेकडे तारण गहाण म्हणून ठेवलेली जमीन ही परस्पर विकून बँकेचे कर्ज व त्यावरील व्याज मिळून ८६ लाख १९ हजार ९५९ रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी आठजणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवाळे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५५

**किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा ।**
**तो मातेचा सोयरा। केतुला पां ।।**

योगमार्गापेक्षा भक्तीमार्ग सोपा आहे, हे सांगून झाल्यानंतर भगवंत आता अर्जुनाला भक्तिमार्गावरुन चालणाऱ्या भक्तांशी आपले नाते कसे असते हे सांगत आहेत. भक्तिमार्गावरुन चालणाऱ्या भक्ताने मीपणा सोडून दिलेला असतो. एखादे कर्म त्याने केले तरी, हे कर्म मी केले असे तो म्हणत नाही. त्या कर्माच्या फलाची अपेक्षा ठेवत नाही. उच्च नीच असा भेद तो पाळत नाही. प्राणीमात्र हीच ईश्वराची खरी रुपे आहेत, असे समजून तो त्यांची मन:पुर्वक सेवा करीत असतो. त्यामुळे मी सुध्दा अशा भक्तांच्या प्रेमात मग्न होत असतो. असे भक्त मला खूप आवडतात. माझ्या सर्व प्राणीमात्रांवर त्याचे प्रेम असल्भ्याने मीही त्यांच्यावर निस्वार्थ प्रेम करतो. मला हे भक्त किती आवडतात हे सांगतांना भगवंत म्हणाले,



**किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पां ।।**

अर्थात, आईच्या पोटी जन्माला येणारे मूल आईला खूप आवडणारे असते प्रेमाचा विषय आला की, माऊली आईचे उदाहरण घेत असतात. स्त्री ही ममतेची, प्रेमाची मूर्ती असल्याचे माऊलींनी अनेक ठिकाणी पटवून दिले आहे.

आई जसे आपल्या मुलांवर प्रेम करते, तसेच मी अशा भक्तांवर करतो, असे भगवंत म्हणतात. भक्तांच्या ठिकाणी आपण लहान मोठा असा कसलाच भेद पाहत नाही. राजाच्या पत्नीने भीक मागण्याचे कारण नाही तसे माझ्या भक्ताने कोणत्याही प्रकारची काळजी करण्याचे कारण नाही. मी त्यांचे कोणतेही काम करण्यास लाजत नाही. माझे भक्त हेच माझे खरे कुंटूंब असते. माझे भक्त सर्वांच्या हृदयात स्थान करुन बसतात. म्हणून मीही त्यांना माझ्या हृदयात स्थान देतो. मी पणाचे ओझे त्यांच्या डोक्यावर नसलयाने ते हा संसार सागर सुखाने तरुन जातात. माझ्या भक्तांनी मन आणि बुध्दी माझ्या ठिकाणी एकरुप करुन टाकण्याने त्यांना कसलेच द्वैत दिसत नाही. सर्व जड जीव त्यांना समानच दिसतात. त्यामुळे ते कोणाचीही सेवा करण्यास, कोणालाही मदत करण्यास लाजत नाहीत. मी म्हणजे दूसरे-तिसरे कांही नसून हे सर्व जीवच आहेत, याची जाणीव त्यांना असल्याने ते खऱ्या अर्थाने आनंदी होतात, असे भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. भगवंताच्या सांगण्याप्रमाणे अर्जुन मीपणा टाकून सर्व प्राणीमात्रात ईश्वराला पाहू लागेल. आपणही माऊलींचे भक्तिमार्गावरील स्पष्टीकरण ऐकून आपल्यातला मीपणा टाकून, सर्व प्राणीमात्रात भगवंताला पाहू या.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १३ मार्च २०२५ | होलिका प्रदीपन हुताशनी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पौर्णिमा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्दशी (१०.३५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू. फाल्गुनी (३०.१८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - धृति (१३.०१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२३.२६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे.

**वृषभ :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वाहन चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मिळण्याची शक्यता. प्रवासाचा योग आहे.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. मानसिक संतोष निमर्ण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका. लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

# दोन महिन्यात महापलिका कर्मचाऱ्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणार

**आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची ग्वाही**

### महापालिकेत सर्व कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

दोन महिन्यात महापलिका कर्मचाऱ्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील, अशी ग्वाही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आज मिटिंग हॉल येथे महापालिकेतील सर्व कामगार संघटना यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रलंबित वारसा प्रकरण, प्रलंबित



पेन्शनर सेवकाची देणी,सातव्या वेतन आयोगाचा हप्ता,सफाई कामगार यांच्या निवासस्थानासाठी जागा, कालबद्ध पदोन्नती लाभ यासह विविध मागण्या कामगार संघटना पदाधिकाऱ्यांनी महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे मांडल्या. यावेळी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी वारसदारांच्या प्रलंबित प्रकरणी नियोजनबद्ध नियुक्ती देण्यात येईल. पेन्शनर सेवकाची प्रलंबित देयके देण्याची माहिती संकलित करून नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येईल या सह कामगार संघटनाच्या प्रलंबित मागण्या लवकरच निकाली काढण्यात येईल, अशी माहिती दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार,उपायुक्त आशिष लोकरे, मुख्यलेखापरीक्षक रुपाली कोळी, मुख्यलेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, नगर रचना विभागाचे उपसंचालक मनिष भिष्णूरकर, मुख्य सफाई अधिकरी नागनाथ बिराजदार, शकील शेख, कामगार क्रांती युनियनचे अध्यक्ष अशोक जानराव,अखिल भारतीय सफाई मजदूर संघटना अध्यक्ष बाली मंडेपू, कामगार संघटना संघर्ष समिती अध्यक्ष सायमन गट्टू, कामगार संघटना संघर्ष समिती उपाध्यक्ष बापू सदाफुले, श्रीनिवास मंदोलू, सरचिटणीस चांगदेव सोनवणे, प्रमुख संघटक श्रीनिवास रामगल,पेशनर संघटनेचे अध्यक्ष माऊली पवार, सचिव एम. आय. बागवान,धर्मवीर संघटनेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे,महापालिका वाहन चालक संघटना दिलावर मणियार आदी उपस्थित होते.



## भीमशक्ती संघटनेचे भजन आंदोलन

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

भीमशक्ती सामाजिक संघटना सोलापूर शहर जिल्हा यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय पूनम गेट येथे विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी भजन आंदोलन करण्यात आले. भीमशक्ती संघटनेचे नेते खा. चंद्रकांत हांडोरे यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आले.

बिहार मधील महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्धांच्या ताब्यात द्यावे. बिहारमधील आंदोलनास पाठिंबा दर्शवण्यात आला. सोलापूरमध्ये रविवारी मोदी या ठिकाणी असलेल्या चर्चमध्ये काही कार्यकर्त्यांनी प्रार्थना बंद करून मारहाण व साहित्याची मोडतोड केली. आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रा. शंकर खळसोडे यांनी भीम गीते सादर केली. याप्रसंगी सुबोध वाघमोडे, राजा कदम, उमेश सुरते, प्रमिला तुपलवंडे, ज्योती गायकवाड, नसरीन, सलीम मुल्ला, मयूर तळभंडारे, मेजर साबळे, इब्राहिम शेख, समीर मुजावर, रफिक शेख, विक्रम वाघमारे प्रकाश बनसोडे, माया कांबळे, राजश्री साबळे उपस्थित होते.

## भाजपाच्या संघटनात्मक निवडणूक प्रकियेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण देशभरात संघटन पर्व अभियान सुरू असून भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणी, सक्रिय सदस्य नोंदणी अभियान सुरू झाले आहे. या नोंदणीच्या आधारेच पक्षाचा बूथ अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, प्रदेशाध्यक्ष त्याचबरोबर राष्ट्रीय अध्यक्ष अशी निवड प्रक्रिया राबविण्यात येते. भाजपाच्या वतीने संघटनात्मक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे.




यामध्ये सक्रिय सदस्यता नोंदणी १५ मार्च, सक्रिय सदस्यता पडताळणी समिती २० मार्च, बूथ अध्यक्ष आणि बूथ समिती सदस्यांची निवड १० ते २० मार्च, मंडल अध्यक्ष आणि मंडल समिती सदस्यांची निवड २० ते ३० मार्च या कालावधीत पूर्ण करायची आहे. याविषयात भाजपा कार्यालयात शहराच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रत्येक संघटनात्मक जिल्ह्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर शहर निवडणूक प्रभारी म्हणून श्रीनाथ भिमाले पुणे हे काम पाहणार आहेत. विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक बूथ मध्ये तीन सक्रिय सदस्यांची नोंदणी करणे अनिवार्य असून शक्तीकेंद्र प्रमुख व बूथ अध्यक्षांच्या नियुक्त्या करून बूथ समिती लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. याप्रसंगी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख, माजी उपमहापौर शशिकला बत्तुल, माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, संजय कोळी, उपाध्यक्ष श्रीनिवास करली, अनंत जाधव, प्रशांत फत्तेपूरकर, जय साळुंखे, भूपती क्रमटम, प्रवीण दर्गोपाटील, अश्विनी चव्हाण, पांडुरंग दिड्डी, नारायण बनसोडे, विशाल गायकवाड, रूद्रेश बोरामणी, चिटणीस सुधाकर नराल, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, दत्तात्रय बडगु, चंद्रकांत तापडिया, विजया वड्डेपल्ली, ॲड. साधना सांगवे, राम वाकसे, मारेपा कंपली, जाकीर सगरी, अंबादास बिंगी, भलक्ष्मण गायकवाड, दिलीप पतंगे, दत्ता पाटील, सुनिल टोणपे उपस्थित होते.

## जिल्ह्यात आरोग्य तपासणी मोहीम राबविणार

### ० ते १८ वयोगटातील मुलांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१२ मार्च-**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० विशेष आरोग्य तपासणी मोहिम जिल्हयात दि.१ ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येत असून, या मोहिमेतंर्गत जिल्हयातील ०ते १८ वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.

जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ातंर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या सहकार्याने मुलांची आरोग्य तपासणी मोहिमेची सुरुवात करण्यात आली. सदर मोहिमेचे उद्घाटन राज्यस्तरावरुन उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या संकल्पनेतून राज्यातील ० ते १८ वर्षापर्यंतच्या बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने मोहीम जिल्हाभर राबविण्याचे निश्चीत करण्यात आले आहे. सदर मोहिमे अंतर्गत सोलापूर जिल्हयातील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ातंर्गत ४ हजार ७५४ अंगणवाडी व ४ हजार ०९९ शाळेतील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.




## भीमा कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील टाकळी-सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचा मागील ३० महिन्यापासून पगार झालेला नाही. साखर कारखाना कामगार संघटनेच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष दिलीप डोंगरे आणि सरचिटणीस हनुमंत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

फेब्रुवारी महिन्यात संघटनेच्यावतीने साखर कारखान्यासमोर आंदोलन केले होते. त्यावेळी प्रभारी कार्यकारी संचालक यांच्याबरोबर थकीत पगार आणि बाहेरील कंत्राटी कामगारांना कमी करून कायम कामगारांना कामावर घेण्याबाबत तसेच सर्व कामगार व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे २०१८ पासूनचे फायनल पेमेंट व पाच वर्षाचा प्रॉव्हिडंट फंड व ३० महिन्याचा थकीत पगार मिळाला नसल्याबाबत जाब विचारण्यात आला होता. याचप्रश्नी २०२३ आणि २०२४ साली जिल्हाधिकाऱ्यांसमोर थकीत पगार व फंड तसेच फायनल पेमेंटबाबत बैठक होऊन २०२४ पर्यंत सर्व पगार व थकीत पगार कर्मचाऱ्यांना देण्यासंदर्भात व्यवस्थापनाने लेखी स्वरूपात लिहून दिले होते. मात्र अद्यापही या कामगारांच्या मागण्यांना कारखाना प्रशासनाने म्हणावा तसा प्रतिसाद दिला नाही. कामगारांना काही न देता बाहेर कंत्राटी कामगाराकडून कारखान्यातील कामे करून घेतली जात आहेत.

संघटनेच्या मागण्यांचा तातडीने विचार न केल्यास यापुढे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भीमा सहकारी साखर कारखाना कामगार संघटनेने दिला आहे. या आंदोलनाप्रसंगी रमेश काळे, संतोष भोसले, संजय चव्हाण, भारत पवार, सुरेश डोंगरे उपस्थित होते.

## मोकळ्या मैदानात वाढदिवस साजरा करणाऱ्यांना पोलिसांचा दणका

### फटाके वाजवून दारू व गांजा बाळगणाऱ्या १४ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

रस्त्यावर गर्दी करून तसेच मोकळ्या मैदानात वाढदिवस साजरा करणाऱ्यांना पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे. पत्रकार भवन येथे येथे वाढदिवसाला फटाके वाजवून गोंधळ घालत असताना पोलिसांनी केलेल्या कारवाईत दारू व गांजादेखील मिळून आला. त्यामुळे सदर बझार पोलिस ठाण्यात १४ जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस शिपाई प्रविण कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इंन्झामम शकिल इनामदार, समर्थ सर्वगोड, गणेश वसंत बगाडे, गिरीष मिलींद खरात, सुमित चौका गायकवाड, विरेश गोटे, राहुल रिकी, अब्दुला शेख, धैर्यशील थोरात, अमन शिंदे, तेजेश जन्ने, साहेब शेख, आदेश जाधव, युसूफ लतीफ शेख (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

१२ मार्चला मध्यरात्रीला पत्रकार भवन येथील सिरत मिलेट्रीचे दवाखान्यासमोरील मिलेट्रीच्या मोकळ्या जागेत विरेश गोटे व इंन्झामम इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त वरील सर्वजण हे बेकायदेशीरपणे गर्दी करून फटाके वाजवून वाढदिवस साजरा करीत असताना सदर बझार पोलिसांनी केलेल्या कारवाईत पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन झडतीमध्ये त्यांच्याकडे दारू व गांजा मिळून आला. हवालदार चव्हाण तपास करीत आहेत.

## सोमवारी कृषी पर्यटन, भाकरी उद्योग मार्गदर्शन मेळावा

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

ड्रीम फाऊंडेशन व बसव संगम शेतकरी गटातर्फे सोमवार १७ मार्च रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत हॉटेल बालाजी सरोवर, पृथ्वी हॉल येथे कार्पोरेट हुरडा पार्टी, कृषी पर्यटन, भाकरी उद्योग मार्गदर्शन मेळावा आणि शेतकरी, युवा व महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी दिली. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार जयंती निमित्त आयोजित याचे उद्घाटन उप जिल्हाअधिकारी व पर्यटन विभागाचे संचालक अमृत नाटेकर यांच्या हस्ते व बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक राम रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली होईल. बालाजी अमायन्सच्या सपोर्ट दु फार्मर या उपक्रमांतर्गत बालाजी फाऊंडेशनच्या सहकार्याने राजमाती जिजाऊ भाकरी केंद्र, जय हिंद करीअर ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले आहे. स्टॉल बुकींगसाठी संगिता पाटील- ८४८४९५२०२० येथे व हुरडा पार्टी प्रवेश कुपनसाठी ड्रिम फाऊंडेश कार्यलय, जुळे सोलापूर येथे संपर्क साधावा. यावेळी दशरथ वडतीले, सदाशिव चौगुले, रियाज पठाण आदी उपस्थित होते.

## पोलिस कॅन्टीनमध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त

### पोलिस निरीक्षक उदयसिंग पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**


शहर पोलिस मुख्यालय येथे सुरु असलेल्या पोलिस कॅन्टीनमध्ये सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वस्तु या १० ते २० टक्के स्वस्तात उपलब्ध असल्याची माहिती पोलिस वेल्फेअर विभागाचे पोलिस निरीक्षक उदयसिंग पाटील यांनी दिली.




मुख्यालयातील सबसिडीअरी पोलिस कॅन्टीन येथे जी क्युब इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमातून सर्व प्रकारचे इलेक्ट्रॉनिक वस्तम १० मार्चपासून उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या वस्तूंचे उद्घाटन सहायक पोलिस आयुक्त राजन माने, सुधीर खिरडकर, पोलिस निरीक्षक उदयसिंह पाटील, शरद बारावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जी क्युब इलेक्ट्रॉनिक्सच्या सीईओ गुरप्रीत कौर-डिलॉन, महिला पोलिस उपनिरीक्षक जयदेवी काळे, कॅन्टीनचे व्यवस्थापक फुटाणे उपस्थित होते. पोलिस कर्मचाऱ्यांमधून इलेक्ट्रॉनिक्स वस्तू सवलतीच्या दरात मिळाव्यात, अशी मागणी होत होती. त्याचा विचार करून पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त अजित बोऱ्हाडे, सहायक आयुक्त सुरेंद्र माळाळे यांनी जी क्युब इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तू पोलिस कॅन्टीनमध्ये सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या आहेत. सूत्रसंचलन कमांडर अशोककुमार मनचंदाना यांनी केले. प्रमोद माढे यांनी आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७७) चंद्रमौलिश्वर

एकदा गुरुजी मद्रास प्रांतात प्रवासाला होते. तिथे कांची कामकोटी पिठाचे शंकराचार्य श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वतींचे दर्शन करण्याची त्यांनी इच्छा कळवली. शंकराचार्यांनी आपण आपल्या व्यस्त कार्यक्रमातून तुमच्या सोयीने वेळ काढून यावे व मला भेटावे. मला आनंद वाटेल व मी कृतकृत्य होईल असे कळवले. गुरुजी जेव्हा शंकर मठात आले तेव्हा शंकराचार्य पूजागृहात भगवद्गीतेची अर्चना करत होते. त्यांच्या शिष्याला पूजागृहात शंकराचार्य कुणालाच भेटत नाही, असे गुरुजींना सांगणे अवघड झाले. पण अचानक शंकराचार्यांनी गुरुजींना पूजागृहात पाठवा असा निरोप पाठवला. गुरुजी हात पाय धुवून पूजागृहात गेले. दोघांनी सोबत पूजा केली. नंतर तो शिष्य शंकराचार्यांना म्हणाला- आपण पूजा गृहात गुरुजींना येऊ दिले; असे कसे. त्यावर शंकराचार्य म्हणाले श्री गुरुजी प्रत्यक्ष चंद्रमौलिश्वर आहेत. परंतु त्यांना शाखा संघ कायर्यापेक्षा मोठे पद मान्य नाही. संघ हीच जीवन गाथा म्हणून त्यांनी स्वीकारली आहे.

**- क्रमशः**

# करकंब-उंबरे-करोळे रस्त्याचे दुरुस्ती काम सुरु

## ठिकठिकाणचे खड्डे, झाडांच्या फांद्यांमुळे वाहनधारकांना होत होता त्रास

**तभा वृत्तसेवा । राजू करपे**
**करकंब, दि. १२ मार्च-**

करकंब ते उंबरे-करोळे ता.पंढरपूर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे व चाऱ्या पडल्याने, रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाढलेल्या फांद्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांसह वाहनचालकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत होते.याबाबतचे वृत्त दैनिक तरुण भारतच्या दि.३ फेब्रुवारी रोजीच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते.त्या वृत्ताची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग करकंब यांचेकडून रस्ता दुरुस्तीचे काम चालू करण्यात आले आहे.

श्रीपूर येथील साखर कारखान्याकडे जाणारा शेतकरी वर्ग,अकलूज परिसरात जाणारा व्यापारीवर्ग,शिखर शिंगणापूर व पंढरपूर या तीर्थक्षेत्रांना जाणारे भावीक तसेच या भागातील नागरिक,व्यापारी,विद्यार्थी,शेतकरी नौकरदारवर्ग याच रस्त्याने जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक सुरू असते.या रस्त्यावरूनच पांडुरंग सहकारी साखर कारखाना श्रीपुर,विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना युनिट नंबर २ करकंब,श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे या कारखान्यांना ऊस घेऊन जाणारी वाहनेही ये जा करत असतात.खड्डे व चाऱ्या बुजवल्याने तसेच झाडांच्या फांद्या काढल्याने या रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनधारक व नागरिकांचा प्रवास काही प्रमाणात का होईना सुखकारक व सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.




**या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम झाल्याने या मार्गावरून सोलापूर ते अकलूज, मोडनिंब ते अकलूज,कुर्डवाडी ते अकलूज अशा एसटीच्या फेऱ्या लवकरात लवकर सुरू करण्यात याव्यात अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून करण्यात येत आहे.त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरीक व प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होणार आहे मोडनिंब,करकंब,जळोली, कान्हापुरी,उंबरे,करोळे,श्रीपुर येथील नागरीक, वाहनधारक अकलूज व अकलूज परिसरात जाण्यासाठी याच मार्गावरून प्रवास करत असतात. त्यांची यामुळे सोय होण्यास मदत होणार आहे.**

## संक्षिप्त वृत्त



### अन्नछत्र मंडळातर्फे माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १२ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोल भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातील काम देखील ओजस्वी असल्याचे मनोगत आंतरराष्ट्रीय माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी मैनुद्दीन कोरबू, सरफराज शेख, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, गोविंदराव शिंदे, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, प्रकाश लोंढे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.



### निस्वार्थ पशुप्रेमाचा आदर्श; विजय राऊत यांचा गोरक्षणासाठी पुढाकार

**बार्शी, दि. १२ मार्च-**

समाजासमोर निसर्गप्रेमी आणि गोरक्षण चळवळीचे एक आदर्श उदाहरण म्हणून ओळखले जाणारे विजय राऊत यांनी पुन्हा एकदा आपली निस्वार्थ वृत्ती दाखवून दिली आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे गोशाळेत जनावरांची संख्या वाढत असून, गोशाळेवरील चाऱ्याचे ओझे हलके करण्यासाठी नाना यांनी पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे, जाणीव गोशाळेतील अत्यंत अशक्त व भाकड गायी दत्तक घेऊन स्वतःच्या शेतात त्यांची योग्य प्रकारे काळजी घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यांनी संस्थेकडे सर्व कागदपत्रांची पूर्तता करून या गायींची जबाबदारी उचलली आहे. एवढ्यावरच न थांबता नाना राऊत आपल्या शेतात तीन एकर जागेत वैरण लागवडीचा संकल्प केला असून, यामधून तयार होणारी संपूर्ण वैरण ते जाणीव गोशाळेला देणार आहेत.



### वळसंगच्या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**वळसंग, दि. १२ मार्च-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन तसेच महिला दिन संपन्न झाला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलले माझा छत्रपती हे नृत्य केंद्रबिंदू ठरले. तर कन्नड जानपद गाण्याला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी रामलिंग चौडेश्वरी देवस्थान ट्रस्टतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले व युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी विस्तार अधिकारी गुरुबाळ सणके, माजी गट शिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, सरपंच जगदीश आंटद, श्रीशैल दुधगी, मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, सुभाष खैराटे, लक्ष्मण हंजगे, मल्लिनाथ भुसणगी, देविदास वाघमोडे, उद्योजक सिद्धेश्वर मोरे, सिद्धया मठपती, शरणाप्पा तिपरादी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष चनबसप्पा खैराटे, संगण्णा खैराटे, शंकर खैराटे, शिवप्पा हारगेरी, सिद्धाराम कोंडे,अध्यक्ष नागराज कोंडे, सोमशेखर हारगेरी, प्रेम खंबद, चेतन अंकद, किरण खैराटे, अभि अंकद, शिवकुमार नागठाण, सिद्धारूढ धडूते, राजकुमार मुळेगाव, संतोष हंजगे, विजय माणकोजी, दीपक खैराटे, सागर खैराटे, जिल्हा परिषद कन्नड शाळेचे मुख्याध्यापक संजीवकुमार सुतार, मुख्याध्यापिका शकुंतला अरळी, सृष्टी चिंचोळी, सुमित्रा म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार पत्रकार कल्लय्या स्वामी यांनी केले.



### मोहोळच्या व्यापारी मोफत वाचनालयात महिला दिन साजरा

**मोहोळ, दि. १२ मार्च-**

महिला दिनानिमित्त व्यापारी मोफत वाचनालय मोहोळच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व दीपप्रज्वलन करण्यात आले त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रेश्मा कुर्डे, साधना घाडगे, डॉ. स्नेहलता वाले, ज्योत्स्ना जोशी, मंदोदरी ढाणके, लक्ष्मी तावसकर उपस्थित होते. सूत्रसंचालन मोहोळचे ब्रँड अँबेसिडर राजन घाडगे यांनी केले यांनी तर आभार सहाय्यक ग्रंथपाल पुनम शिंदे यांनी मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधीर जोशी यांच्यासह उपस्थित महिलांनी महिला विषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ग्रंथपाल दिलीप देशपांडे, संचालक जयेश आराध्ये, शहाजान बागवान, बाबुराव ढाणके, रजनी गायकवाड, सुवर्णा शिंदे, रूपाली वाले, गीता साळी, मानसी सोनसाळी, स्वाती कलागते, दिपाली महामुनी, संगीता वाले उपस्थित होते.

# सांगोल्यात होममिनिस्टर अन् विविध स्पर्धा

## पैठणीच्या मानकरी ठरल्या प्रियांका भंडारे, पल्लवी कांबळे, मनीषा दिघे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ मार्च-**

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त तीन दिवस पाककला व रांगोळी स्पर्धा, फुलांचे सरबताचे प्रशिक्षण व कार्यशाळा तसेच होममिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येथीलपुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर स्मृती भवनात होममिनिस्टर कार्यक्रम घेण्यात आला. त्याचे उद्घाटन मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी व तनुजा गवळी व डॉ.निकिता देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी नगराध्यक्ष राणी माने, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा स्वाती अंकलगी, डॉ.नेहा साळुंखे पाटील, माजी नगरसेविका छाया मेटकरी, शोभा घोंगडे, रंजना बनसोडे, अप्सरा ठोकळे तसेच कर्तव्यदक्ष शहर संघाचे अध्यक्ष सुनंदा घोंगडे उपस्थित होते. मानाच्या पैठणीच्या मानकरी प्रियांका भंडारे, पल्लवी कांबळे, मनीषा दिघे या अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने विजयी ठरल्या. सूत्रसंचालन अनुपमा गुळमिरे यांनी केले.

दरम्यान कोल्हापूरच्या गार्डन क्लबच्या वतीने केमिकल फ्री फ्रुट पल्प प्रिझर्वेशन व फ्लोरल ड्रिंक्स (फुलांचे सरबत) या विषयावर प्रशिक्षण व कार्यशाळा घेण्यात आली. महिलांसाठी आयोजीत विविध स्पर्धेत अफरीन पठाण, विद्या तेली, माधवी खडतरे यांनी पाककलेत तर रेश्मा दिवटे, सुप्रिया दौंडे, गायत्री पाटणे यांनी रांगोळी स्पर्धेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. या सर्वांना बक्षीसा वितरण होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांगोला नगर परिषदेचे कर व प्रशासकीय अधिकारी अस्मिता निकम, कर निरीक्षक प्रियांका पाटील, रोहित गाडे, कार्यालय अधीक्षक सचिन पाडे, योगेश गंगाधरे यांनी परिश्रम घेतले.




डॉ. सुधीर गवळी यांनी सांगोला नगरपरिषदे मार्फत यापुढेही महिलांच्या स्वयंरोजगारासाठी व स्व-संरक्षणासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा मानस असल्याचे मत व्यक्त केले. डॉ.निकिता देशमुख यांनी महिलांना स्वतःच्या आरोग्याबाबत नेहमीच तत्पर राहण्याचा सल्ला दिला. यावेळी माजी नगराध्यक्ष राणी माने, स्त्रीरोग तज्ञ डॉ. नेहा साळुंखे पाटील यांनीही मनोगत मांडले.



# स्त्रियांचा सन्मान अखंड रहावा : तहसीलदार ठोकडे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १२ मार्च-**

महिलांकडे जगाला पुन्हा परिभाषित करण्याची शक्ती आहे. यातूनच स्त्रियांचा सन्मान अखंड रहावा. महिलांनी त्यांचे वेगळेपण स्वीकारावे आणि तुमच्यामधील शक्ती चमकू द्या, असे मत तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी व्यक्त केले. अकोले खुर्द (ता. माढा) येथील गणपती फार्मसी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. महिला दिनानिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, ड्रॉईंग स्पर्धा आशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या निबंधातून व स्पर्धेमध्ये प्रतिक्षा माने, कृतिका वैद्य, वृषाली राऊत, दिपाली सुळे, अनिकेत गायकवाड, यांनी सहभाग नोंदवला तसेच महिला दिनानिमित्त प्रमोदिनी लांडगे, सरपंच रुपाली नवले व प्राचार्या डॉ. रुपाली बेंडगुडे यांनी विद्यार्थीनींना महिला सुरक्षा व महिला सक्षमीकरण विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. प्रियांका खडसरे व प्रा. रूपाली राऊत यांनी कार्य केले.



# संभाजी ब्रिगेड महिला आघाडी तालुकाध्यक्षपदी अश्विनी पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मार्च-**

महिला दिनाचे औचित्य साधून संभाजी ब्रिगेडच्या अक्कलकोट महिला आघाडी तालुकाध्यक्ष पदी अश्विनी पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवडी संभाजी ब्रिगेड चे प्रदेक्षाध्यक्ष प्रविण गायकवाड आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम भैय्या दिगंबर कदम महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मिनल दास यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळेस संभाजी ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे निवडीने पत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडी अध्यक्षा मिनल दास, संपर्क प्रमुख छत्रगुण माने, कार्याध्यक्ष अरविंद शेळके वकील, आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, सिद्धाराम सवयगी, सतीश वावरे, फिरोज सय्यद, दिलीप निंबाळकर, गजानन शिंदे,संतोष सुरवसे,यशवंत लोंढे ,गौरीशंकर वरपे, रमेश भंडारे, सुमित मंदृपकर मल्लिकार्जुन शेवगार, श्रवण साळुंके, बबन डीगणे, प्रेम भोसले, मोनाली धुमाळ, माधुरी चव्हाण, सलबत्ते, जयश्री जाधव, सुनीता घंटे आदी उपस्थित होते.

## संतोष देशमुख यांच्या हत्येचा मोडनिंब येथे निषेध

**मोडनिंब, दि. १२ मार्च-**

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध व्यक्त करीत मोडनिंब (ता. माढा) येथे कॅन्डल मार्च काढण्यात आला. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकारातील सर्व आरोपींना तातडीने फाशी द्यावी, अशी मागणी मोडनिंब ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून कॅन्डल मार्च काढत निषेध व्यक्त केला. स्व. देशमुख यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली. कॅन्डल मार्चमध्ये सहभागी झालेल्या सर्वांनी हाताच्या दंडावर काळी फीत बांधून सहभाग नोंदवला. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज बलिदान मासनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी ६० ते ७० युवक उपस्थित झाले होते. यावेळी माजी सरपंच कुरण गिड्डे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, दीपक सुर्वे, ऋषभ कोठावळे, संजीव शिदे, अमर ओहोळ, प्रकाश कोळी, संभाजी तोडकरी, माऊली पवार, आकाश पाटील, विशाल पाटील, शेखर सुर्वे सहभागी झाले होते.

# जिव्हाळा शाळेच्या स्नेहसंमेलनात चिमुकल्यांचा उत्साही नृत्याविष्कार

## माजी विद्यार्थी अधिकारी यांचा झाला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.१२ मार्च -**

बाल चिमुकल्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर, गोंधळ, शेतकरी, दिंडी, भरतनाट्यम, लोकगीते, बालगीते, गरबा आदीसह अन्य नृत्याविष्काराने कुर्डूवाडी येथील जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर शाळेच्या स्नेहसंमेलनात रंग भरला होता.

येथील जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन (यशोगाथा २० सुवर्ण वर्षे) मोठ्या उत्साहात साजरे झाले. माजी आ. संजयमामा शिंदे, ज्येष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, डॉ. शशिकांत उंबरदंड, प्रशासनाधिकारी शाहू सतपाल, केंद्र समन्वयक लक्ष्मण कारंडे, चंद्रकांत वायचळ, माजी नगराध्यक्ष संजय गोरे, माजी उपनगराध्यक्ष हरिभाऊ बागल, संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ,




मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन व रंगमंच पूजन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ यांच्या सन २००७_-०८ च्या बॅचमधील तेजस पाटील, गणेश मोहिते, डॉ. संग्राम नरुटे, रणजीत पवार, तुषार राऊत, राजू साळुंखे, सचिन दडस, सलमान मुलानी, दत्तात्रय कुंभार, योगेश मासाळ, अभिजीत राऊत, सुभाष किसवे, रणजीत मासाळ, अमोल वाघमोडे, सागर घुसाळकर, निरंजन दगडे, संदीप किसवे, चंद्रकांत शेळके या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या कल्पना, विचार, भावना यांच्या तीनही भाषेतील हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. यशोगाथा-२० सुवर्ण वर्षमध्ये विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा, विविध स्पर्धा परीक्षेत, क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा संक्षिप्त आढावा स्टेजच्या दोन्ही बाजूच्या स्क्रीनवर दाखविण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख आकाश घोडके, रवी शहा सहशिक्षक किशोर मोहोळे, जयकुमार उपाध्ये, प्रदीप देशपांडे, नवनाथ बुरकुले, जयंत माळी, दिनेश आतकर, निलोफर सय्यद, साधना झोळ, सुवर्ण साळुंखे, प्रज्ञा ओहोळ यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सारिका गोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रदीप देशपांडे यांनी केले. जयंत माळी यांनी आभार मानले.

# बालकवर्गाची होळीपूर्व तयारी; गोवऱ्या जमा करण्याचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १२ मार्च-**

होळी सणानिमित्त गावातील बालकवर्ग मोठ्या उत्साहात गोवऱ्या जमा करण्यासाठी धावला. गावात पारंपरिक पद्धतीने होळी पेटवण्यासाठी गोवऱ्यांचा मोठा साठा केला जातो. या पार्श्वभूमीवर, बालकांनी आपापसात गट करून घराच्या अंगणातून, गोठ्यांतून गोवऱ्या जमा करण्याचा आनंद लुटला.

होळी सणासाठी ग्रामीण भागामध्ये शेतातील, वाडी वस्ती व इतर ठिकाणी लावण्यात आलेल्या शेणाच्या गोवऱ्या व लाकडं जमा करून होळी साजरी करण्याची प्रथा आजही सुरू आहे. त्यामुळे होळीमध्ये एक प्रकारचा मनोरंजनात्मक उत्साह दिसून येतो. ग्रामीण भागामध्ये होळी म्हणजे शिमगा सण मोठया उत्साहाने साजरा करतात. मात्र या होळीच्या पंधरा दिवस आधी गोवऱ्या अथवा लाकडं जमा करण्यासाठी लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत सर्वजण एकत्र येतात. परिसरातील कुटुंबाकडे शेणाच्या गोवऱ्या व घरगुती वापरासाठी आणून ठेवण्यात आलेल्या लाकडं कल्पना न देता उचलून नेण्यासाठी मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा दिसून येते. होळीची ही परंपरा जतन करण्याची प्रथा आजही सुरू आहे. गोवऱ्या चोरण्याची ही प्रथा अनेक गावात अनेक वर्षांपासून सुरू आहे. होळीच्या आधीच्या दिवशी बालकवर्ग गोवऱ्या जमा करण्यासाठी घरांमध्ये डोकावतो. काही ठिकाणी गोवऱ्या चोरण्याच्या गमतीशीर प्रसंगांवरून हशा-पट्टया रंगतात. काही घरमालक बालकांना हुसकावून लावतात, तर काही प्रेमाने त्यांना गोवऱ्या देतात. या परंपरेमागे बालकांमध्ये एकता आणि सहकार्याची भावना निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. गावातील जेष्ठ मंडळींनीही बालकवर्गाच्या आनंदात सहभाग घेतला. होळीच्या दिवशी संपूर्ण गावाला एकत्र आणणाऱ्या या प्रथेमुळे गावातील स्नेहबंध अधिक दृढ होत असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.



**गोवऱ्या जमा करण्याचा आनंद लुटताना अनिकेत केवटे, अथर्व सिंदखेड, आदित्य सिंदखेडे, महासिद्ध नरोटे, सिद्धार्थ देशमुख आदी.**

# २३ मार्च रोजी पेट कार्निवलचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मार्च-**

पेट शॉप ओनर्स असोसिएशन सोलापूरच्या माध्यमातून रविवार दि. २३ मार्च रोजी जुळे सोलापुरातील जामगुंडी लॉन येथे पेट कार्निवलचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सदस्य आशिष म्हेत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्निवलमध्ये भारतीय तसेच विदेशी श्वान आणि मांजर मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. सहभागी श्वानांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना विजेत्यास रोख बक्षीस, पारितोषिके वितरित केली जाणार आहेत. सहभाग प्रमाणपत्रही दिले जाणार आहे. यामध्ये पेट निमलचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून उद्योजक के. एस. नागराज शेट्टी यांची उपस्थिती लाभणार आहे. डॉग स्पर्धेसाठी पंच म्हणून केनेल क्लब ऑफ गोवाचे संस्थापक स्टीव अलमेडा आणि कॅट स्पर्धेसाठी पंच म्हणून पुण्यातील सचिन डेखुरे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रशिक्षित डॉक्टरांकडून श्वांनाची मोफत आरोग्य तपासणी तसेच मोफत रेबीज लसीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत अशा सर्वच शाळांना सहभागी होता येणार आहे, असे आशिष म्हेत्रे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस विशाल राठोड, अभिषेक वसगडेकर, निशिकांत कोटा, पवन ऐवळे, नितीन कुडक्याल आदी उपस्थित होते.

## दिव्यांगासाठी निधी खर्चाचे वैराग नगरपंचायतीकडून आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १२ मार्च-**

दिव्यांगाच्या पाच टक्के निधी खर्चाच्या बाबतीत वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शक सूचना घेऊन कार्यवाहीचे आश्वासन वैराग नगरपंचायतीकडून मिळाल्याची माहीती प्रहार संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष संजीवनी बारंगुळे यांनी दिली.

याबाबत प्रहार संघटनेचे संस्थापक माजी आमदार बच्चू कडू यांनी भ्रमणध्वनीवरून नगरपंचायत प्रशासनाला सोमवारी निधी खर्चा बाबत जाब विचारला होता. त्यावरून वैराग नगरपंचायतीने दिव्यांगाच्या पाच टक्के निधी खर्चाच्या बाबतीत वरिष्ठ कार्यालयाकडून सूचना घेऊन कार्यवाहीचे आश्वासन दिले. पाच टक्के दिव्यांग निधी खर्च करण्यात येत नसल्याचा आरोप प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आला होता.यासाठी २६ जानेवारीलाभीक मागो आंदोलन केले होते. त्यानुसार १० मार्चला उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, मुख्याधिकारी चरण कोल्हेंसह दिव्यांग बांधवांची बैठक झाली. मुख्याधिकारी कोल्हे यांना बच्चू कडू यांनी दिव्यांग बांधवांबाबत निर्णय घेताना तुमच्या वागण्यामुळे प्रत्येक वेळी आंदोलन करावे लागते असे खडे बोल सुनावले. सीईओ कोल्हे यांनी निधी वाटपासंदर्भात कार्यवाही करतो असे सांगितले. दिव्यांगाना विनाअट घरकुल, पाच टक्के निधी, दोनशे चौरस फूट जागा द्यावी, नगरपंचायत हद्दीमध्ये गाळा, नगरपंचायतमध्ये पाच टक्के आरक्षण, विविध योजनेचा लाभ यासह संघटनेने पंधरा दिवसांची मुदत मागवून घेतली आहे. जर मागण्या मंजूर झाल्या नाहीत तर आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्या जिल्हाध्यक्षा संजीवनी बारंगुळे यांनी दिला.यावेळी मंजुषा शिंदे, राजेंद्र जिरगे, राजेभाऊ गवळी, उमेश गवळी, मोहद्दीन नदाफ, काळे आदीसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



## अन्नछत्र मंडळाचे कार्य उल्लेखनीय : दिपक मानकर

**अक्कलकोट दि १२ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजय विजयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल जन्मेजय भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाने स्वामी भक्तांकरिता केलेल्या सोयी सुविधांमुळे सकल स्वामी भक्तांतून समाधान व्यक्त केले जात असून, गेल्या ३८ वर्षात स्वामी भक्त हा केंद्र बिंदू मानून सुरु करण्यात आलेले उपक्रम उल्लेखनीय व राज्यातील धार्मिक क्षेत्रात धर्मादाय न्यासांना दिशा देणारे असल्याचे मनोगत पुणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहर अध्यक्ष दिपक मानकर यांनी व्यक्त केले. ते पुणे येथील प्रसिद्ध भरत मित्र मंडळ यांच्या वतीने महाशिवरात्र उत्सव कार्यक्रमा निमित्त आयोजित सत्कारा प्रसंगी दिपक मानकर यांचा सत्कार मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी दिपक मानकर हे बोलत होते. यावेळी महाशिवरात्र उत्सव समिती ट्रस्ट चे अध्यक्ष बाळासाहेब दाभेकर, शिरीष मावळे (काका), बाळासाहेब देसाई-कुलकर्णी, लाला राठोड, चंद्रकांत सोनटक्के, संतोष भोसले, स्वामीनाथ गुरव, मैनोद्दीन कोरबू, सरफराज शेख, गणेश भोसले, महांतेश स्वामी, प्रशांत शिंदे, संतोष माने आदी उपस्थित होते.



## आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी, दि. १२ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत माजी आ. राजेंद्र राऊत मित्रमंडळ व डॉ. शेटे नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन अंकिता रणवीर राऊत व मृणाल रणजीत राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराचे मुख्य आयोजक ॲड. महेश जगताप होते. या शिबिरात महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी व नेत्र चिकित्सा सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या. डॉ. दिपक जगताप, डॉ. गजानन शेटे, डॉ. राजश्री शेटे, डॉ. सुबोध केसकर, डॉ. संपदा केसकर यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बप्पा जगताप यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिभा महेश जगताप, संगीता जाधव, रुपाली जाधव, आरती नागटिळक, अपर्णा जगताप तसेच माळे गल्ली, सावळे गल्ली आणि ब्राह्मण गल्लीतील महिलांनी मेहनत घेतली.



## जिल्ह्यात आरोग्य कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**पंढरपूर, दि. १२ मार्च -**

सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागातील एकूण चौसष्ट पुरुष व महिला आरोग्य कर्मचाऱ्यांचे दहा मार्च रोजी पदोन्नतीने समुपदेशन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते आरोग्य सहाय्यक व इतरांना पदस्थापना आदेश देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष महेश जाधव, जिल्हा अध्यक्ष शिवाजी कांबळे, सरचिटणीस धनाजी मस्के, महिला हक्क व संरक्षण समिती राज्य संघटक वंदना लोखंडे,जिल्हा अध्यक्ष संगीता हांडे, तांत्रिक पतसंस्थेचे चेअरमन श्रीमंती सलगर, पतसंस्था क्र.दोनच्या संचालक राणी सुतार, उपाध्यक्ष प्रकाश बिराजदार, कार्याध्यक्ष श्रीकृष्ण घंटे उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हाआरोग्य अधिकारी संतोष नवले यांनी पदस्थापना आदेश दिले.

## लवकरच म्हैसाळ योजनेचे पाणी सांगोल्यासाठी मिळणार

**सांगोला, दि. १२ मार्च-**



सांगोला तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीसाठीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेता, म्हैसाळ योजनेचे पाणी तातडीने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी घेरडी येथील ग्रामस्थांनी करत वस्तू स्थितीची माहिती देत माढा लोकसभा मतदारसंघाचे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी संबंधित विभागाचे अधिकारी चंद्रशेखर पाटोळे यांना दि.१२ मार्च रोजी फोन करून येत्या आठ दिवसात पाणी मिळालेच पाहिजे असे निर्देश त्यांनी दिले असून, प्रशासनानेही त्यास संमती दर्शवली आहे. त्यामुळे लवकरच म्हैसाळ योजनेचे पाणी सांगोल्यासाठी देण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले आहे.

# विठ्ठल मुर्तीवर तब्बल पाचव्यांदा होणार रासायनिक लेपन

### मंदिर समितीने विठ्ठल दर्शनाबाबत काही कठोर निर्णय घेण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १२ मार्च -**

सावळ्या विठुरायाच्या मुर्तीची झीज झाली आहे. त्यामुळे मूर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया करणे गरजेचे असल्याचे पत्र पुरातत्व विभागाकडून विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला प्राप्त झाल्याची माहिती समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. दरम्यान गेल्या तीस ते पस्तीस वर्षांचा विचार केला तर तब्बल पाचव्यांदा विठ्ठल मुर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या काळात विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने विठुरायाच्या दर्शनाबाबत कठोर निर्णय घेण्याची गरज असल्याचे मत भाविकांमधून व्यक्त होत आहे.

**दर्शनाबाबत कठोर निर्णयाची गरज**

विठ्ठलाच्या मुर्तीवर ३७ वर्षात आता तब्बल पाचव्यांदा लेपन प्रक्रिया केली जाईल. वारंवार लेपन प्रक्रिया करणे ही काही भुषणावह गोष्ट नाही. सततच्या लेपन प्रक्रियेमुळे कदाचित मुर्तीला देखील हानी पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतातील मोठ्या देवालयांचा विचार करता केवळ पंढरपूर तिर्थक्षेत्रीच विठुरायाचे पदस्पर्श दर्शन घेण्याची सुविधा आहे. त्यामुळे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने विठुरायाच्या दर्शनाबाबत येत्या काळात सर्वांना विश्वासात घेऊन भविष्यातील धोक्यांची तीव्रता सर्वांच्या कानी घालून काही कठोर निर्णय घेण्याची गरज निर्माण झाल्याची भावना काही सुज्ञ विठ्ठल भाविकांकडून व्यक्त होत आहेत. कारण विठ्ठल आहे तर पंढरपूर आहे. वारकरी सांप्रदायाचा विठ्ठल हा आत्मा आहे.





### ३७ वर्षात चारवेळा करण्यात लेपन प्रक्रिया

श्री विठ्ठलाच्या मुर्तीची झीज होत असल्याचे लक्षात येताच मंदिर समितीने पुरातत्व विभागाच्या तज्ज्ञांकडून १९ फेब्रुवारी १९८८ साली मूर्तीवर पहिल्यांदा एपॉक्सीचा लेप दिला. त्यानंतर २४ मार्च २००५ मध्ये पुन्हा मुर्तीवर सिलीकाँन लेप दिला. मध्यंतरी २०१२ मध्ये संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पुरातत्व विभागाकडून तिसऱ्यांदा वँकर बीएस २९० हे रसायन वापरुन लेप दिला. विठुरायाच्या मुर्तीवर २०२० मध्ये चौथ्यांदा रासयनिक लेपन प्रक्रिया पार पडली. त्यामुळे आता पाचव्यांदा विठुरायाच्या मुर्तीवर लेपन प्रक्रिया केली जाईल.

### गर्दीची समिकरणे बदलत आहेत

मागील तीस ते पस्तीस वर्षात भाविकांच्या गर्दीची समीकरणे बदलली असून वर्षाकाठी एक कोटीहून अधिक भाविक पंढरीत दर्शनासाठी हजेरी लावतात. या शिवाय आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री यात्रेच्या काळात देखील लाखांहून अधिक भाविक विठ्ठल दर्शनासाठी हजेरी लावतात. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन असल्यामुळे काही प्रमाणात मूर्तीवर याचा परिणाम झाला आहे. विठ्ठलमुर्तीच्या पायाची स्थिती सध्या उघड्या डोळ्यांनी भक्तांना पहावणार नाही अशी झाली आहे. कारण मुर्तीच्या पायाची मोठी झीज झाल्याचे दिसत आहे.

### चैत्री यात्रेनंतर होणार मुर्तीची पाहणी

पुढील महिन्यात चैत्री यात्रेचा सोहळा आहे. त्यामुळे चैत्री यात्रेनंतर पुरातत्व विभागाच्या आधिकाऱ्यांद्वारे मुर्तीची पाहणी करण्यात येणार आहे. त्यानंतर मुर्तीवर लेपन प्रक्रिये संदर्भातील अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

### वज्रलेप व इपॉक्सी यामध्ये फरक

पूर्वी मूर्तीवर वज्रलेप करण्याची प्रक्रिया होत होती. यामुळे मूर्तीचे संरक्षण होत असले तरी अनेकदा मूर्तीचा चेहरा किंवा इतर भागाचा आकारच बदलला जात असे. मात्र, आता अत्याधुनिक यंत्रणा आली असून यास इपॉक्सी म्हटले जाते. यामध्ये रासायनिक लेप लावून मूर्तीवर कोटिंग केले जाते.

### पंधरावर्षापूर्वीच केल्या महापूजा बंद

अनेक वर्षांपासून विठ्ठलाच्या मूर्तीवर झालेल्या महापूजांमुळे तिची झीज झपाट्याने होत गेली. त्यामुळे सन २००९ पासून इथल्या महापूजा बंद करण्यात आल्या. या बरोबरच पहाटे होणाऱ्या काकडा पूजेवेळी मूर्तीवर दही, मध, साखर यांचा होणारा अभिषेक बंद करण्याचा निर्णय घेतला. सध्या केवळ दूध व पाण्याचा अभिषेक केला जातो. मात्र, यानंतरही मूर्तीच्या संवर्धनासाठी रासायनिक प्रक्रिया करण्याची नितांत गरज आहे.

### विठुरायाची स्वयंभू मुर्ती

नाही घडविला नाही बैसविला अशी पंढरीतील विठुरायाबाबत संतांची व भाविकांची श्रध्दा आहे. शेकडो वर्षांपासून श्री विठ्ठल येथील राऊळात उभा आहे. विठुरायाची ही मूर्ती वालुकाश्म दगडाची असून ती स्वयंभू आहे. या मुर्तीचे वर्णन अलौकीक आहे. अनेक संतांनी देखील आपल्या अभंगातून विठ्ठल मुर्तीचे वेगवेगळे वर्णन केलेले आहे. मुळातच विठुरायाचे रुप हे सावळे गोजिरे आहे. त्यामुळेच विठुरायाला राजस सुकुमार मदनाचा पुतळा असे देखील संबोधले जाते.

### दर पाच वर्षांनी लेप देण्याच्या सूचना

खरंतर दर पाच वर्षांनी लेप द्यावा अशा सूचना पुरातत्व विभागाच्या होत्या. पुरातत्व विभागाने रासायनिक लेपन प्रक्रिया करण्यासंदर्भात विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला नुकतेच पत्र पाठविले आहे. येत्या साठ दिवसात ही प्रक्रिया पुर्ण करणे गरजेचे असल्याचे देखील पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## ब्रिमा सागर डिस्टलरीत सुरक्षा सप्ताहाचा बक्षिस वितरणाने समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१२ मार्च-**

श्रीपूर येथील ब्रिमा सागर डिस्टलरीत सुरक्षा सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रम ासह स्पर्धांचा समारोप बक्षिस वितरणाने झाला.

संचालक भरतकुमार सेठीया व जनरल मॅनेंजर दिनकर बेंबळकर यांच्या मार्गदर्शनात सुरक्षा सप्ताह झाला. यामध्ये विविध स्पर्धा घेण्य़ात आल्या. ११ मार्चला डॉ. गांधी व डॉ. सुधीर पोकळे यांच्या हस्ते बक्षिस वितरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. अकलुजचे डॉ. अभिजीत गांधी यांनी कामगारांना आरोग्याकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. यावेळी डेप्युटी मॅनेजर नरेश पाठक, जयंत अरगडे, प्रसाद अक्कलकोटकर उपस्थित होते. स्पर्धे तील विजेते असे : घोषवाक्य प्रथम क्रमांक विभागून प्रकाश सुरवसे व आनंद भोसले, द्वितीय क्रमांक विभागून हनुमंत भोईटे व प्रसाद कोकिळ, तृतीय क्रमांक विभागून समीर तांबोळी व सत्यजित पाटील, उत्तेजनार्थ विभागून अनिल लेंगरे व अशोक कांबळे. पोस्टर स्पर्धा प्रथम संतोष यादव, द्वितीय वैभव कुलकर्णी, तृतीय विशाल मंगळवेढेकर, उत्तेजनार्थ शिवाजी दुधाळ, विनाअपघात सेवा प्रथम कबीर शेख, द्वितीय रंजीत बाबर, तृतीय सचिन साळुंखे, वैयक्तिक उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चंदाबाई उघडे, सुमनबाई गायकवाड, विमल साळुंखे, साधना जाधव, राणी लोंढे, संगीता सुरवसे, विमल जाधव, अनिल लोंढे, बाळू पवार, सुरेश कांबळे, रोहित इंगळे, नागनाथ गायकवाड, रवी बोरगावकर, हनुमंत वाघमारे, सुदाम कुलकर्णी, उत्तम कांबळे या सर्वांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमास सल्लागार टीपी बाक्षी, सुकुमार मंडल, सतीश डिंगरे, निवृत्ती पवार ,भागवत पारसे, सत्यजित पाटील, अरविंद इंगळे, हेमंत पाटील, सुरज शिंदे, ऋषिकेश सदगर विलास खोत उपस्थित होते.



## पक्षांसाठी टाकाऊ वस्तुंपासून टिकाऊ जलपात्रे अन् घरटी

### भंडीशेगाव जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १२ मार्च-**

पक्षी व प्राण्य़ांना उन्हाच्या त्रासातून दिलासा मिळण्यासाठी भंडीशेगाव (ता. पंढरपूर) चव्हाणवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तुंपासून टिकाऊ जलपात्रे अन् घरटी बनवली आहेत.

मार्च महिन्याच्या सुरुवातीसच तापमानात वाढ होऊ लागल्याने मानवासह प्राणी, पक्षी यांनाही ऊन्हाचा त्रास होत आहे. प्राणी, पक्षांची तहान भागावी, त्यांना स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे, त्यांना उष्माघात होऊ नये यासाठी त्यांना थंड निवारा व अन्नपाणी मिळावे, अन्न उपलब्ध व्हावे हा मानवतेचा दृष्टिकोन ठेवून भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथील विद्यार्थ्यांनी विविध आकाराची मडकी, गाडगी यांच्याद्वारे पानवठे तयार केले आहेत. विविध आकारांच्या खोक्यांपासून तयार करण्यात आलेली घरटी शाळा परिसरातील झाडांवरती अडकविली आहेत. त्यामुळे शाळेच्या परिसरात पक्षांसाठी अन्न, पाणी व निवाऱ्याची सोय झाली आहे. पर्यावरणप्रेमी शिक्षक केशव राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबवला.

> पक्षी हे नैसर्गिक चक्राचा घटक असून, त्यांना जगविणे ही मानवाची नैतिक जबाबदारी आहे. प्राणी,पक्षांना वाचवण्यासाठी सर्वांनी जबाबदारी घेणे आवश्यक आहे. झाडावर, घराच्या गच्चीवर, गॅलरीत पक्ष्यांच्या निवारा,अन्न,पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक व गरजेचे आहे.
>
> **- धोंडीराम चव्हाण.**
> **शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष**

## शिवपुरीत सर्वात मोठ्या अग्नी मंदिराचे भूमिपूजन

### हत्तीवरून परमसद्गुरू श्री गजानन महाराज पादुकांची शोभा यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१२ मार्च-**

येथील शिवपुरीमध्ये अतिपवित्र १२ मार्च या अग्निहोत्र दिनी विश्वाला ऊर्जा व दिशा देणाऱ्या भारतातील सर्वात मोठ्या अग्नी मंदिराचे भूमिपूजन पूज्यश्री डॉ पुरुषोत्तम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जल्लोषात करण्यात आले.

विश्वात ६० देशातील लोक अग्निहोत्राशी परिचित असून ते नित्य अग्निहोत्र करतात. या यज्ञाच्या अनुकूल अनुभवाने ते इतर यज्ञ-हवनही करीत आहेत. या अग्निमंदिरात अग्निहोत्राशिवाय दुसरा कोणताही विधी होत नसतो. १२ मार्च हा दिवस विश्व अग्निहोत्र दिवस म्हणून संपूर्ण विश्वात साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून आज शिवपुरी येथे भव्य अग्नी मंदिराची भूमिपूजन करून पायाभरणी करण्यात आली.यानंतर हत्ती वरून परमसद्गुरू श्री गजानन महाराज पादुकांची शोभा यात्रा निघाली आणि त्या नंतर महाप्रसाद दिला गेला. विश्वाला ऊर्जा व दिशा देणारी अग्नी मंदिराचे (वास्तूची) भूमि पूजनामुळे महाराष्ट्र, कर्नाटक यासह साऱ्या विश्वाला एक दिशा प्राप्त होईल असा आनंद होणार आहे.आतापर्यंत ठिकठिकाणी युरोप-अमेरिका सह अनेक देशात अग्निगृहे निर्माण झाली आहेत. परंतु शिवपुरीचे एक वैशिष्ट्य आहे. या ठिकाणी १९६९ मध्ये अद्वितीय असा सोमयाग संपन्न झाला. तो विश्वशांती साठी होता व सर्व जगभरातून त्याला प्रतिसाद मिळाला होता अग्निमंदिर यांस मंदिर जरी म्हटले तरीही याठिकाणी कोणतीही मूर्ती वा फ़ोटो नसतो. शिवपुरीच्या सूर्योदय सूर्यास्त या वेळेनुसार या मंदिरात केवळ अग्निहोत्र केले जाईल जे मूलभूत आहे.

यावेळी आमदार संजय केळकर,माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे,सकाळ माध्यम समूहाचे अभिजित पवार,श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले,अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले,सोनाई दुधचे दशरथ माने, वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,पोलीस उपायुक्त दीपाली काळे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,तहसीलदार विनायक मगर,पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे,माजी नगरसेवक महेश हिंडोळे,दिलीप सिद्धे,शाम मोरे,अभय खोबरे,लाला राठोड,विलास गव्हाणे,बाळासाहेब कुलकर्णी,मोहन डांगरे, नाना गायकवाड, सुधीर कुलकर्णी, अण्णा वाले, संजय अग्रवाल,पुरोहित अप्पू पुजारी,प्रा. शिवशरण अचलेर आदींची उपस्थिती होती.



> १२ मार्च या दिवशी १९४२ मध्ये परमसद्गुरूंना त्यांच्या श्रेष्ठ सद्गुरु कडून पूर्णाभिषेक दीक्षा (त्रिपुरी विद्या) मिळाली. हा दिवस जगभरातील वेदमार्गाचे अनुयायी अत्यंत पवित्र मानतात.परम सद्गुरू श्री गजानन महाराज यांचे नातू पूज्य श्री डॉ पुरुषोत्तम महाराज यांनी संबोधन केल्याप्रमाणे ही वास्तू जेव्हा पूर्णत्वास जाईल त्यावेळी ती जगभरातील सर्वांचे प्रमुख आकर्षण केंद्र होणार आहे.

## औरंग्याचे स्टेटस ठेवणाऱ्यांवर कारवाई करा : आ. कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**



अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी अधिवेशनात सध्या सुरू असलेल्या सामाजिक परिस्थिती वरून सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. यावेळी आपल्या अक्कलकोट विधानसभा मतदार संघात सोशल मीडियाच्या माध्यमातून क्रूरकर्मा औरंगजेब याचे स्टेटस ठेवणाऱ्या देशद्रोह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करावी या मागणीसाठी विधानसभेत 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन' अंतर्गत गंभीर मुद्दा उपस्थित केला.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गुढीपाडवा , रमजान ईद पुर्वी शिक्षकांचे वेतन अदा करा

### शिक्षक परिषदेची शिक्षण संचालकांकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

गुढीपाडवा व रमजान ईद यासारख्या महत्त्वाच्या सणानिमित्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च-२०२५ चे वेतन दि.२५ मार्च पर्यंत अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात बुधवारी (ता. १२) राज्य शिक्षण संचालक यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, दि.३० मार्च रोजी गुढीपाडवा व रमजान ईद हे सण साजरा करण्यात येणार आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्यांचे त्यांचे सण आनंदाने साजरा करता यावेत, याकरीता माहे मार्च महिन्याचे वेतन दि.२५ मार्च पुर्वी त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे. मार्च अखेर कामांचे कारण न देता वेतन प्रक्रिया गतिमान करण्याबाबत संबंधित यंत्रणेला आपल्या स्तरावरुन तात्काळ आदेशीत करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्य शिक्षण संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्याची माहिती शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.



## संक्षिप्त वृत्त...



### महाद्वाराचे आ. पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

**तेर, दि.१२ मार्च -**

तेर येथील संतश्रेष्ठ गोरोबा काकांच्या मंदिराच्या महाद्वाराचे भूमीपूजन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या महाद्वारामुळे पवित्र तेर नगरीच्या सौंदर्यात आणखी भर पडणार आहे. संतश्रेष्ठ श्री गोरोबाकाका देवस्थान एक उत्तम धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याच्या अनुषंगाने गोरोबा काका मंदिर व परिसराचा संपूर्ण विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यासाठी १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात महाद्वार, नगारखाना, संरक्षक भिंत, शौचालय, दर्शनबारी, भक्त निवासाचे उर्वरित काम, छोट्या व्यावसायिकांसाठी दुकाने, विद्युतीकरण ही कामे करण्यात येणार आहेत. यावेळी पद्माकर फंड, नवनाथ नाईकवाडी, जुनेद मोमीन, बालाजी पांढरे, सतीश कदम, अजित कदम, प्रवीण साळुंखे, नवनाथ पासारे, भुजंग खांडेकर, मज्जित मणियार, विलास रसाळ, प्रज्योत रसाळ, गुरुप्रसाद चिवटे, गोरख माळी, मयूर तपडे यांच्यासह नागरिक उपस्थिती होती.



### भाजपची सदस्य नोंदणी आढावा बैठक

**तेरखेडा, दि.१२ मार्च -**

भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. राज्यात देखील जिल्हा, तालुका, गावपातळीवर भाजप कार्यकर्ते सदस्य नोंदणी अभियान जोरदार राबवत आहेत. याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी वाशी तालुक्याची सदस्य नोंदणी आढावा बैठक दि.११ मार्च रोजी वाशी तालुक्यातील पार्डी येथे संपन्न झाली. भाजप जिल्हा निवडणूक अधिकारी गुरुनाथ मगे, विधानसभा निवडणूक प्रमुख बाळासाहेब शिरसागर यांनी सदस्य नोंदणी बैठकीत आढावा घेतला. याप्रसंगी तालुकाध्यक्ष राजगुरू कुकडे, सुरेश कवडे, महादेव आखाडे, त्रिशला देशमुख, सुधीर घोलप, प्रशांत कुलकर्णी, बबन कवडे, प्रदीप ठाकूर, अरुण धालगडे, गणपती जगताप, सुहास चौगुले, संदीपान घोडके, अशोक गपाट तसेच शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



### पोलीस स्टेशनला आरो वॉटर कुलर भेट

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

धारूरचे सरपंच बालाजी पवार यांनी आई कै. शकुंतलाबाई श्रीपती पवार यांच्या स्मरणार्थ बेंबळी पोलिस स्टेशन येथे आर.ओ. पिण्याचे थंड पाण्याचे वॉटर कुलर बसविले आहे. धारूर गावचे सरपंच बालाजी पवार यांनी विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरीकासाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी, डीवायएसपी स्वप्नील राठोड, पोलिस उपनिरीक्षक पठाण, बीट अंमलदार गिरी इतर पोलिस कर्मचारी तसेच सरपंच बालाजी पवार, उपसरपंच पांडुरंग लोहार, प्रदीप कदम, सुनील शिंदे उपस्थित होते.

### शिवा कुंभार यांचा सत्कार

**जळकोट, दि.१२ मार्च -**

भाग्यवंती देवी स्थापनेच्यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवा कुंभार यांनी सर्व भक्तांना महाप्रसाद दिला होता. हा महाप्रसाद दिल्याबद्दल भाग्यवंती देवस्थानच्यावतीने शिवा कुंभार यांचा सत्कार करण्यात आला.

मंदिर कर्मचाऱ्यांचा अजब कारभार... व्हीआयपी नसणाऱ्यांना व्हीआयपी असल्याचे भासवून स्पेशल दर्शन पास...

# तुळजाभवानी मंदिरात एजंटांमार्फत व्हीआयपी दर्शन पासचा आर्थिक व्यवहार ?

**महाराष्ट्र नागरिक सेवा शिस्त अपिलीय १९७९ च्या नियमानुसार दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे महत्वाचे व अति महत्त्वाचे व्यक्तीचे दर्शन व्यवस्था नोंदवहीमध्ये पदनाम रकान्यात चुकीच्या नोंदी करून मंदिर संस्थानचे आर्थिक स्वरूपाची हानी व आर्थिक नुकसान केले म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत समाजसेवक जयकुमार पांढरे यांनी निवेदन दिले आहे.



सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी महत्वाचे व अति महत्वाचे व्यक्ती वरिष्ठ अधिकारी व सन्माननीय व्यक्ती यांच्या करिता दर्शनासाठी गेस्ट पास व्यवस्था करण्यात येते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २३ डिसेंबर २०२४ या रोजी चा माहिती अर्ज देऊन दर्शन व्यवस्था नोंदवहीची माहिती प्राप्त केली आहे. त्या नोंद रजिस्टर मध्ये अशी काही नोंदी दिसून आल्या आहेत.

व्यवसाय, माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, कपडा व्यापारी, राष्ट्रवादी उपाध्यक्ष, कर्मचारी व मॅनेजर नोकरी, मोटर वाहक, हॉटेल व्यवसायक, माजी सभापती, पंचायत समिती सदस्य, उपसरपंच, औषध कंपनी, रोटरी क्लब, मॅनेजर, नगरपरिषद कर्मचारी, मॅनेजर श्रीराम फायनान्स, व्यवसाय टी.व्ही.एस शोरूम, पदनाम रखान्यात कोणाचेही पदनाम न लिहिता दर्शन पास देण्यात आले आहेत.

अशा प्रकारच्या नोंदी केलेल्या दिसून येत आहेत, सदरील हे व्यक्ती कोणत्या पदावर कार्यरत आहेत व त्यांना कशाच्या आधारे दर्शनाला सोडले आहे हे व्यक्ती अति महत्त्वाच्या वरिष्ठ अधिकारी सन्माननीय या नियमात बसत आहेत का? याची जिल्हाधिकारी यांनी स्वत:च्या स्तरावर चौकशी करावी व या व्यक्तींना दर्शनाला सोडण्यासाठी शिफारस केलेले सहाय्यक प्राध्यापक गणेश मोहनराव मोटे, मुख्य पब्लिक रिलेशन ऑफीसर गणेश निरवळ या कर्मचाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी व एजंट मार्फत व्हीआयपी दर्शन पासचा आर्थिक व्यवहार झाला आहे. सदर कर्मचारी यांनी मंदीराच्या दर्शन पास मधील मागील ५ ते ६ महिन्याचे १० ते १५ लाख रुपयाचे अर्थिक नुकसान केलेले आहे, अशी शंका व चर्चा आहे.

वरिष्ठ कार्यालयाचे आदेश स्वत:च्या मर्जीप्रमाणे नोंदी करून दर्शन पास दिलेले आहेत व मंत्री, पालकमंत्री, आमदार यांचे कसलेही शिफारशी पत्र न घेता व्हीआयपी पास दिले आहेत.

दर्शन वही मधील शेरा या रखान्यात मंदिर ट्रस्ट मधील शिपायांच्या सांगण्याहून ही पास दिले आहेत व व्हीआयपी पास व्यवसाय करणारा व कुठलाही पदनाम न लिहिता व्हीआयपी पास दर्शन दिले आहे.

सदरील अधिकारी कर्मचारी स्वत:च्या नातलगाला व मित्र व हितचिंतकांना व वैयक्तिक फायद्यासाठी आर्थिक बाबीसाठी अशा लोकांना व्हीआयपी दर्शन देत आहेत.

सदरील बाबी सर्व चुकीच्या आढळून आले आहेत आशा कर्मचारी अधिकारी यांना कामात कसूर केलेले दिसून आले त्यांच्यावर महाराष्ट्र नागरिक सेवा शिस्त अपिलय १९७९ च्या नियमानुसार विना विलंब शिस्तभंगाची कारवाई करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जयकुमार नागनाथ पांढरे यांनी या निवेदनात केली आहे.

## घरात घुसून युवतीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

कळंब तालुक्यातील गांधीनगर येथे १२ मार्च २०२५ रोजी पहाटे २ वाजता एक धक्कादायक घटना घडली. एका २१ वर्षीय युवतीवर दोन व्यक्तींनी घरात घुसून मारहाण आणि विनयभंग केल्याचा आरोप आहे.



पीडित युवती आपल्या घरी झोपलेली असताना, पहाटे २ वाजता तिच्या घराचा दरवाजा कोणीतरी वाजवला. आतून विचारणा केल्यानंतरही बाहेरून प्रतिसाद न मिळाल्याने ती सावध होती. त्यानंतर, आरोपींनी दरवाजा तोडून घरात प्रवेश केला आणि दरवाजा उघडला नाही म्हणून त्यांनी युवतीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

घाबरलेल्या युवतीने आपल्या आईला फोन करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला आणि फोडून टाकला. त्यानंतर, त्यांनी युवतीचा हात धरून ओढले.

घटनेनंतर युवतीने थेट कळंब पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार दाखल केली. त्यानुसार, आरोपींवर विविध कलमांखाली गुन्हे नोंदवले गेले आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## आ. कैलास पाटील यांनी जिल्ह्यासह राज्याच्या प्रश्नाकडे वेधले सरकारचे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक आग्रा व पानिपत येथे करण्याची घोषणा सरकारने केली, पण पंतप्रधान यांच्या हस्ते भूमिपूजन केलेल्या अरबी समुद्रातील महाराजांच्या स्मारकासाठी अर्थसंकल्पात फक्त एक हजार रुपयाची तरतूद केली आहे, अशी तरतूद केल्यावर हे स्मारक कधी होणार असा सवाल आमदार कैलास पाटील यांनी सरकारला विचारला. अर्थसंकल्पीय भाषणावर ते बोलत होते.

यावेळी पाटील म्हणाले, स्वराज्यसंकल्पक शहाजी राजे यांची समाधी बिजापूर जिल्ह्यात आहे. त्यांच्या नावाला साजेसं स्मारक व्हावे अशी मागणी पाटील यांनी केली. निवडणुकीत दिलेल्या संकल्पपत्राचा दाखला देत पाटील यांनी लाडकी बहीण, शेतकरी कर्जमाफी, भावांतर योजना, राज्य जीएसटी तुन सूट देणाऱ्या सर्वच मुद्याला अर्थसंकल्पात बगल दिल्याने सरकारला त्यांनी धारेवर धरले. शेतकऱ्यांना कर्जमाफीची अपेक्षा असून त्यामुळं त्यांनी खात थकीत ठेवलं आहे. ते कर्जाच्या खाईत जात असून त्यांना तातडीने कर्जमाफिचा लाभ मिळावा अशी मागणी त्यांनी केली. शेतीमालाचे भाव वाढण्यासाठी मूल्य साखळी विकास करणार हे सरकार त्यासाठी यंदा एक हजार रुपये एवढी तरतूद करत आहे.



गेल्यावर्षी यासाठी ५१५ कोटी रुपये खर्च केले होते. आताच्या तरतूदीवरून सरकार शेतकऱ्यांना भाव वाढ देणार आहे की नाही हे लक्षात येत आहे, असे पाटील म्हणाले. मराठवाडा ग्रीड ची नुसती चर्चा केली जाते पण प्रत्यक्षात त्याला तरतूद केली जात नाही. मग मराठवाड्याचा पाणी कसा सुटेल असा प्रश्न उपस्थित केला. जिल्ह्यातील कृष्णा -मराठवाडा प्रकल्पासाठी यंदा ६०० कोटीची तरतूद केली आहे. पण साडेचार हजार कोटींचा हा प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्याने आता त्याची किंमत बारा हजार कोटीवर गेली आहे. हा प्रकल्प वेळेत करायचा असेल तर दरवर्षी त्याला बाराशे ते तेराशे कोटी द्यावेत असं मत पाटील यांनी मांडल. मराठवाड्यातील पाठबंधारे विकासासाठी गेल्यावर्षी चार हजार ८०० कोटी दिले व यंदा ती तरतूद साडेतीन हजार कोटी तरतूद केली आहे. तरतूद वाढविण्याची गरज असताना ती कमी केली जाण हे अन्यायकारक आहे. मराठवाड्यावरील हा अन्याय दूर करावा, अशी मागणी पाटील यांनी केली. शिवाय तेरणा व मांजरा धरणावरील बंधाऱ्याचे रूपांतर बॅरेजेस मध्ये व्हावी अशी खूप वर्षाची मागणी आहे पण त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे सांगून यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची मागणी पाटील यांनी केली.

जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय २०२१ रोजी मंजूर झाले पण अजूनही त्याच्या इमारत बांधकामासाठी निधी दिलेला नाही त्याच्या मागून मंजुरी मिळालेल्या अनेक महाविद्यालयाच्या बांधकामासाठी निधी दिला गेला आहे. मग येथेच का निधी मिळत नाही असा सवाल पाटील यांनी केला. निराधार यांना दीड हजाराहून २१०० रुपये मानधन करण्याचा शब्द दिला होता. वाढ तर बाजूलाच राहिली पण त्यांना वेळेत हे पैसे मिळत नसल्याचे पाटील यांनी सांगितले. शिक्षण विभागाकडून धोकादायक वर्गखोल्यासाठी वेगळी तरतूद करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात तब्बल ६०० वर्गखोल्या धोकादायक आहेत, त्याला नियोजन समितीतून अल्प निधी मिळत असल्यामुळे मुलांना अश्या खोल्यात शिक्षण घ्यावे लागत आहे ही बाब देखील त्यांनी सरकारी दरबारी मांडली.

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिराढोण पोलिसांचा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जिल्ह्यातील पोलिसांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर वचक ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या संकल्पनेतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिसांचा सत्कार करण्यात येतो. या उपक्रमांतर्गत शिराढोण पोलीस ठाण्याच्या पथकाचा गौरव करण्यात आला.

शिराढोण पोलीस ठाणे हद्दीत ११ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री १२.१६ वाजता एका पीडित मुलीने तक्रार दिल्यानंतर अवघ्या काही तासांत गुन्हा दाखल करून (गु.र.न. ५३/२०२५, कलम ७४, ७८(१), ७९, ३३३ इछड) पोलिसांनी आरोपीला अटक केली. गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करून पुढील तपास पूर्ण करण्यात आला. तसेच, दोषारोपपत्र न्यायालयात सादर करून जलदगतीने कार्यवाही केली.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल १२ मार्च रोजी पोलिसांच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक नेहरकर व त्यांच्या पथकाचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक शाफकत आमना, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार आणि इतर पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

या सन्मानामुळे पोलिस दलात आनंदाचे वातावरण असून, अधिकारी व कर्मचारी अधिक जोमाने कार्य करण्यास प्रेरित होत आहेत.

## रस्त्याचे काम निकृष्ट; संबंधितांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

सांगवी मार्डी येथील कामाची पूर्ण चौकशी करून गुत्तेदार व अधिकाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाचे तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसैनिक अमोल जाधव यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे



सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, सांगवी मार्डी येथे स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याकडून गतवर्षी करण्यात आला होता या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून वर्षभरातच ह्या रस्त्यावरील खडी उघडी पडली आहे पंचवीस पंधरा अंतर्गत आमदार निधीतून १० लाखांचा ह्या रस्त्यात प्रचंड भष्ट्राचार झाला आहे तसेच या रस्त्याचा माहिती फलकावर अपुर्ण माहिती लिहली आहे. अभियंता तसेच ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी या निवेदनात केली आहे.

## बहुजनांसाठी लढणारा योद्धा : धनंजय (नाना) शिंगाडे


सर्वसामान्य जनतेला जीवनात दररोज हजारो प्रश्नांचा मुकाबला करावा लागतो. त्यासाठी कोणत्या शासनदरबारी जावे, कोणाला भेटावे, कोणती कागदपत्रे द्यावीत याची कोणालाही माहिती नसते. सरकारी कार्यालयाचे हेलपाटे मारुनही जेव्हा आपले काम होत नाही तेव्हा प्रत्येकाच्या तोंडी नाव येते, ते म्हणजे धनंजय (नाना) शिंगाडे. राजकारणाचा कोणताही वारसा नसताना सर्व काही समाजासाठी हे ब्रीद घेऊन वाटचाल करणारे धनंजय (नाना) शिंगाडे यांचा आज वाढदिवस. यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा थोडक्यात शब्दपरिचय..

धाराशिव शहरातील उपेक्षितांची वस्ती असलेल्या भीम नगर येथे गंगाधर शिंगाडे यांच्या पोटी जन्म घेतलेले धनंजय नाना अत्यंत सामान्य जीवनशैलीत वाढले. लहानपणी शिक्षण घेत असल्यापासून कॉलेज वयापर्यंत त्यांनी समाजातील उच्च-नीच भेदभाव, जातीय तणाव अशा अनेक कारणांमुळे समाजात निर्माण होत असलेली दरी आणि दुही याची जाणीव पदोपदी घेतली. याच भावनेतून सर्व बहुजन समाजाला एकवटण्याची संकल्पना त्यांना सुचली. याच भावनेतून त्यांनी बालमित्रांपासून सर्वांना सोबत घेऊन एक सामाजिक चळवळ सुरु केली. शालेय जीवनापासूनच त्यांनी सुरु केलेल्या या चळवळीला आज मोठे वलय प्राप्त झाले आहे. त्यांच्या कार्याचा आलेख आज धाराशिव शहर, जिल्हा नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात सर्वदूर पोहचला आहे.

शिक्षणानंतर धाराशिव शहरातील आपल्या सर्व सवंगड्यांना सोबत घेत त्यांनी समाजकारण आणि राजकारणात एकाचवेळी उडी घेतली. त्यानंतर मागे वळून न बघता त्यांनी नगर परिषदेच्या राजकारणात आपला पाया भक्कम केला. आज अनेक प्रभागात उमेदवार निश्चित करताना मोठ्या राजकीय पक्षाचे नेते त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय उमेदवाराचे नाव घोषित करत नाहीत. हीच परिस्थिती जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर निवडणुकांमध्ये देखील असते ही त्यांच्या कार्याची पावती म्हणावी लागेल. दरवेळेस विधानसभा निवडणूक लागू होताच त्यांच्याकडे उमेदवारी घ्या म्हणून मागे लागणारे पक्ष अनेक आहेत. परंतु अनेकांना स्पष्ट नकार दिल्यानंतरही त्यांच्याकडे उमेदवारी घ्या म्हणून पक्षांची चढाओढ लागणे ही त्यांच्या समाजकारणाची एक मोठी बाजू म्हणावी लागेल.

धाराशिव शहरात भारताच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात आलेला होता. याच जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा यासाठी वेळोवेळी निवेदने, आंदोलने केली. नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत आवाज उठवून, विषयाचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले. त्यामुळेच आज धाराशिव शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा शहराची शान ठरला आहे.

धाराशिव शहरातील नाट्य व सांस्कृतिक चळवळीला धनंजय (नाना) शिंगाडे यांनी स्वत:ला वाहून घेतले आहे. दिवंगत वडील गंगाधर शिंगाडे यांच्या नावाने ते दरवर्षी गंगाधर करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे ते नियमित आयोजन करतात. या कार्यात त्यांचे बंधू विशाल शिंगाडे, सुपुत्र प्रसेनजीत शिंगाडे व त्यांचे सहकारी सतत परिश्रम घेतात.



धाराशिव जिल्ह्यातील जातीय दंगली असो किंवा अन्य कारणावरुन समाजामध्ये निर्माण होणारी तेढ. प्रत्येकवेळी दोन्ही गटांमधील तेढ दूर करुन सामंजस्य घडविण्याचे काम प्रशासनाच्या आधी धनंजय (नाना) शिंगाडे जाऊन करतात. जीवाची पर्वा न करता कोणत्याही परिस्थितीत भावनिक झालेल्या लोकांना दिलाशाचे शब्द देऊन त्यांना सामाजिक सलोखा आणि संविधानाची जाणीव करुन देण्याचे काम धनंजय (नाना) शिंगाडे यांनी आजपर्यंत केलेले आहे. यापुढेही आपला सामाजिक कार्याचा हा वसा त्यांनी कायम ठेवला आहे. बहुजन समाजातील सर्व घटकांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेची स्थापना केली. या संघटनेत अठरापगड जातीमधील लोकांनी सहभाग नोंदवून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. आज ही संघटना सर्वात पॉवरफुल्ल संघटना झाली आहे.

धाराशिवच्या महसूल प्रशासनाने सुमारे साडेबारा हजार एकर इनामी, मदतमास, खिदमत मास, सीलिंग व महार वतन जमीन रातोरात वर्ग एकमधून वर्ग दोनमध्ये घेऊन शेतकरी व प्लॉट धारकांवर अन्याय केला. तेव्हा धनंजय (नाना) शिंगाडे प्रथम रस्त्यावर उतरले. त्यानंतर राजकीय नेत्यांना, मंत्र्यांना निवेदने देऊन झालेल्या अन्यायाला वाचा फोडली. तरीही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत हेलपाटे मारले. वेळोवेळी उपोषण आंदोलन, मोर्चे काढल्यानंतर अखेर हा प्रश्न मार्गी लागला आहे.

त्याचबरोबर शहरासह ग्रामीण भागातील नागरी समस्यांचे निराकरण करण्यासाठी धनंजय (नाना) शिंगाडे सदैव तत्पर असून भविष्यात देखील अशा अडचणी सोडविण्यासाठी आपण सज्ज असल्याची भावना ते व्यक्त करतात.

# प.पु.माधवानंद महाराजांच्या हस्ते दत्तधामच्या दत्तमंदिराचा कलशारोहन




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

शहरातील दत्तधाम येथील नव्याने उभारण्यात आलेल्या श्रीदत्त मंदिराच्या शिखराचे बांधकाम अवघ्या दोन महिन्यात पूर्ण झाले. दि.२६ डिसेंबर २४ रोजी श्रीदत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात पार पडली होती त्याच वेळी या भागातील भाविकांनी एकत्र येऊन शिखराचे कामही पूर्ण करून घेतले. दि.९ फेब्रुवारी २५ रोजी प.पु. माधवानंद महाराजांच्या शुभहस्ते कलशारोहन करण्यात आले.

दत्तधाम येथील श्री दत्त मंदिराचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू होते हे काम डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर २६ डिसेंबर रोजी या मंदिरात अत्यंत सुंदर आणि आकर्षक अशा श्री दत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याच कार्यक्रमात मंदिराच्या शिखराचे कामही लवकरच पूर्ण करण्याचा माणस भाविकांनी बोलून दाखवला होता. त्यानुसार शिखराचे बांधकाम देखील पूर्ण करण्यात आले. या मंदिराच्या शिखराचे हे वैशिष्ट्य आहे की, या मंदिराच्या शिखरावर बीड जिल्ह्यातील वैकुंठवासी संतांच्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत. बांधकाम सुरू असतानाच उमरखेड संस्थानचे मठाधिपती गुरू माधवानंद महाराज दत्तदर्शनासाठी मंदिरात आले होते. त्याचवेळी मी बीडमध्ये आहे तोपर्यंत शिखराचे काम पूर्ण करा मी स्वतः येतो असा शब्द दिला होता. त्यानुसार या भागातील भाविकांनी लगेच नियोजन करून दि.९ फेब्रुवारी रोजी कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प.पु.माधवानंद महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहन करून महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले. कंत्राटदार अतुल संघांनी यांनी महाप्रसाद ठेवला होता तर या कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. सतीश कुलकर्णी, विलास रत्नपारखी, योगेश खडके, गोपाळ पाठक या यजमानाच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आली. यावेळी भाविकांना बसण्यासाठी पेव्हरब्लॉक बसवण्याचे काम करण्याचा संकल्प करण्यात आला तेव्हा शहरातील प्रसिद्ध व्यापारी सत्यनारायण लाहोटी यांनी लगेच ५ ब्रास तर जयंत पत्की यांनी २ ब्रास पेव्हरब्लॉक दिले त्याचेही काम पूर्ण करण्यात आले असून भाविकांच्या सोयी सुविधांसाठी मंदिराचे विश्वस्त प्रयत्न करत आहेत. कमी कालावधीत प्रसिद्ध झालेल्या या मंदिरात दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असून दर गुरुवारी आणि पौर्णिमेला सकाळी अभिषेक आरती आणि सायंकाळी ७ वाजता सामुदायिक आरतीची परंपरा येथे सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सायंकाळी आरती नंतर खिचडी हा प्रसाद देखील याठिकाणी सुरू केला आहे. या कार्यक्रमाला भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पांगरीत ग्रामदरबार संपन्न; शासकीय योजनांची माहिती आणि समस्यांचे निराकरण

### गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.१२ मार्च**

पांगरी ग्रामपंचायत कार्यालयात नुकताच ग्रामदरबार आयोजित करण्यात आला. या ग्रामदरबारामध्ये पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लोखंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामस्थांनी शासकीय योजनांची माहिती जाणून घेतली आणि आपल्या समस्या मांडल्या.

ग्रामदरबारामध्ये पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे, पंचायत समिती विस्तार अधिकारी राऊत, आरोग्य विभागाचे डॉ.लोमटे, माने आणि पालेकर, विस्तार अधिकारी कृषी, पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ. राधिका वराडे मॅडम, महिला बालकल्याण कुलकर्णी यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायत उपसरपंच श्री. श्याम थोरात, किशोर थोरात, सचिन थोरात, अमोल थोरात आणि सम्राट थोरात यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी दळवे जी.एम. यांनी केले. उपसरपंच श्याम थोरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

ग्रामदरबारामध्ये आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, महिला बालकल्याण आणि इतर शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. ग्रामस्थांनी आपल्या समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या, ज्यांचे योग्य निराकरण करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.गटविकास अधिकारी लोखंडे यांनी ग्रामस्थांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, ग्रामस्थांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा. शासनाच्या विविध योजना ग्रामस्थांच्या विकासासाठी आहेत.



या ग्रामदरबारामुळे ग्रामस्थांना शासकीय योजनांची माहिती मिळाली आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण झाले, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ मार्च**

तालुक्यातील गंगामसला येथील सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ११ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी चिमुकल्यांनी मराठी, हिंदी गीतावर बहारदार नृत्य सादर करत विविध कलागुणांचे प्रदर्शन केले.

स्नेह संमेलनाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी होते. यावेळी गंगामसलाचे सरपंच भालचंद्र सोळंके,गुंजथडीचे सरपंच समीर यादव, शुक्लतीर्थ निमगावचे सरपंच कृष्णा थावरे, छोटे वाडीचे सरपंच अंगद कटके,संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण पोटभरे, सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना लक्ष्मण पोटभरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व विद्यार्थी परिपूर्ण जीवन कसा जगेन यासाठी सनपेस इंटरनॅशनल स्कूल प्रयत्न करणार आहे. तसेच ज्या सुविधा शहरात मिळतात त्याच सुविधा गंगामसला या ठिकाणी देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे.

अध्यक्षीय समारोप करताना गटशिक्षण अधिकारी रवींद्र महामुनी म्हणाले की , मुलांना इंग्रजी माध्यमाबरोबरच मराठी भाषेचेही ज्ञान अवगत झाले पाहिजे त्यासाठी शाळांनी प्रयत्न करावेत. गुणवत्तापूर्व शिक्षणामुळे या शाळेचे भविष्य उज्वल दिसून येते आहे. यावेळी गंगामसल्याचे सरपंच भालचंद्र सोळंके व संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले.स्नेहसंमेलनामध्ये बाल कलाकारांनी लावणी,बॉलिवूड तसेच देशभक्तीपर गीतावर बहारदार नृत्य तसेच विविष कला सादर करून कलाविष्कार दाखवीला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक डोंगरे व कल्पना सोळंके यांनी केले तर गणेश सोळंके यांनीआभार मानले.यावेळी विद्यार्थी ,पालक,शाळेचे शिक्षक वृंद पालक उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरूवारी सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील सातव्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महंत गुरूवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गड यांचे गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी ढेकणमोह ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.



## जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

### गावकऱ्यांनो पंचनामे करा-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**




बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी केली आहे.

यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत.

शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करावी.

शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे. त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत. त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही. हे देखील दिसून येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणार्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ड. देशमुख यांनी केली आहे.




(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

बीड : धुलिवंदन हा सण जवळ आला आहे. त्यानुषंगाने सध्या बीडच्या सुभाष रोड, भाजीमंडई, धोंडीपुरा, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स या ठिकाणी वेगवेगळे रंग, पिचकारी विक्रीसाठी आले आहेत.

## संपूर्ण मुंडे कुटुंब धनंजय मुंडे यांच्या पाठीशी-बंधू अजय मुंडे

### कौटुंबिक विषयात चुकीचे आरोप करून आम्हाला बदनाम करण्याचे षडयंत्र-अजय मुंडे यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

आमचे बंधू तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी येथील पंढरी निवासस्थानाचे नूतनीकरण करण्याचे काम हाती घेतले असल्याने मागील काही महिन्यांपासून ते आमच्या नाथ्रा या जन्मगावी असलेल्या घरी राहण्यासाठी आई व कुटुंबासह स्थलांतरित झालेले असून, हे सर्वांनाच माहित आहे. मात्र तरीही आता कोणत्याही आरोप करायला शिल्लक राहिलेले नसल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी मुंडे कुटुंबात नाराजी आहे धनु भाऊंच्या आई नाराज होऊन गावी गेल्या, त्यांचे भाऊ नाराज आहेत, अशा प्रकारच्या वल्गना करत धादांत खोटे व निराधार आरोप केले असून, संपूर्ण मुंडे कुटुंब हे धनंजय मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. राजकारणामध्ये एखाद्या व्यक्तीला केवळ बदनाम करण्यासाठी आज पर्यंत कुटुंबापर्यंत कधीही कोणीही आरोप केलेले नाहीत असे वक्तव्य, धनंजय मुंडे यांचे बंधू तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांनी केले आहे.

एका कार्यक्रमानिमित्त बीड येथे आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आमच्या कुटुंबात धनु भाऊ व पंकजाताई असे दोघेजण एकाच वेळी मंत्री झाल्याचे अनेक जणांना कदाचित आवडले नसावे, त्यामुळे एका पाठ एक खोटेनाटे आरोप करून सातत्याने आमच्या कुटुंबाला बदनाम करून आता शेवटी कुटुंबात फूट पाडायचे प्रयत्न केले जात असून ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचेही अजय मुंडे म्हणाले.

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांना त्या अमानवी कृत्याची शिक्षा झालीच पाहिजे, मुंडे कुटुंबातील कुठल्याच व्यक्तीने कधीही आरोपींचे समर्थन केले नाही. मात्र त्या आडून सातत्याने खोटे आरोप करून बदनाम करण्याचे षड्यंत्र सध्या सुरू आहे, असेही ते पुढे बोलताना म्हणाले.दरम्यान आ सुरेश धस यांनी मुंडे कुटुंबात नाराजी असल्याचे जे वक्तव्य केले त्या सर्व आरोपांचे अजय मुंडे यांनी खंडन केले आहे. यावेळी त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. गणेश तांदळे यांसह आदी उपस्थित होते.

## आष्टी पंचायत समिती आमसभेसाठी संबधितानी उपस्थित राहावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मार्च**

पंचायत समिती आष्टी,पाटोदा,शिरुर कासारची आमसभा पंचायत समिती पाटोदाच्या प्रांगणात दि. १६ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आमदार सुरेश रामचंद्र धस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे.

आमसभेकरीता आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सहकारी संस्थेचे पदाधिकार, ग्राम पंचायत अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहवे, असे आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करणार-मंत्री पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१२ मार्च**

राज्यामध्ये उद्योगांमधून विविध प्रकारचे प्रदूषण होत असते. प्रदूषण कमी करण्यासाठी शासन उपाययोजना करीत असते. उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीच्या अहवालानंतर प्रदूषण कमी करण्यासाठी अधिक प्रभावीपणे उपाययोजना करण्यात येतील. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी नियम ९४ अन्वये उपस्थित केलेले अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.



चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणाबाबत सदस्य सुधीर मुनगंटीवार, सदस्य देवराव भोंगळे यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.या चर्चेच्या उत्तरात मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रदूषण कमी करण्यासंदर्भात आमदारांची समितीही गठीत करण्यात येईल. चंद्रपूर देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी एक आहे. केंद्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्यात २१ मार्च २०१२ रोजी नवीन उद्योगांना बंदी करण्यात आली होती. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण पातळी ८३.८८ टक्क्यांवरून ५४ पर्यंत खाली आल्यामुळे केंद्र शासनाने उद्योग बंदी उठवली . त्यानंतर जिल्ह्यात उद्योगांचा विस्तार, नवीन उद्योग वाढीस लागले. राज्यामध्ये स्टील, वस्त्रोद्योग व औष्णिक वीज उद्योगसारख्या अति प्रदूषण करणाऱ्या उद्योग समूहांची उपाय योजनांची बैठक घेण्यात येईल. तसेच अतिप्रदूषण करणाऱ्या उद्योगांची एक वेगळी सूची तयार करण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योग या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

पर्यावरण विभागाच्या माध्यमातून प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना भेटी देऊन तपासणी करण्यात येत असते. अशा तपासण्याची संख्या वाढवण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करून या भागातील परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल. वेकोली कोळसा खाणीबाबत सीएमडी सोबत अधिवेशन काळात बैठक घेण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगामुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत कृषी विभागाच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रदूषण कमी करण्यासाठी कोळशाची वाहतूक ’ कन्व्हेअर बेल्टमधून बंद स्वरूपात करावी. कार्बन फॉगरचा उपयोग करण्यात येवून पाण्याची नियमित फवारणी करावी. तसेच वृक्ष लागवड करण्यात यावी, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# 'बसवेश्वर'मध्ये मानवता सन्मान समानता शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील युवती मंच व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिव्या मुक्त समाज अभियानांतर्गत मानवता सन्मान समानता शपथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी दिली.

यावेळी सुप्रसिद्ध वक्त्या डॉ. क्रांती मोरे, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. किसनाथ कुडके, स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. किसनाथ कुडके आणि डॉ. अश्विनी रोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. क्रांती मोरे म्हणाल्या की, स्त्रियांमध्ये कुटुंब व्यवस्थापनाबरोबरच समाज आणि राष्ट्राला आकार आणि संस्कार देण्याची अद्वितीय क्षमता आहे त्यामुळे स्त्रियांनी स्व जाणीव ठेऊन आत्म सन्मानाने जगावे आणि आपला आपणच सन्मान मिळवावा असे तया म्हणाल्या.

कार्यक्रमाचा प्रारंभ कु. मिताली आगलावे आणि कु. भक्ती पांचाळ यांनी गायलेल्या नारीशक्ती गीताने झाला. त्यानंतर जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, ज्या समाजात स्त्रीशक्तीचा सन्मान होतो त्या समाजाचे भवितव्य हे भव्य दिव्य असते म्हणूनच केवळ ०८ मार्च जागतिक महिला दिनी सन्मान न करता नित्य जीवनातही स्त्रियांचा सन्मान केला गेला पाहिजे आणि आज आपण घेतलेली शपथ दैनंदिन व्यवहारांमध्ये कार्यान्वित करावी असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ११ मार्च, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २५ मार्च, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

### पुरोगामी महाराष्ट्रात महिला नेतृत्वाचे पर्व आनंददायी : डॉ. महादेव गव्हाणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य व विज्ञान यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळा २०२४- २५ जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालयात संपन्न होत आहे. युवती शिबिरास विद्यापीठातील विविध महाविद्यालयातून १२० मुलींनी सहभाग नोंदविला.

सत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, उद्घाटक राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापिठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. महादेव गव्हाणे, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, संचालक राष्ट्रीय सेवा योजना स्वा.रा.ती. म. विद्यापीठ नांदेड, धर्मराज हल्लाळे, डॉ. कुसुम मोरे, प्रा.राहुल वाघमारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. प्रमोद तांदळे,डॉ. केशव आलगुले आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** अभिनव अध्यापक महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून उन्हाळी-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बी.एड. अभ्यासक्रमात गुणानुक्रमे विद्यापीठातून सर्वप्रथम सुबोध सर्वोत्तम मांदळे व सर्वतृतीय पांचाळ महानंदा रामू यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. सुधीर भूमकर यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.




## भरदिवसा पाचजणांकडून मारहाण; एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** शहरातील अंबाजोगाई रोडवरील रेणापूर नाक्याजवळील एका बिअर बारसमोर पाच तरुणांनी एकास भर रस्त्यावर बेदम मारहाण केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली आहे. यातील जखमीवर लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेवून त्यांची शहरातुन धिंड काढली.

अंबाजोगाई रोडवरील एका बारमध्ये काही तरुण मंगळवारी मद्य प्राशन करीत होते. दरम्यान, बारमध्ये भांडण सुरू झाले. तेव्हा या भांडणात बिअरच्या बॉटल मारल्याने भांडण वाढत गेले. बिअर बारच्या बाहेर आल्यानंतरही भांडण सुरूच होते. त्यानंतर हे सर्वजण रोडवर आले आणि तेथेच ही बेदम मारहाणीची घटना घडली. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत जखमी व्यक्तीला स्थानिकांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. घटनास्थळी अनेकांनी घटनेचे मोबाइलमध्ये चित्रीकरण केले. पोलिसांनी आजूबाजूचे सीसीटीव्ही आणि इतर माहिती गोळा केली असून मारहाण करणारे पाचजण हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. पोलीसांनी मारहाण करणाऱ्या आरोपींना ताब्यात घेवून त्यांची लातूर शहरातुन धिंड काढली. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# अनधिकृत कत्तलखाने बंद करा

## सकल हिंदू समाजाची निदर्शने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** शहरातील अनधिकृत कत्तलखाने बंद करावेत, या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने मंगळवारी महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शने करण्यात आली. याबाबत आयुक्तांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याबाबत तत्काळ कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

देशामध्ये गोवंश हत्याबंदी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्रात गोमातेस राज्यमातेचा दर्जा देण्यात आला आहे. असे असतानाही लातूर शहरात अनधिकृतपणे कत्तलखाने सुरू आहेत. अनधिकृतपणे गोमातांची, गोवंशाची हत्या करण्यात येत आहे. हत्या करून त्याचे मांस शहरातील विविध दुकानांतून विक्री केले जात आहे. यामुळे हिंदुंच्या भावना दुखावल्या जात आहेत. यापूर्वीही शहरात हा प्रश्न चिघळला होता. पण त्यानंतर या प्रश्नी महापालिका प्रशासन आणि पोलिसांनी गांभीर्याने घेत कार्यवाही केली होती.

आता पुन्हा शहरात गोवंश हत्या, अनधिकृत कत्तलखान्यांचा विषय चिघळला आहे. दोन दिवसांपूर्वी गोवंश मांस असलेले वाहन अडविले म्हणून दोन समाजात बाचाबाची, दगडफेकही झाली आहे. परिस्थिती गंभीर स्वरूप धारण करीत आहे. शहरात वारंवार



उद्‌भवणारा अनधिकृत कत्तलखाने हा विषय गांधी चौक ठाण्याचे पोलीस गांभीर्याने घेत नसल्याने तीव्र नाराजी पसरली आहे.

मंगळवारी सकल हिंदू समाजाच्यावतीने महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर निदर्शने करून शहरातील कत्तलखाने तत्काळ बंद करावेत, अशी आयुक्तांना निवेदन देऊन करण्यात आली. याबाबत कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या आंदोलनात सकल हिंदू समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती माफी योजनेस मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** मनपाच्या वतीने मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती योजनेस मुदतवाढ देण्यात आली असून गाळेधारकांना आता ७५ टक्के सवलत दिली जात आहे. एमआयडीसी मधील मालमत्ताधारकांसाठीही ५० टक्के सवलत योजना राबविण्यात येत असून मालमत्ता धारकांनी या संधीचा लाभ घेत आपल्याकडील कर भरणा करावा असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

दिनांक १७ मार्च पर्यंत ही सवलत योजना लागू राहणार आहे.या काळात थकबाकीदारांसाठी व्याज व शास्तीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.चालू आर्थिक वर्षातील मार्च महिना सुरू झाला तरी काही मालमत्ता धारक व गाळे धारकानी अद्याप कर भरणा केला नसल्याने मनपा कर संकलन विभाग व मालमत्ता विभागाच्या वतीने धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे.नागरिकांनी आपल्या मालमत्तेचा थकीत कर भरणा करावा यासाठी ५० टक्के शास्ती सुट लागू करण्यात आली होती. मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाकडे मोठ्या प्रमाणात गाळे भाडे प्रलंबित असल्याने त्याना व्याजात सुट देण्यात आली होती.

दोन्ही विभागाकडून शास्ती सुट लागू केल्याने बहुतांशी नागरिक व गाळे धारकानी आपल्या कडील कर,भाडे भरून योजनेचा लाभ घेतला.या योजनेस उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. काही मालमत्ता धारक व गाळे धारक वैयक्तिक अडचणी मुळे कर भरणा करू न शकल्याने त्यानी महापालिकेकडे योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

थकबाकीदारांची मागणी व मार्च महिन्यात कर भरणा करण्याकडे असणारा कल विचारात घेऊन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी वरील दोन्ही योजनेस १७ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

उर्वरित सर्व थकबाकीदार, मालमत्ता धारक व गाळे धारकानी १७ मार्च पर्यंत आपल्याकडील थकीत कर भरणा करून घ्यावा. त्या नंतर कोणतीही सूट लागू होणार नाही,असे कर संकलन विभागा मार्फत कळविण्यात आले आहे.

मार्च महिना सुरु झाल्याने थकीत कर व गाळे भाडे वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तीव्र करण्यात येत असून या अंतर्गत मालमत्ता सील करणे,अटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे आदी कार्यवाही करण्यात येणार आहे. मालमत्ता व गाळे जप्त किंवा सील करूनही मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव,विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

## सार्वजनिक ग्रंथालय संघाचे आज वार्षिक अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ व नागाबुवा वाचनालय हेळंब,ता.देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने,गुरुवार,दि.१३ मार्च २०२५ रोजी सरस्वती संगीत महाविद्यालयाच्य पाठीमागे,नंदादिप विद्यालय, कातळे नगर,लातूर आयोजित करण्यात आले असून, या अधिवेशनाचे उद्घाटन औसाचे आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजनान कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या उद्घाटन सत्राला,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे प्र.संचालक अशोक गाडेकर व लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर-देशमुख,विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,राज्य ग्रंथालयाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले, माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर पवार,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,बीड जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष सुधीर चाटे,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, हेळंबच्या सरपंच अयोध्या सिरसे, नागाबुवा मठ संस्थानचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील,खाडगावचे सरपंच नेताजी देशमुख, पाखरसांगवीचे सरपंच भिमाशंकर लखादिवे हे लाभणार आहेत.

तत्पूर्वी साने गुरुजी विद्यालय ते नंदादीप विद्यालय,कातळे नगर दरम्यान ग्रंथ दिंडी निघणार आहे, त्याचे उद्घाटन दादाराव कराड वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.हणुमंत कराड, जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी कै. ॲड.त्र्यंबकदास झंवर काका आदर्श ग्रंथपाल कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार कुंडलिक मोरे सोलापूर, कै.मारुती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रकाश सोनकांबळे, पुरस्कार वितरण तसेच महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त युवराज जाधव,ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. शशिकिरण पाटील यांचा आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी २ ते ३ दरम्यान महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चा कायदा व विश्वस्त बदल अर्ज आणि इतर माहिती मार्गदर्शनाचे सत्र लातूर विभागाचे धर्मादाय सहाआयुक्त आर.ए.सासणे यांच्या अध्यतेखाली होणार असून,यावेळी लातूर विभागाचे धर्मादाय उपायुक्त एस.व्ही.एच.कादरी यांचे मार्गदर्शन होणार आहे.

## मानसिक व शारीरिक स्वास्थ राखण्यासाठी महिलांनी स्वत:साठी अर्धा तास योगा करावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** सध्याची बिघडलेली जीवनशैली खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवई आणि व्यायामाचा अभाव यामुळे आज प्रत्येकाला विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. योगासने प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्वाची आहेत. तेव्हा महिलांनी मानसिक व शारीरिक स्वास्थ राखण्यासाठी स्वतः करिता किमान अर्धा तास वेळ काढून योगा करावा असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ज्येष्ठ शिक्षिका डॉ. प्रणिता चाकूरकर यांनी केले.




लातूर येथील एमआयटी मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचे मनस्वास्थ याबाबत प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रणिता चाकूरकर बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार हे होते. तर महिला उन्नतीकरण समितीच्या डॉ. सरिता मंत्री, जेष्ठ प्रा. चंद्रकला पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनंदिन कामाची दगदग आणि ताणतणाव यातून योगाच बिघडलेल्या जीवनशैलीतून मार्ग काढू शकतो असा मौलिक सल्ला देऊन डॉक्टर प्रणिता चाकूरकर म्हणाल्या की, मानसिक आरोग्य आणि शारीरिक आरोग्य एकमेकांशी जोडलेले आहेत. योगा हा व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचा आहे. योगा पुरुष आणि महिला दोघांसाठीही तितकाच महत्त्वाचा असला तरी, महिलांसाठी त्याचे विशेष फायदे आहेत. शारीरिक ताकद वाढवण्या व्यतिरिक्त, योगा महिलांना मानसिक आरोग्याच्या समस्यांना तोंड देण्यास मदत करू शकतो.

महिलांच्या जीवनात उद्भवणारी आव्हाने आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी मार्गदर्शन करून डॉ. चाकूरकर यांनी टेलिव्हिजन मोबाईलचा वापर कमी करून योगासाठी वेळ द्यावा असा मौलिक सल्ला दिला. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

# मार्चमध्ये येणार उष्णतेची तीव्र लाट

## हवामान विभागाचा अंदाज; उष्माघात टाळण्यासाठी सजग व्हावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** गेल्या काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्यात सायंकाळपासून ते सकाळी आठवाजेपर्यंत वातावरणात गारवा जाणवत आहे. सकाळी आठ वाजेनंतर दुपारी चार-पाच वाजेपर्यंत उकाडा जाणवत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार येणाऱ्या काही दिवसांमध्ये लातूर जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते. अशा परिस्थितीत उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी आतापासूनच सजग राहावे व प्रतिबंधात्मक उपायांवर अधिक भर द्यावा. तसेच, उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

यंदा फेब्रुवारी महिन्यापासून उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. मार्च महिन्यात उष्णतेत आणखी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तापमानाचा पारा ३७ अंशांवर येऊन पोचला आहे. त्यातच आता



येणाऱ्या काही दिवसांमध्ये लातूर जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सौम्य त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॅश उमटणे, हाता-पायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसतात. गंभीर त्रासात उष्माघातामुळे त्वचा कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणांसह मृत्यूही होऊ शकतो. कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळा. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी, शीतपेय टाळा. खूप प्रथिनेयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा व स्वयंपाक घर हवेशीर ठेवा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### लहान मुलांची काळजी घेण्याचे आवाहन

उन्हाळ्यात लहान मुलांना पुरेसे पाणी आणि द्रव पदार्थ द्या. उन्हाळ्यात शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते. त्यामुळे मुलांना भरपूर पाणी, लिंबूपाणी, ताक, नारळ पाणी आणि फळांचे रस द्यावेत. कोल्ड्रिंक्स आणि साखरयुक्त पेयांपासून दूर रहावे. हलका आणि पौष्टिक आहार द्या. उन्हाळ्यात जड आणि तळलेले पदार्थ टाळावेत. कलिंगड, काकडी, संत्री, द्राक्षे यासारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे द्यावीत.

दूध, दही आणि ताकाचा आहारात समावेश करावा. उन्हाळ्यात मुलांना हलके, सैलसर आणि सूती कपडे घालावेत. उन्हाळ्यात शरीराची झपाट्याने ऊर्जा कमी होते. त्यामुळे मुलांनी ८-१० तासांची झोप घ्यावी. घाम आणि त्वचेसंबंधी समस्या टाळण्यासाठी स्वच्छता ठेवा. दररोज अंघोळ करून अँटीसेप्टिक साबण वापरावा.

# रक्तदान चळवळीत सहभागी व्हा

## शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च -** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. विद्यार्थी व शिक्षकांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे आंतरवासिता शिबिर सुरू असून या शिबिरांतर्गत मंगळवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी मापारी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. डॉ. एन. के. सय्यद, प्रा. एच. बी. पडवळ, प्रा. ए. यू. करदुरे, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह विद्यार्थी




उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या शिबिराची सुरूवात झाली. राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचा हा रक्तदान शिबिराचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी शिक्षणाधिकारी मापारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

रक्तदान शिबिरे ही काळाची गरज बनली असून यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी श्रीकांत पांचाळ, रोहित डोंगरे, राधा जगताप, गिरीधर वाघमारे, राजीव मुंढे, पांडुरंग सुडे, विजयकुमार पवार, रविकुमार सोनवणे, अमरेश्वर शिवणे, गणेश कांबळे, सतीश जाधव, ऋषिकेश लंकाळे, मारोती गित्ते, पवन नवगिरे, विठ्ठल पेठे आदी विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन सुमित जोशी यांनी केले तर आभार प्रियंका वाघमारे यांनी मानले.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सरकारचा विकासाभिमुख अर्थसंकल्प : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासाभिमुख सरकारचा हा विकासाभिमुख अर्थसंकल्प आहे.

अर्थमंत्री अजित पवार यांनी कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला असल्याची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे.



या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील सुमारे २ लाख ४० हजार हेक्टर कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. राज्यात शेत आणि पाणंद रस्ते निर्मितीसाठी एका चांगल्या योजनेची नितांत गरज होती. १६ जानेवारी रोजी महसूल मंत्री महोदयांची भेट घेऊन विनंती केलेली बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना सुरू करण्याची घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

या घोषणेचे सहर्ष स्वागत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**उदगीर, दि.१२ मार्च -**

छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट उदगीर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य दिव्य पुतळ्याशेजारी चौकात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले. धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट, उदगीर यावेळी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ता सतीश पाटील मानकीकर, सामाजिक कार्यकर्ते बी.जी. शिंदे, शुभम गायकवाड, शुभम बिरादार, अमित पले, गणेश जाधव-पाटील, पवन घोगरे, विठ्ठल घोगरे, शिवम बावगे, श्रेयस सूर्यवंशी, अजय शिंदे, व्यंकटेश शिंदे, मयुरी शिंदे यांनीही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.




### जागतिक महिला दिनानिमित्त कर्करोग जनजागृती रॅली

**उदगीर, दि.१२ मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने उदगीर शहरातून कर्करोग जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील विविध संस्था व सामाजिक संघटनाच्या महिलांनी सहभाग नोंदविला. उदगीर शहरातील हुतात्मा स्मारकापासून ही रॅली सुरु करण्यात आली. हुतात्मा स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती शाहू महाराज चौक ते माहेर हॉस्पिटल बस स्टॅन्ड समोर अशी रॅली काढण्यात आली. रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, सचिव ज्योती चौधरी, विद्या पांढरे, सुनीता मदनूरे, प्रा. मंगला विश्वनाथे, डॉ. सुलोचना येरोळकर, मातृभूमीच्या प्राचार्या उषा कुलकर्णी, मानसी चन्नावार, पल्लवी मुक्कावार, प्रिया नारखेडे, स्वाती गुरुडे, रोहिणी चाटे, तुलसी देशमुख, राणी वैजापुरे, डॉ. प्राजक्ता गुरुडे, अरुणा लेंडाणे यांच्यासह महिला व युवतींची मोठी उपस्थिती होती.



### शास्त्री विद्यालयाची आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रभेट

**उदगीर, दि.१२ मार्च -**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी मधील विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनसंदर्भात अग्निशमन दल उदगीर या ठिकाणी क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांना तेथील कार्यप्रणालीची तसेच साहित्यांच्या हाताळणीबाबत माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी विद्यालयाचे मा. मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक किरण नेमट यांच्या मार्गदर्शनानुसार क्रीडाशिक्षक संतोष कोले यांच्या पुढाकारातून क्षेत्रभेट संपन्न झाली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी, विद्यालयातील कर्मचारी झुंमुबाई डांगे यांचे चिरंजीव शिवशंकर रावळे तसेच अग्निशामन विभागाचे अधिकारी राजकुमार चामले तसेच तेथील कर्मचारी यांनी सदर कार्यप्रणालीची, यंत्रणेची प्रात्यक्षिके करून सखोल माहिती तसेच साहित्य हाताळणीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# बेलकुंड येथील २४८ हेक्टर जमिन औद्योगिक क्षेत्र घोषित

**▶▶ अधिसुचना निर्गमित... आ. आभिमन्यू पवारांच्या पाठपुराव्याला यश...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

राज्याच्या उद्योग विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात राज्यपाल यांच्या आदेशाने मंगळवार दि.११ मार्च रोजी अधिसूचना प्रसारित करून बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या अधिसूचनेसह बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसी अस्तित्वात आली असून आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

औसा तालुक्यातील बेलकुंड-सोन चिंचोली येथे मंजूर करण्यात आलेल्या एमआयडीसी साठीची भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. २४८ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक वसाहत स्थापित करण्यास याअगोदर मंजुरी देण्यात आली आहे.

तर मंगळवारी राज्य सरकारने बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या नव्या एमआयडीसीच्या उभारणीमुळे या भागाचा औद्योगिक व आर्थिक विकास होणार असून उद्योगातून रोजगार निर्मिती होण्यास मदत मिळणार आहे.

औसा येथे अतिरिक्त औद्योगिक वसाहतीच्या निर्मिती सह आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासह अनेक विषयावर विधिमंडळात विशेष लक्षवेधी करताना आमदार अभिमन्यू पवारांनी सरकारचे लक्ष वेधले. १८ डिसेंबर २०२३ रोजी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय बैठक घेण्यात आली होती.यानंतर एमआयडीसी मंजुरीच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण घडामोडी घडल्या आहेत.

औसा एमआयडीसीत जागा उपलब्ध नसल्याने अतिरिक्त एमआयडीसी निर्माण करण्यासाठी औसा तालुक्यातील बेलकुंड सोन चिंचोली भागात जमीन उपलब्ध होत असल्याने आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून बेलकुंड येथील खाजगी १७९.०६८६ हें. आर. व सरकारी ०.१८. हे. आर, तर सोन चिंचोली येथील खाजगी ६८.५२ हे. आर असे एकूण २४७.७६८६ हे.आर. क्षेत्र या एमआयडीसी करिता स्थापित करण्यास मंजुरी देण्यात आली.

यानंतर राज्याच्या उद्योग विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात राज्यपाल यांच्या आदेशाने दि.११ मार्च रोजी अधिसूचना प्रसारित करून बेलकुंड व चिंचोली सोन येथील २४८ हेक्टर क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

या अधिसूचनेमुळे बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसी अस्तित्वात आली आहे. ग्रामीण भागात विशेषतः त्या भागात उद्योग निर्मिती करून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

### औशाचे अर्थकारण बदलणार : आ. पवार

लवकरच भूसंपादनाला सुरुवात होईल, त्यानंतर निधी उपलब्ध करून घेऊन आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करुन याचबरोबर एखादा मोठा निर्मिती उद्योग बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसीत आणून हजारो तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्याचे नियोजन आहे. यासोबतच औसा तालुक्यातील तरुण उद्योजकांना या एमआयडीसीमुळे उद्योगांसाठी जागा सुद्धा उपलब्ध होणार आहे. बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसीच्या माध्यमातून औसा मतदारसंघाचे अर्थकारण पूर्णतः बदलणार आहे, असा विश्वास आ. आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे.



## वडिलांच्या मदतीसाठी मुली वळल्या शेतीकडे...

# निलंग्यातील मुलींनी घेतले कोथिंबीरचे पिक



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१२ मार्च -**

निसर्गाच्या लहरीपणामुळे व येणाऱ्या अडचणींमुळे आज शेती करणे अवघड झाले असताना निलंगा तालुक्यातील निटुर जवळील माचरटवाडी शिवारातील शेतकरी सुग्रीव श्रीरंग पवार या शेतकऱ्यांच्या मुली शेती कामाकडे वळल्या. त्यांनी आपल्या वडिलांना शेतीच्या कामात मदत करत एक एकर मध्ये कोथिंबीरीचे पिक घेतले आहे.

आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरूषांच्या बरोबरीने काम करत असताना शेतातही पुरूषांच्या बरोबरीने महिलाही काम करताना दिसत आहेत. आपल्या वडीलांची परिस्थिती हालाखीची असल्याचे पाहून आपणही वडीलांना मदत करावी. या हेतूने १२ वी पर्यंतचे शिक्षण घेऊन घरी बसलेली अंकीता सुग्रीव पवार, निकिता सुग्रीव पवार व सरस्वती पवार या तीन विद्यार्थीनींनी एक एकर मध्ये कोथिंबीर पेरणी केली आहे. या तीन मुलींनी कोथिंबीर पिकाची खुरपणी, फवारणी करत रेन पाईपाच्या सहाय्याने पाणी देतात. वीज भारनियमन असताना रात्रीच्या वेळी लाईट आल्यानंतर या मुली शेतात जाऊन स्वत पाणी देतात.

अतिशय संघर्षातुन या मुलीनी कोथिंबीरचे पिक घेतले आहे. तसेच निटुर परिसरातुन या मुलींच्या कामाचे कौतुक केले जात आहे.

# महिलांनी निर्भयतेने जगावे; आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा : गोडबोले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ मार्च -**

महिला दिनाच्या औचित्याने महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनाली शेषराव गोडबोले-पाटील यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या व्याख्यानात त्यांनी महिलांनी निर्भय होऊन जीवन जगावे, अत्याचारांविरुद्ध लढावे आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा यावर भर दिला. तसेच, महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षा डॉ. रेखा रमण रेड्डी या होत्या. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना त्यांनी महिलांचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन असल्याचे सांगितले. स्त्री शिक्षित झाल्यास संपूर्ण कुटुंब सक्षम होते आणि कामाच्या समान संधी उपलब्ध करून महिलांना आर्थिक सशक्तता मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर, सदस्य प्रशांत पेन्सलवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, प्रा.डॉ. मल्लेश झुंगास्वामी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवनंदा रोडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पुजा जाजू यांनी केले.

# महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१२ मार्च -**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथे दि.११ मार्च रोजी जागतिक महिला दिन संस्थेचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा येथील पोलिस उपअधीक्षक राजश्री तेरणी पाटील व सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. रोहिणी दवणे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजामाता यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील यांनी महाविद्यालयातील महिला विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सुरक्षतेविषयक व महिला सशक्तिकरण व तसेच औषध निर्माणशास्त्रात महाविद्यालयातील महिला विद्यार्थ्यांच्या योगदान याबद्दल महत्वपूर्ण दृष्टीने प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या राजश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या जीवनातला खडतर प्रवास करुन साधारण विद्यार्थी ते पोलीस उपअधीक्षक पर्यंतचा प्रवास महिला व विद्यार्थ्यांनी समोर व्यक्त केला. प्रथम तुमचे ध्येय ठरवा आणि त्यावर काम करा.

महिलांसाठी सध्या अनेक करिअर संधी उपलब्ध आहेत जसे की डॉक्टर, अभियंता, शिक्षक, संशोधक व्यावसायिक इत्यादी. व तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. प्रिती माकने, प्रा. सानुली पौलकर, प्रा. मयुरी गुडले, सुवर्णा मोहिते, आदिती चव्हाण, प्रतीक्षा मोरे, आगलावे गायत्री, पायल पांढरे, वनिता गिरी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दैनिक तरुण भारतच्या बातमीने काटेरी झाडे काढण्यास सुरूवात...

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना अखेर आली जाग !

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आरी मोड ते नळेगाव व आरी मोड ते लातूर जाणाऱ्या मुख्य मार्गावर दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे-झुडपे वाढली होती. त्याचा परिणाम वाहतूकीवर होत होता व त्यामुळे अपघाताची संख्या वाढत चालली होती.

दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे झुडपे घनदाट वाढली होती. वळणावरील झाडांमुळे समोरच्या वाहणांचा अंदाज न आल्यामुळे अनेक अपघात झाले आहेत यात अनेकांना आपला प्राण गमवावे लागले आहेत.

यापुर्वी सुध्दा तरुण भारत या वृत्तपत्राने याची दखल घेऊन बातमी प्रकाशित केली होती त्यावेळेस प्रशासनाने बातमीची दखल घेऊन गुत्तेदार मार्फत लागलीच झाडे झुडपे काढण्यास सुरुवात केली होती. परंतु अर्धवट कामास गुत्तेदाराने स्थगिती दिली.




काम अर्धवट सोडल्याने तालुक्यात उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे तरुण भारत या वृत्तपत्राने बातमी छापली त्याचाच परिणाम म्हणजे आज राहिलेले अर्धवट काम सुरू झाले आहे.

# आशीव पाटीवर नऊ महिन्यात तिसऱ्यांदा फोडले दुकान; ४ लाख ४७ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ मार्च -**

औसा तालुक्यातीलआशीव पाटीवरील निसर्ग सोलार ॲण्ड ग्रोटेक सर्हिसेस चे दुकान शनिवार दि.८ रोजी रात्री फोडून दुकानातील ४ लाख ४७ हजार रुपयांच्या कापर वायर, पानबुडी, विद्युत मोटारी, चार्जिंग स्प्रेपंप, इन्वेटर अशा वस्तूची चोरट्यांनी चोरी केली. या प्रकरणी भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून गेल्या नऊ महिन्यात याच दुकानातील तिसऱ्यांदा आणि एकाच पध्दतीने चोरट्यांनी धाडसी चोरी करून पोलिसांना आव्हान दिले आहे.

राष्ट्रीय महामार्ग ३६१ लगत औसा तालुक्यातील आशीव पाटीवर शरण्णाप्पा कुंभारे यांचे निसर्ग सोलार ॲण्ड ग्रोटेक सर्हिसेसचे दुकान आहे. या दुकानातील पहिल्या दोन चोरीपैकी कांही वस्तू शोधण्यात भादा पोलिसांना यश आले आहे. तर उर्वरित वस्तूंचा शोध अद्याप सुरु आहे. याच काळात चोरट्यांनी तिसऱ्यांदा ४ लाख ४७ हजारांचे सिंगल फेस कापर वायर, थ्री फेस कापर वायर, ड्रील मशीन, इंजिन फवारे, टिल्लू मोटारी, पानबुडी विद्युत मोटारी, टुल किट, पाने सट, ५ एच पी पानबुडी पंप, चार्जिंग स्प्रे पंप, चर्जिंग बटरी पेटी



अशा साहित्याची चोरी दुकानाच्या शटरचा लाक तोडून शनिवारी बोलोरो नंबर प्लेट नसलेल्या चार चाकीतून पहाटे २ वा. सुमारास केली असल्याचा गावकऱ्यांचा अंदाज आहे.

चोरट्यांनी राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एकाच दुकानात नऊ महिन्यात तिसऱ्यांदा चोरी करुन हटट्रिक केली आहे. तसेच दुकानाचा एकच पत्रा तिसऱ्यांदा उचकावूनही हटट्रिक पुर्ण केली आहे. परंतू पहिल्या दोन चोऱ्या पाहता दुकानदाराने दुकानाची तीन बाजुने मजबुती केली. यामुळे चोरट्यांना पत्रा खोलूनही दुकानात प्रवेश करता आला नाही. यामुळे महामार्गावरील दुकानाच्या शटरचे लाक कुलूप तसेच ठेवून तोडून काढून दुकान फोडून चोरट्यांनी धाडसी चोरी केली. या चोरींतील चोरट्यांचे फोटो सीसीटीव्ही कमेऱ्यात कैद झाले असल्यामुळे तपासात पोलिसांना मदत होणार आहे. केवळ नऊ महिन्यात तिसऱ्यांदा एकाच दुकानात चोरी झाल्यामुळे आशिव गावातील दुकानदारात घबराहटीचे वातावरण दिसून येत आहे.

### पोलिसांच्या अपयशामुळे तिसऱ्यांदा चोरी

पहिल्या दोन चोऱ्यांतील चोराला पकडून कांही विद्युत मोटारी मिळविण्यात भादा पोलिसांना यश मिळाले आहे. चोरी एकाच दिवशी एकाच वेळेत एकाच दुकानातून होवूनही कमी वस्तू मिळून आल्या. आणि चोराची जामिनावर सुटका झाली. तर चोरीतील उर्वरीत वस्तू शोधण्यात नऊ महिन्यानंतर अपयश आले आहे. यामुळे चोरट्यांनी तिसऱ्या वेळी धाडसाने चोरी केली, असे मत किशोर कुंभारे यांनी व्यक्त केले.

# उदगीर येथे छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ मार्च -**

स्वराज्याच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांचे बलिदान देणारे महान योद्धे, स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त पुण्यतिथी दिना निमित्ताने अभिवादन करण्यात आले.



यावेळी उदयभाऊ मुंडकर, मनोन पुदाले, सुनील सावळे, धनाजी मुळे, बिपीन पाटील, बालाजी बिरादार, कणसे, बाबासाहेब पाटील, निवृत्ती तिरकमठे, यशवंत बिरादार, अहमद सरवर, सिद्धेश्वर लांडगे, अभिजित पाटील, दत्ता पाटील, प्रशांत जगताप, अजित शिंदे, राहुल अतनुरे, सतीश पाटील मानकीकर, यशवंत बिरादार, रामदास माळेगाव, नितीन दुरुगकर, वाडकर गुणवंत, विजय बामणीकर, भाऊसाहेब जांभळे, देवानंद बिरादार, दयाराम बिरादार, गोविंद बिरादार, गणेश बिरादार, दीपक पाटील नागलगावकर, बालाजी वेंकोने, सचिन पाटील, हनमंत म्हेत्रे, व्यंकट मगर, रोहिदास मिरखले, परमेश्वर मोरे, तुकाराम मोरे, अवधूत जाधव, अमोल पाटील, बालाजी नादरगे, राहुल बिरादार, अविनाश पुपलवाड, गणेश जाधव, गणेश बिरादार, रवी जवळे, बाबासाहेब सूर्यवंशी, राहुल पाटील, प्रशांत रंगवाड, प्रकाश कुलकर्णी, साईप्रसाद वाघमोडे, पपन घोगरे, गणेश गुडळे, सुधाकर येंकोणे इत्यादी उपस्थित होते.